
माणूस
भूमुक्ती मेळावा
शहादे
९ फेब्रुवारी ७२ : पन्नास पैसे

माणूस	शनिवार	१९ फेब्रुवारी १९७२	पन्नास पैसे
वर्ष	अंक	वार्षिक वर्गणी	परदेशची वर्गणी
अकरा	अडतीस	पंचवीस रुपये	पासष्ट रुपये

माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

प्रेम नमस्कार.... □ "रसातळाला जाण्यापूर्वी" या कथेचा पूर्वार्ध जितका आकर्षक होता तितकाच उत्तरार्ध मिळमिळीत निघाला आणि शेवट तर फारच तकलादू वाटला.

६ फेब्रुवारी, १९७२ — **अनंत अंबुलकर**

□ २६ जानेवारीच्या अंकातील लक्ष्मण लोंढे यांनी अनुवाद केलेली 'रसातळाला जाण्यापूर्वी' ही कथा मनाचा तळ गाठते आणि माणुसकीचे खरे प्रदर्शन घडवते. 'लिलीचे फूल' कुस्करले जात असताना तीन मनांचा झालेला कोंडमारा उत्तरार्धात फारच तीव्रतेने जाणवतो. दिनांक ५ फेब्रुवारीच्या अंकातील पू. रामनंदतीर्थ यांच्यावरचा छोटासा लेख – प्रा. नरहर कुरुंदकर लिखित – सुंदरच होता.

२६ जानेवारीच्या अंकातील सिंध पुरवणी वाचनीय होती. सिंधी समाजाचे इतके व्यवस्थित विवेचन राजकीय विचार-संदर्भात कुठे वाचले नाही. !

५ फेब्रुवारी, १९७२ — **मुकुल बोरसे, मालेगाव (नाशिक)**

मुखपृष्ठ : १. भू-मुक्ती मेळाव्यात भाषण करताना – पन्नालाल सुराणा, अंबरसिंग, भाऊ मुंदडा, जर्मनमित्र क्लॉस, लखन भतवाल, दत्ता देशमुख.
२. मोर्चा–शहाद्याच्या तहसील कचेरीवर.
३. भिलाटी मैदानावरील सभा.

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

दिनांक ३० व ३१ जानेवारी

दिनांक ३० जानेवारी. रविवार. ऐन दुपारची वेळ. शहादे येथील नदीकाठचे भिलाटी मैदान माणसांनी गजबजायला सुरुवात झाली होती. चारही दिशांनी माणसे थव्याथव्यांनी येत होती. पाहता पाहता हजार झाली. दोन हजार झाली. तीन तीनच्या रांगांत सर्वजण उभी राहिली. लाऊडस्पीकरवरून सूचना मिळाली. मोर्चा सुरू झाला. वाटेत, वळणावळणावर आणखी माणसे सामील होत गेली. बहुतेकजण आपल्या गावाहून, दहाबारा मैलांवरून पायीच या मोर्चासाठी-मेळाव्यासाठी आलेले होते. तासभर मोर्चा गावातील निरनिराळ्या रस्त्यांवरून फिरला. मूकपणे. गडबड नाही, गोंधळ नाही. अचकटविचकट हावभाव नाहीत. तरी घराघरातून मंडळी मोर्चा पाहण्यासाठी बाहेर येऊन उभी राहात होती. मुख्य चौकात मोर्चा आला तेव्हा भूमिहीन शेतमजुरांचे नेते श्री. दत्ता देशमुख, जनसंघाचे या भागातील एक प्रमुख कार्यकर्ते श्री. लखन भतवाल मोर्चाला सामोरे झाले. मोर्चा पुढे तहसील कचेरीकडे सरकला. मोर्चा मूक का म्हणून काहींनी नाराजी व्यक्त केली. हा मूक नसून शोकमोर्चा समजा, कारण या लोकांच्या जमिनी गेलेल्या आहेत असा कुणी खुलासा परस्पर करून मोकळेही झाले. गर्दी वाढतच होती. शहरी चेहरेही मोर्चात अधूनमधून खूप दिसत होते. धुळ्याहून, पुण्या-मुंबईहून, सोमनाथहून बरेच लोक या मोर्चा-मेळाव्यासाठी आलेले होते.

दोन मे १९७२ या दिवशी घडलेल्या पाटीलवाडी–म्हसावद प्रकरणानंतर या भागातील आदिवासी-शेतमजुरांमधे बरीच जागृती झालेली आहे. आपल्यावर होणारे अन्याय, आपली उपासमार आपण संघटित झाल्याशिवाय दूर होणार नाही असे सर्वांना आता तीव्रतेने जाणवत आहे. शहादे-तळोदे तालुक्यात हे जागृतीचे प्रमाण विशेष आहे, कारण गोविंदराव शिंदे, अंबरसिंग महाराज व इतर अनेक सर्वोदयी कार्यकर्ते पूर्ण वेळ याच कामाकडे लक्ष पुरवीत आहेत. या मंडळींनी गावोगाव हिंडून जमिनींच्या हस्तांतरांची एक जुजबी पाहणीही केलेली आहे. त्यावरून असे दिसून आले, की केवळ शहादे-तळोदे या दोन तालुक्यांत मिळून दोन-अडीचशे आदिवासी कुटुंबांची सुमारे पाच हजार एकर जमीन गैरमार्गाने सावकारांनी बळकावलेली आहे. निदान या जमिनी तरी आदिवासी मालकांना

ताबडतोब परत मिळायला काय हरकत आहे ? यासाठी नवीन कायदा होण्याची वाटसुद्धा पाहायला नको. आहेत तेच कायदे फक्त काटेकोर पद्धतीने अंमलात आणले जायला हवेत. पण हे आज, निदान या भागात तरी घडत नाही. दिल्ली-मुंबईतली सरकारे भली डावी असोत, की क्रांतिकारक घोषणा या सरकारांनी केलेल्या असोत. स्थानिक पातळीवर, खालपर्यंत धोरणे कशी अंमलात आणली जातात, घोषणा व कार्यक्रम कसे राबवले जातात हा खरा महत्त्वाचा मुद्दा आहे. या भागात कागदोपत्री जमिनी आदिवासींच्या मालकीच्या आहेत. सावकारांशी केलेल्या करार-मदारांची मुदतही संपून गेलेली आहे. तरी कूळ म्हणून, बटाईदार म्हणून सावकारच सर्व जमिनी कसत आहेत, उपभोगत आहेत. मालक असूनही आदिवासी मात्र उपाशी तो उपाशीच आहे. कारण शासन या आदिवासींच्या हक्कसंरक्षणाबाबत जागरूक नाही. यंत्रणा व सत्ता जमीनदार-सावकार वर्गाच्या हितासाठी बिनदिक्कत राबवली जाते. म्हणून दानपत्रे गोळा करीत हिंडण्यापेक्षा एके ठिकाणी तळ ठोकून आदिवासींची, भूमिहीन शेतमजुरांची स्थानिक शक्ती जागृत करावी, गावोगाव या जागृत जनशक्तीच्या जोरावर जमिनीचे, रोजगारीचे प्रश्न सोडवून घ्यावेत हा पर्याय येथील सर्वोदयी कार्यकर्त्यांनी स्वीकारला आणि यादृष्टीने गेल्या आठदहा महिन्यांत खूपच काम केले. गावोगाव सभा घेतल्या, शिबिरे भरवली, वृत्तपत्रांचे साहाय्य घेतले, समानविचारी व्यक्तींशी व संस्थांशी सहयोग साधला. भू-मुक्तीचा कार्यक्रम सर्वांसमोर ठेवला. सावकारांनी गैरकायदा बळकावलेल्या जमिनी सोडवून घेणे, मुक्त करणे–यासाठी आजचा मोर्चा आणि मेळावा होता. जे गेले सहा महिने सभासमांतून सांगितले त्याचा सामुदायिक पुनरुच्चार आज होत होता.

मोर्चा मूक होता तरी फलक बोलके होते. 'आम्हाला काम द्या', 'आम्हाला न्याय हवा, भीक नको', 'आमचा मंत्र जय जगत्', 'आमचे तंत्र ग्रामदान-ग्राम-स्वराज्य', 'जागृत जनता अब न सहेगी, धन और धरती बाट रहेगी'–आणखी अशा कितीतरी घोषणा, मागण्या, निर्धार फलकांवर व्यक्त झालेले होते. तुकड्या वाढल्या तसे फलकही वाढले. ज्यांना काठ्याही मिळू शकल्या नाहीत त्यांनी हातांनीच फलक उंच धरलेले होते–फणा नसलेल्या नागासारखे हे हात ! शस्त्र नसलेली ही सेना ! युद्धाला निघालेले हे शांतियात्रिक !

पण आपल्या श्रमाचे चीज झाले म्हणून सर्वोदयी कार्यकर्ते मनोमनी तृप्त होते. एकेक तुकडी दृष्टीच्या टप्प्यात आली, की अंबरसिंगाचा चेहरा समाधानाने उजळून निघत होता.

एकजण तर विशेषच गहिवरला. पाडळद्याची तुकडी मोर्चात सामील होण्यासाठी एका वळणावर उभी आहे हे दिसल्यावर ! या तुकडीत मुले होती आणि स्त्रियाही होत्या. केवढे परिवर्तन ! बारा वर्षांपूर्वी हा इथे आला तेव्हा काय स्थिती होती ! शहरी इसम पाहिला, की भिऊन मोठी माणसेही लांब पळत होती. शरीरांचे

कोळसे. मने भुताखेतांच्या सृष्टीत वावरणारी. लंगोटीशिवाय वस्त्र नाही, दारू पाचवीला पुजलेली. भाषा वेगळी. मुलुख परका. प्रवास सगळा पायी. तरी हा इथे ठाण मांडून बसला. विनोबांचा आदेश म्हणून. भूदानाचा पाईक होऊन. आदिवासींसाठी शाळा काढ, स्वस्त धान्याची दुकाने चालव, एक नाही अनेक उद्योग याने आरंभले. काही चालले, काही फसले. तरी याने जागा सोडली नाही. अवमानित, एकाकी, जमीनदार आणि राज्यकर्ते यांच्याकडून होणारे बदनामीचे घाव झेलीत झेलीत हा आपले काम करीतच राहिला. पराभवाच्या वेदनेने हा आतून कितीवेळा तरी ढासळला असेल ! पण आज त्याला आधार सापडला असावा. आपण केलेले सगळेच काही वाहून गेले नाही या विचाराने त्याला खूप सावरले असावे. त्याने पेरलेले थोडेथोडे उगवत होते. त्याचा आदिवासी आज जागा झालेला दिसत होता. त्याने हाताशी धरून लहानाची मोठी केलेली आदिवासी मुले आता मोर्चे काढीत होती, मेळावे भरवीत होती. या मोर्चा-मेळाव्यांसाठी लांबलांबहून, शहरातून मंडळी आस्थेवाईकपणे येत होती. वृक्ष वठतो की काय, कोसळून पडतो की काय अशी भिती होती. आज या वृक्षालाच पालवी फुटलेली होती. भूदानाला-सर्वोदयाला आज एक नवी वाट सापडली होती. भाऊ यामुळेच गहिवरले होते. त्यांच्या तपश्चर्येचे आज सार्थक झालेले त्यांना दिसत होते. भाऊ मुंदडांमुळेच आजचा दिवस या भागात असा उगवला होता. बारा वर्षांपूर्वी ते या अंदमानात आले नसते तर ! बिहारात जसा पूर्णिया तसा महाराष्ट्रात हा सातपुडा. संथाळांप्रमाणेच भिल्लांचीही दिवसाढवळ्या शिकार होत राहिली असती.

मोर्चाचे रूपांतर मेळाव्यात झाले. एव्हाना दुपारचे दोन-अडीच वाजलले होते. चार तास मेळावा भर उन्हात शांतपणे बसून होता. पाच-सहा हजार तरी लोक असावेत. बहुतेक आपला रोजगार बुडवून आलेले. किंवा कामच नसलेले !

वक्तेही खूप होते. ठाकुरदास बंग, वसंतराव बोंबटकर, गोविंदराव श्रिदे, खंबरसिंग ही सर्वोदयाची आघाडी. दत्ता देशमुख, पन्नालाल सुराणा, बा. न. राजहंस, रतन भतवाल ही राजकारणात वावरणारी मंडळी, सर्व्हिस सिव्हिल इंटर नॅशनलचे कॅनॉस, भूमिपुत्र प्रतिष्ठानचे आबा करमरकर–या सर्वांनीच मेळाव्यासमोर ठेवल्या गेलेल्या कार्यक्रमाला जोरदार पाठिंबा व्यक्त केला.

कार्यक्रम साधा आणि सरळ होता–

१. ज्या जमिनी आदिवासी खातेदारांच्या नावावर नोंदलेल्या आहेत, पण आज जबरदस्तीने इतर कुणी ज्या कसत आहेत, त्या ताबडतोब ताब्यात घ्या.

२. दहा वर्षांच्या कराराने करायला दिलेल्या जमिनी कराराची मुदत संपस्यावर लगेच ताब्यात घ्या.

३. प्रत्येकाला रोजगार मिळण्याची हमी सरकारने जाहीर केली आहे. तिची अंमल-

बजावणी ताबडतोब झाली पाहिजे. ही मागणी संघटितरीत्या आंदोलनाच्या मार्गाने सरकारपुढे मांडण्यासाठी रोजगार नसलेल्या आदिवासींनी ग्राम स्वराज्य समितीच्या कार्यालयावर आपली नावे उद्यापासून नोंदवावीत.

कार्यक्रमाच्या जोडीने काही मागण्याही शासनासमोर या मेळाव्याच्या द्वारा मांडण्यात आलेल्या होत्या–

१. सर्व गावांना १५ ऑगस्ट १९४७ पासून नवी शर्त सरकारने लागू करावी व गेल्या २५ वर्षांतील सर्व जमिनींची हस्तांतरे रद्द करावीत.

२. सरकारच्या संस्था व खाती यांच्यामार्फत आदिवासींना देण्यात आलेली कर्जे रद्द करावीत.

३. शेतमजुरीचे किमान दर ताबडतोब बांधून द्यावेत.

मेळावा आटोपला. रात्रीपासून निवडक कार्यकर्त्यांचे एक शिबिरही सुरू झाले.

परगावची मंडळी परतली. सोमनाथहून, मुंबईपुण्याहून आलेले काही तरूण मात्र शिबिरासाठी थांबलेले होते.

मेळाव्यात ठरलेला कार्यक्रम प्रत्यक्षात अंमलात कसा आणता येईल, अडचणी काय आहेत, कार्यकर्त्यांची शक्ती किती, वातावरण कसे आहे, शासनाची, जमीनदार सावकारवर्गाची भूमिका कोणती राहील – वेगवेगळ्या प्रकारे विषयाची छाननी चालू होती. कोणी तात्त्विक बोलत होते. कुणाचा भर वास्तवावर होता. काहींना तर दुपारची वास्तवताच भेडसावत होती. आज धान्य संपले. शिबिरासाठी जमलेल्या लोकांची दुपारच्या जेवणाची सोय कशी करायची? भाजीवाल्याचे कालचे पैसे दिल्याशिवाय आज तो भाजी नाही म्हणतो. गावात आता पैसे मिळण्याची सोय नाही. सावकारमंडळी आता सर्वोदयाला नावे ठवू लागलेली आहेत. मग मुंबईचे दाते-करमरकर उपयोगी पडतात. जीपचा दोन दिवसांचा पेट्रोल खर्च ते पुढे करतात. तेवढ्या पैशांत आजची दुपारची वेळ तरी निभावली जाते.

फोटोवाला येतो. त्याने आदल्या दिवशीचे, मोर्चा-मेळाव्याचे फोटो काढलेले असतात. हौशीने कुणीतरी सांगितलेले असते. पण बील पाहून मंडळी हबकून जातात. एकशे सत्तर रुपये. कुठून आणायचे एवढे पैसे?

भाऊ मुंदडा सर्व्हिस सिव्हिल इंटरनॅशनलच्या पाहुण्याला घेऊन तोरणमाळ–धडगावकडे रवाना झालेले असतात. त्यांच्या सोबत सहज तो भाग पाहावा म्हणून निघालेले असतात, पुण्याचे सुधीर बेडेकर, मुंबईचे लिमये–बिडवाई.

दाते-करमरकर-राणे या मुंबईच्या मंडळींनीही शहादे सोडलेले असते.

जानेवारीची ही एकतीस तारीख असते. रात्री शिबिरात चर्चा चालू असते. विषय असतो या भागातील रोजंदारीची परिस्थिती. मेळाव्याने 'काम द्या' अशी मागणी केलेली असते. कुणीतरी माहिती सांगतो – शहाद्यापासून दहा-बारा मैलांवर सरकारने दरा-धडगाव रस्त्याचे मोठे काम काढलेले आहे. पण लोक कामाला जात

नाहीत. नासिकहून कामगार आणावे लागतात. असे का होते? दोघा-चौघांनी समक्ष जाऊन जागेवर चौकशी करून यावी असे ठरते. त्याप्रमाणे माजगावकर, दिलीप कामत, बाबा दौल्या वळवी, कुमार शिराळकर हे चौघेजण दुसऱ्या दिवशी सकाळी बसने तिकडे जायचे ठरवतात. दुसरी एक अशीच तुकडी कुरंगीला पाठवावी असे ठरते. या गावचा एक आदिवासी शिबिराला आलेला असतो. त्याची जमीन इतर कुणी बळकावलेली असते. सात-बाराचा उतारा वगैरे त्याने बरोबर आणलेला असतो. गावाला जाऊन याबाबत खरी परिस्थिती काय आहे हे जाणून घेणे, हे या दुसऱ्या तुकडीचे काम असते.

एक फेब्रवारीचा दिवस उजाडला. पहिली तुकडी चार भाकऱ्या व मिरच्या पिशवीत बांधून एस्. टी. स्टँडवर पोचली. तास झाला. दीडतास होऊन गेला. तरी गाडीचा पत्ता नाही. चौकशी करता समजले, की गाडी बिघडली आहे. वेळेचा काहीच भरवसा सांगता येत नाही. असे घोटाळे येथे वरचेवर होतच असतात. कार्यक्रम सगळे विस्कटून जातात.

सायकली किंवा जीप मिळते का हे पाहण्यासाठी ही तुकडी पुन्हा शिबिराच्या जागी येते. गोविंदराव शिंदे, अंबरसिंग शिबिराचा समारोप करण्याच्या बेतात असतात.

जीपसाठी निरोप जातो. गोविंदराव शिबिर संपता संपता एक बातमी सांगून तेवढ्यात सगळ्यांना थक्क करून सोडतात.

– मेळावा संपल्यावर अमुक अमुक गावचा एक आदिवासी आपल्या मालकीच्या पण सावकाराने बळकावलेल्या शेतात गला. त्याने पीक कापायला सुरुवात केली. सावकाराने पोलीस पाठविले. आदिवासीने पोलिसांना कागदपत्र दाखविले. पोलिसांची खात्री पटली. काहीही कारवाई न करता पोलीस परत गेले.

शिबिरात टाळ्यांचा कडकडाट होतो.

जीपची सोय झालेली आहे असा निरोप येतो.

एक वयस्क आदिवासी तेवढ्यात येऊन बाजूला बसलेला असतो हे कुणाच्या लक्षात येत नाही. अंबरसिंगचे व त्याचे हळू आवाजात काहीतरी बोलणे चालू असते. पहिल्या तुकडीतले, जीपची वाट पाहणारे तरुण कान टवकारतात. गोविंदरावही ओढले जातात. शिबीर आवरलेले असल्याने घोळका आणखीनच वाढतो.

वयस्क आदिवासी असतो सलसडीचा. त्याने बातमी आणलेली असते, की मेळाव्यानंतर सलसडीच्या शिवारातील एका आदिवासीच्या जमिनीवरचे पीक बाहेरगावचे मजूर बोलावून सावकार रातोरात कापायला आला. सलसडीच्या आदिवासींना ही गोष्ट समजली. त्यांनी शेतावर जाऊन सावकाराच्या माणसांना रोखले, पीक कापू दिले नाही. सावकाराने पोलीस बोलावलेले आहेत. दोन्ही बाजूचे लोक शेतावर बसून आहेत.

पहिल्या तुकडीने आपला मोर्चा आता बदलला आहे. रस्त्याच्या कामाची माहिती घेण्यासाठी दऱ्याला जायचे ठरले होते. तेथून जवळच असलेल्या उनभदेवाच्या गरम झऱ्यावर आंघोळी उरकाव्यात, बरोबर घेतलेला भाकरतुकडा खावा आणि परतावे असा विचार होता. पण आता उनभदेवाला येथूनच रामराम. सलसडीचे शिवार या तुकडीला खुणावत होते. [अपूर्ण]

म्हैसाळ-पुणे-मुंबई

म्हैसाळ (ता. मिरज) येथील दोनशे हरिजन कुटुंबांचा गरिबी हटाव प्रयोग आता महाराष्ट्रात चांगलाच नावाजला गेलेला आहे.

२४ जुलै १९७१ च्या माणूस अंकात या प्रयोगाविषयी सविस्तर माहिती प्रसिद्ध झालेली वाचकांच्या स्मरणात असेलच. त्यानंतर अनेक जागरूक व्यक्तींनी या प्रयोगात रस घेतला. कुणी म्हैसाळला जाऊन हरिजनांच्या या सहकारी प्रयत्नांचे कौतुक केले, कुणी आर्थिक मदतीचा यथाशक्ती हातभार लावला. 'श्री. विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटी, म्हैसाळ' या संस्थेचे एकूण पंचावन्न सभासद सध्या आहेत. या सर्व सभासदांनी श्रमदान करून प्रत्येकी शंभर रुपये याप्रमाणे एकूण पंचावन्नशे रुपये प्रथम देणगी म्हणून संस्थेकडे जमा केले. बाहेरूनही काही देणग्या आल्या. संस्थेतर्फे प्रकाशनार्थ आलेली देणगीदारांची पहिली यादी पुढीलप्रमाणे आहे–

क्र.	देणगीदारांची नावे	रुपये
१.	श्री. जगन्नाथ महादेवराव देवल	१५००।–
२.	,, डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्ध	५०।–
३.	,, ल. ना. गोखले	१००।–
४.	,, ग. म. कारखानीस	२५।–
५.	नॅशनल रेल्वे मजदूर युनियन पुणे शाखा	१००।–
६.	श्री. शरद केशव बापट	५१।–
७.	श्रीमती नीला पाटील	२५।–
८.	श्री. कृष्णाजीराव साठे	१००।–
९.	,, प्र. ग. सरदेसाई	२५।–
१०.	,, शि. श. बेंद्रे	२५।–
११.	,, जोसेफ नरोन्हा	२५।–

क्र.	देणगीदारांची नांवे	रुपये
१२.	श्री. आ. स. मराठे	२५।–
१३.	,, पद्माकर कुलकर्णी	२५।–
१४.	,, गो. आ. भट	५०।–
१५.	,, चि. द. पंडीत	५०।–
१६.	,, अशोक आचार्य	२५।–
१७.	,, भालचंद्र वैद्य	२५।–
१८.	,, म. दी. साकळकर	२५।–
१९.	,, रा. के. लेले	५०।–
२०.	,, ज्ञानेश्वर नाडकर्णी	५१।–
२१.	,, वा. य. गाडगीळ	१००।–
२२.	,, मा. पं. शिखरे	१०१।–
२३.	,, दि. वि. गोखले	५००।–
२४.	,, गोविंद तळवळकर	५००।–
२५.	,, नीलकंठ खाडीलकर	२०००।–
२६.	,, शिवाजीराव सावंत	२५।–
२७.	,, रा. य. ओलतीकर	२५।–
२८.	,, केशवराव कोठावळे	७५०।–
२९.	,, चंद्रकांत ताम्हाणे	१००।–
३०.	,, वि. ना. देवधर	२५।–
३१.	,, दिनकर गांगल	२५।–
३२.	,, वि वि. करमरकर	२५।–
३३.	,, पंढरीनाथ रेगे	२५।–
३४.	,, दिनू रणदिवे	२५।–
३५.	,, नरेंद्र वल्लाळ	२५।–
३६.	,, रामकृष्ण गणेश जोशी	५१।–
३७.	,, अहमद अत्तार	५।–

या मित्रांनी स्वयंस्फूर्तीने केलेल्या सहकार्यामुळे म्हैसाळ येथील हरिजनबांधवांचा आपल्या प्रयोगावरील विश्वास दुणावला आहे. सध्या ते अशी उमेद व्यक्त करीत आहेत, की वर्षा दोन वर्षांतच संस्था सध्याच्या आर्थिक अडचणीतून निश्चितपणे बाहेर पडेल व आणखी दोन तीन वर्षे शेतीने जर चांगला हात दिला तर हरिजनांचे प्रत्येक सभासद कुटुंब पूर्णपणे कर्जमुक्त झालेले असेल. तोवर मात्र संस्थेच्या कार्याविषयी सहानुभूती बाळगणाऱ्यांच्या सहकार्याचा व मदतीचा लाभ संस्थेला होत राहावा अशी कार्यकर्त्यांची साहजिकच अपेक्षा आहे. ही अपेक्षा अनाठायी नाही हे वरील यादीवरून स्पष्ट दिसत आहे.

—संपादक, माणूस

यांच्या निस्वार्थ सेवेची राज्याला केवढी बरं गरज आहे....!

श्री. नाशिकराव तिरपुडे हे जबरदस्त गृहस्थ असले पाहिजेत. काँग्रेसच्या मध्यवर्ती निवडणूक मंडळाला वाकवून निर्णय बदलायला लावणे ही सोपी गोष्ट नव्हे. म्हणजे पूर्वी हे शक्य होते. आता इदिरा गांधींच्या राज्यात हे शक्य होणार नाही असे सर्वांना वाटत होते. विशेषत: निवडणूक मंडळाचे निर्णय मुळीच बदलणार नाहीत असे बडे नेते वारंवार ठासून सांगत असताना तर हे अशक्यच वाटत होते.

पण तिरपुडे म्हणजे जबरदस्त माणूस यात शंकाच नको. त्यांनी अखेरच्या क्षणी बड्या काँग्रेस नेत्यांना निर्णय बदलायला लावलाच. निवडणूक अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत ते मुंबईत होते. शेवटच्या दिवशी दिल्लीहून सकाळी बदलेला निर्णय कळताच त्यांनी ताबडतोब विमानाने नागपूरला उड्डाण केले आणि भंडारा जिल्ह्यात जाऊन आपला अर्ज भरला. असे वाटले, की तिरपुड्यांनी जणू अगोदरच विमानाचे तिकीट काढून ठेवले होते. तिरपुडे महत्त्वाकांक्षी आहेत. तडफदार आहेत. हुशार आहेत कार्यक्षमही आहेत असे सांगतात. आपल्या खात्यावर पक्की पकड ठेवून असतात. प्रसिद्धी कशी मिळवायची हे तंत्रही त्यांना ठाऊक आहे. मागास वर्गातून आल्याने त्यांच्या तडफदारपणाचे आणखीच कौतुक होते. तिरपुडे यांच्याकडे लक्ष ठेवायला हवे.

खरे म्हणजे निवडणूक लढविण्याची तिरपुडे यांची बिलकुल इच्छा नव्हती. फार झाले मंत्रीपद. आता जरा पक्षकार्यास वाहून घ्यावे असे त्यांना वाटत असावे. त्यामुळे तिकीट मिळविण्यासाठी त्यांनी स्वत: जराही प्रयत्न केले नाहीत. पण त्यांच्या जिल्ह्यातल्याच लोकांनी आग्रह धरला तेव्हा काँग्रेसच्या प्रदेश निवडणूक मंडळाने दिल्लीला त्यांचे नाव पाठविले. तेव्हा त्यांनी लोकाग्रहास्तव दु:खी अंत:करणाने संमती दिली. प्रधानमंत्र्यांनी सर्व मंत्र्यांना इंटरव्हयूसाठी दिल्लीला बोलावले म्हणून तेही नाइलाजाने गेले. इतर सात मंत्र्यांबरोबर त्यांचे नाव तिकीट यादीतून गाळले तेव्हा आज्ञाधारकपणे त्यांनी तो निर्णय शिरसावंद्य मानला.

पण आपल्या जिल्ह्यात तिरपुडे हे भलतेच लोकप्रिय गृहस्थ असले पाहिजेत. म्हणजे जिल्हा काँग्रेसमध्ये. तिरपुड्यांना तिकीट मिळाले नाही म्हणून भंडारा जिल्ह्यातली जनता एकदम प्रक्षुब्ध झाली. म्हणजे जिल्हा काँग्रेस (म्हणजे पदा-

धिकारी). जिल्ह्यातल्या काँग्रेस उमेदवारांनी अर्जच भरण्याचे नाकारले, पक्ष-पदाधिकाऱ्यांनी राजीनामे देण्याच्या धमक्या दिल्या, नागपूर विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांनी संपासाठी मोर्चे बांधले. एकच धमाल. एवढी लोकप्रियता दुसऱ्या कोणत्या मंत्र्याला मिळाली आहे ? आणि हे सगळे खुद्द तिरपुडे यांच्या इच्छे-विरुद्ध ! स्वतः तिरपुडे रोज जाहीर पत्रके काढून मुंबईतून या लोकांना आवर-ण्याचा प्रयत्न करीत होते. एक दिवस आमदारांना आवाहन, एक दिवस पदा-धिकाऱ्यांना, एक दिवस विद्यार्थ्यांना. म्हणजे रोजच्या रोज वृत्तपत्रांमधून प्रसिद्धी. अखेर त्यांच्या इच्छेविरुद्ध चालू असलेल्या या आंदोलनाला फळ आले तेव्हाही श्री तिरपुडे केवळ जनतेच्या इच्छेला मान देण्यासाठीच नाखुषीने भंडाऱ्याला निवडणूक अर्ज भरण्यासाठी गेले.

ही घटना खरोखरच अभूतपूर्व आणि उदात्त म्हणावी लागेल. आपल्या लाडक्या नेत्याला तिकीट मिळाले नाही म्हणून सत्तारूढ काँग्रेसपक्षातील अधिकारपदांचा त्याग करायचा, आमदारकीच्या तिकिटांसाठी एवढी भयंकर मारामारी करून ती मिळाल्यावर केवळ आपल्या नेत्याच्या प्रेमाखातर त्या मोहाकडे निष्ठुरपणे पाठ फिरवायची यापेक्षा दुसऱ्या कोणत्या उदात्त गोष्टी लोकशाहीत दिसू शकतील ? धन्य त्या काँग्रेसपक्षाची, की ज्यामध्ये लोकशाही आणि मानवी मूल्यांचा एवढा भव्योदात्त अविष्कार घडविणारे निःस्वार्थी कार्यकर्ते आहेत आणि धन्य तिरपुड्यांची की ज्यांना पक्षातील कार्यकर्त्यांचे एवढे अलोट निःस्वार्थी प्रेम लाभले आहे. आणि ते या कार्यकर्त्यांच्या लोभाखातर आपले मन मोडून आता निवडणुकीला उभे राहात आहेत. ते निवडून आल्यानंतर त्यांना जर मंत्रीपद मिळाले नाही आणि पुन्हा त्यांच्या प्रेमळ, निष्ठावंत, आज्ञाधारक कार्यकर्त्यांनी असेच ऊग्र आंदोलन करून तो निर्णय बदलविला तर श्री. तिरपुडे आपलें मन मोडून नाईलाजाने मंत्रीपद स्वीका-रतील यात शंकाच नको.

निर्लोभ प्रेमाचे आणि निःस्वार्थ त्यागाचे हे मनोरम दर्शन खरोखर गहिवरून टाकणारे आहे. काँग्रेसवर सत्तालोभाचा आणि सामान्य काँग्रेस कार्यकर्त्यांवर तिकिट-लोभाने लाचार बनल्याचा आरोप करणाऱ्या टीकाकारांच्या आणि विरोधी पक्षी-यांच्या थोबाडात यामुळे परस्परच बसली आहे.

परंतु या चपराकीने गप्प बसणारे हे विरोधक नव्हेत. त्यांना या सर्व घटनेमधेही राजकारण दिसते. काहीतरी घोटाळा दिसतो. तिरपुड्यांची लोकप्रियता एवढी प्रचंड आहे यावर त्यांचा विश्वास बसत नाही. त्यांना वाटते तिरपुड्यांनीच स्वतः हे सगळे प्रकरण घडवून आणले भंडारा जिल्हाकाँग्रेस म्हणे तिरपुड्यांच्या पंजा-खाली आहे. तिरपुडे म्हणे या जिल्ह्यातील पैसेवाल्या समाजाचे हस्तक. आणि या समाजाचे हात कुठपर्यंत पोचले नाहीत ? त्यांनीच दिल्लीला दबाव आणला. आणि तिरपुड्यांना तिकीट मिळवून दिले. वा रे व्वा ! यापेक्षा अधिक विकृत

दृष्टिकोन आणखी कोणता असू शकेल ? आणि आपल्यासारख्या सामान्यांनी या विरोधकांकडे लक्ष देऊ नये. कारण नजरेसमोर घडणाऱ्या घटनांचे विकृत विश्लेषण स्वीकारण्यापेक्षा त्यांचे उदात्त, आदर्श स्पष्टीकरण स्वीकारणे केव्हाही चांगले.

आणि खरेच आहे. समाजवादी दृष्टिकोन, शासकीय कार्यक्षमता, सचोटी, न्यायबुद्धी, कठोर निर्लोभीपणा आणि शुद्ध चारित्र्य याबाबतीत श्री. तिरपुडे तिकिटे मिळालेल्या इतर मंत्र्यांपेक्षा कोणत्या बाबतीत कमी होते ! याचा अर्थ तिकीटे न मिळालेले इतर मंत्री याबाबतीत डावे होते असा हात नाही. पण तिरपुडेंवर अन्याय का ? महाराष्ट्र मंत्र्यांची जी उज्वल समाजवादी परंपरा आहे त्यात श्री. तिरपुडे चपखल बसतात. नाईक, चव्हाण वगैरे सारखे वरिष्ठ आणि ज्येष्ठ मंत्री सोडून द्या. पण वर्तक, राजाराम बापू पाटील, झकारिया अशांच्या तोडीस तोड तर तिरपुडे आहेत ना ! मग त्यांना तिकीट का नाकारावे ? भंडारा जिल्ह्यातल्या कार्यकर्त्यांनी हे बरे केले. मध्यवर्ती निवडणूक मंडळाला चांगला धडा शिकविला.

वेळीच हे हाणून पाडले पाहिजे

आता असे सांगतात, की ज्या मंत्र्यांना तिकिटे मिळाली त्यांना पुढे मंत्रीपद मिळेलच असे नव्हे. या सर्व गोष्टींमधे आपल्याला एक पूर्वनियोजित महाराष्ट्र-विरोधी डाव दिसतो. अगोदर म्हणजे तब्बल आठ मंत्र्यांना यादीतून गाळणे यातच महाराष्ट्रविरोधी दुष्ट डाव खेळण्याची पूर्वचिन्हे दिसून आली. आपल्यापुरता तिरपुडयांनी हा डाव हाणून पाडला हे ठीक झाले. पण आता तिकिटे दिल्यावरही मंत्रीपद निश्चित नाही म्हणचे काय ! महाराष्ट्राच्या मंत्र्यांनी, सहकारी कारखानदारांनी, इतर उद्योगपतींनी, जमीनदारांनी आणि बड्या सहकारी अधिकाऱ्यांनी आर्थिक प्रगतीच्या बाबतीत जी नेत्रदीपक समाजवादी घोडदौड चालविली आहे, तीमध्ये खीळ घालण्याचेच हे कृष्णकारस्थान दिसते. महाराष्ट्रातल्या जागृत समाजवादी मतदारांनी या मंत्र्यांना एकमताने पाठिंबा देऊन वेळीच हा व्यूह हाणून पाडला पाहिजे.

आणखी एक सांगितले पाहिजे. तिकीट मेळाव्याच्या आधीच आपण निवडणूक लढविणारच नाही असा आपला कृतनिश्चय आपले कार्यक्षम समाजवादी मंत्री श्री. मधुकरराव चौधरी यांनी जाहीर केला तेव्हा अनेक जाणत्या महाराष्ट्र-प्रेमिकांच्या पोटात धस्स झाले असणार. खरोखर यापुढे तरी महाराष्ट्राच्या इतर मंत्र्यांनी लोकमताला भीक न घालता असे एकतर्फी निर्णय जाहीर करून अज्ञान मराठी जनतेला दूर लोटून पोरके करू नये अशी प्रेमळ सूचना आहे. पुढे श्री. चौधरी यांनी मोठ्या मनाने लोकमताला मान तुकवून तिकीट स्वीकारले ही गोष्ट वेगळी. पण तेवढ्या अवधीत अवघ्या मराठी जनतेच्या हृदयाचे पाणी पाणी झाले होते ना ! महाराष्ट्राच्या सर्व मंत्र्यांच्या गाढ अनुभवाची आणि निःस्वार्थ सेवेची राज्याला आज गरज आहे. वैयक्तिक स्वार्थापोटी कुणा आप्पलपोट्या मंत्र्याने निवृत्तीचा आगंतुक निर्णय घेतला तर जनता प्रेमाने त्याचा कान खेचून त्याला खुर्चीवर बसवील यात शंका नाही.

□ □ □

रवींद्र पिंगे

ख्यालावली

कोल्हटकरांचा मुलगा

चांगलं साठ वर्षं मागे चला. एकोणीसशे दहावं, अकरावं साल उगवलेलं दिसू द्या. त्यावेळच्या मराठी साहित्याच्या दुनियेत काय स्थिती दिसते ? आजूबाजूला बारके तारे लुकलुकतांना दिसतील. केशवसुत नावाचं शेंडेनक्षत्र मावळलेलं आहे. हरिभाऊ मावळू घातलेले आहेत ज्ञानकोशकार केतकर आणि वामन मल्हार जोशी यांचा धड उदयसुद्धा झालेला नाही. फक्त रेवरंड टिळक आणि बालकवी तेवढे उगवलेले आहेत. काका खाडिलकरांचा जेमतेम उदय झालेला आहे. उरलेला खुर्दा आहे-आहे; नाही-नाही आणि दूर क्षितिजावर राम गणेश गडकरी नावाचा तेजःपुंज चंद्रमा पालवतो आहे. राम गणेशांच्या इतकं चांदणं ओसंडणारं लख्ख नक्षत्र आसमंतात कुठेच नाही. कविता घ्या, टीका-टिप्पणी घ्या, विनोद घ्या, नाटक घ्या, गडकरी मास्तर सर्वांवर ताण करून शे-दोनशे कोस पुढे गेलेले आहेत. त्यांच्या जवळपास वस्ती करण्याचं तर नावच सोडा, त्यांच्या प्रासादिक पाऊल वाटेवरून अनुप्रासबद्ध गद्याच्या कुबड्या घेऊन धावणाऱ्यांच्या तोंडालाही बादलीभर फेस आलेला दिसेल. गडकरी ते गडकरीच ! अशा त्या स्वयंप्रज्ञ साहित्यप्रभूने इतरांची विळाचाकोयत्यात खातरजमा करून श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनाच तेवढं समशेर लेखावं आणि कानांच्या पाळ्या पकडून त्यांच्या शिष्यत्वाची बांग पुन्हा पुन्हा आवर्जून घालावी, यातच कोल्हटकरांची पुण्याई साठवलेली आहे. खरं तर कोल्हटकरसुद्धा धुक्यातल्या नक्षत्राप्रमाणे निष्प्रभ होत चाललेले आहेत. गद्य आणि संगीत नाटक मंडळ्यांच्या गाद्या काका खाडीलकरांची वाट बघत आहेत आणि श्रीपाद कृष्णांच्या चोपड्या नाटकमंडळीत नुसत्या पडून आहेत. नाटककार म्हणून अस्तमान होत चाललेले कोल्हटकर पोथीची पानं पिवळी पडावीत तसे खामगावात काळाला शरण जात आहेत. चलती नसलेले पण नावाचा दबदबा असलेले आणि पुण्याईमुळे प्राप्त झालेल्या किर्तीचा लखलखाट पाडू शकलेले तात्यासाहेब चांदण्यात दिसणाऱ्या किल्ल्याच्या पडक्या बुरुजासारखे पूर्व दिव्य आठवीत आत्मचरित्राचे लेखन

आडगावी राहून करीत आहेत आणि त्या आत्मचरित्रात नावनिशाणीचाही उल्लेख नसलेला त्यांचा खट्टावलेला मुलगा प्रभाकर बापापेक्षा सवाई समशेर गाजवण्याची ईर्षा बाळगून ' रम्य भविकाल ' भोगण्यासाठी मुंबईच्या दिशेला लागला आहे !

तात्यासाहेबांनी साहित्यगुणांची उपज लाभलेल्या आपल्या मुलाचा नावनिशीवार उल्लेख आपल्या आत्मचरित्रात का केला नाही ? नजरचूक झाली ? शक्य वाटत नाही कारण अचाट स्मरणशक्तीचं दैवी देणं तात्यासाहेबांना लाभलेलं होतं. एक-पाठी तर ते होतेच. शिवाय ते शंभर वस्तू पाहून, परत नेमक्या त्याच क्रमाने त्यांची अचूक यादी करून देण्याचे प्रयोगही शाळांमधून करून दाखवीत असत. तेव्हा निव्वळ स्मरणाने दगा दिला हे कोल्हटकरांच्या बाबतीत संभवतच नाही. बाप-लेकांचा उभा दावा होता असही नाही. तसे कोल्हटकर विलक्षण भीरू होते. सोशिक होते. कनवाळू होते. न्यायनिष्ठ होते. सत्यव्रत होते. ते कुणालाही दुखवतील हे शक्य नव्हतं. गावोगावच्या लेखकलेखिकांची हस्तलिखितं ते डोळ्यात तेल घालून वाचून त्यांत सुधारणा सुचवीत असत. नव्या उगवत्या पिढीबद्दल त्यांना कोण जिव्हाळा ! पण खिडकीबाहेरचा सूर्योदय भान हरपून पाहणाऱ्या तात्यांना, स्वतःच्या घरात आपल्याच पोटचा मुलगा साहित्यात बाजी मारू इच्छितो हे मात्र दिसू नये हे किती विपरीत आहे ! माझी मुले सुव्रत निघतील अशाप्रकारची एक ओळ तात्यांनी लिहीली आहे. म्हणजे एका ओळीत त्यांनी सर्व अनामिक मुलांना कोंबलं आणि वि. सी. गुर्जरांवर मात्र तावच्या ताव लिहून काढले ! विसाव्या शतकाच्या बहात्तराव्या पावटणीवर उभं असताना असल्या फालतू गोष्टीचं आप-ल्याला काही वाटत नाही. मात्र तात्यांचं नाव ज्याला केवळ लावायचंच नव्हतं, तर जोडीला जागवायचंही होतं, त्या प्रभाकरबापूंचं मस्तक मात्र या अनुल्लेखामुळे सुन्न झालं होतं. अर्थात, भांड्याला भाडं लागलं असंही नाही. लहरीत असले म्हणजे प्रभाकरबापू तात्यांबद्दल कैवारही घेत. पुढे आपलं पुस्तकही त्याने वडिलांच्या स्मृतीला अर्पण केलं. तथापि, त्या संबधी ते फारसे बोलतही नसत. तात्या केळे-वाडीच्या तोंडावरच्या सोमण निवासात उतरत. तिथे त्यांचे चहाते आणि चमचे जमले की तात्या पुकारत, ' बापू, यांना ते नारायणरावांचं पेटंट पद म्हणून दाखव रे. ' अज्ञाधारक प्रभाकरबापू मग ओठांचा चंबू करून ' सुजन कसा मन चोरी ' या पदाची शीळ घालून दाखवी. होय, प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर हा पट्टीचा शीळ घालणारा तरुण त्या काळात होता. त्यांना दोन गोष्टी उत्तम येत. तोंडानं शीळ घालून बालगंधर्वांच्या गायकीची सहीन सही नक्कल करणं आणि उत्तम चपात्या भाजणं !

सध्या गिरगावात जिथे सेंट्रल सिनेमा आहे तिथे पूर्वी एक छोटीशी बंगली होती. तिथल्या वरच्या माडीवर प्रभाकरबापूंनी आपलं चंबूगवाळं टाकलं होतं. त्याकाळात आचार्यपद न चिकटलेले पुण्याचे अत्रे मास्तर आपल्या मुंबईच्या मुक्कामात या

ब्रह्मचाऱ्याकडे उतरत. तो सडाफटिंग आणि जोडीला चमचाभर प्रेमवीरही असल्यामुळे दोस्तीला मजा येई. शेजारच्या काँट्रॅक्टर बिल्डिंगमध्ये राहणारे काणेकर अत्रे मास्तरांचे मित्र. मित्राच्या समाचाराला म्हणून ते प्रभाकरबापूंच्या मठावर आले आणि पुढे बापूंचे दिलाश्याचे दोस्त झाले. पण या साऱ्या पुढच्या गोष्टी झाल्या. त्याच्या अगोदर ते कामगार कार्यकर्ते म्हणून रेल्वेकामगारांच्या युनियनचे काम पाहू लागले होते. जिथे तात्यासाहेब सुरुवातीला उतरत. असत त्या सोमण निवासातच एस. सी. जोशी वकीलांचा लॉ क्लास होता. तिथे बापू कायदा शिके. त्या लॉ क्लासमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी बॅ. कीर्तीकर येत. त्यांची नि बापूंची गट्टी जमली. यातून दोन गोष्टी जन्मल्या. एक म्हणजे बापूला पाठारेप्रभूंच्या पद्धतीची मटणमासळी चापायची चटक लागली आणि दुसरी म्हणजे बॅ. कित्तीकरांनी आप्पा जोशींना बापूला कामगार कार्यकर्ता म्हणून चिकटवून देण्याची गळ घातली. नाटककार बापाचा हा बापू मुलगा रेल्वे कामगारांची गाऱ्हाणी वेशीवर टांगण्यासाठी मग रेल्वे मेन युनियनचा तरुण कार्यकर्ता जी. आय. पी. रेल्वेने सतत प्रवास करू लागला. पोष्टमनच्या पगाराचा हेवा करावा अशा तट्टन भिकार लायकीचे पगार तेव्हाच्या जी. आय. पी. वाल्यांना होते. रुकुटुकू करणाऱ्या त्या कारकुनांचे ओढगस्तीचे संसार बापूंनी फार जवळून निरखले. त्यांच्या वाताहतीवर 'युनियन हेरल्ड' या कामगारपत्रात लेख लिहिले. पण कामगारकार्य हे बापूंचे सहजकर्म काही जाम होईना! या रेल्वेच्या पीडित कामगारांसाठी कुणी तरी कुठून तरी किल्ल्या फिरवल्या पाहिजेत एवढचा सदिच्छेवरच बापूंनी ती छावणी सोडून दिली. बापासारखं वकील होण्यासाठी त्यांनी पुणं गाठलं. पण फर्स्ट एल. एल. बी. वरच समाधान मानून त्यांना वकिलीच्या कोपरापासून हात जोडावे लागले! बाकी बापासारखी वकिली करून बापू काय मोठे झेंडे रोवणार होते, देव जाणे. एकतर तात्यांची आडगावची वकीली पार आटली होती. शिवाय खोटी केस चालवणार नाही या व्रताचे ते सख्त बंदे होते. तेव्हा खरं तेच बोलणाऱ्या नि खऱ्याचीच तेवढी फत्ते करून देण्यासाठी घसा खरवडणाऱ्या वकीलाच्या दारात कोण डोकावणार होतं? बापूंनी वकील होऊन सत्यव्रती बापाच्या पावलावर पाऊल टाकण्याचा आटापीटा केला असता तर खामगावाच्या धुळीत त्यांचा पार धुव्वा उडाला असता.

परतुनि आलेल्या मोरूसारखें ब्रह्मचारी बापू मुंबईला परतले ते बरंच झालं, कारण त्यांना हाताशी दोन जोड क्षेत्रं सापडली; वाङ्मयाचं आणि जाहिरातीचं. तिसरं क्षेत्र छुपं होतं--प्रेमपात्र धुंडाळण्याचं. पण बापूंचा दैवयोग असा, की छुपं क्षेत्र समुद्रात फेकलेल्या हारांसारखं तरंगत तरंगत वर आलं आणि वाङ्मयसेवेच क्षेत्र समुद्रात विसर्जित केलेल्या गणपतीसारखं पार तळाशी गेलं! पोटासाठी बापू

पृष्ठ ५६ वर

निवडणूक मतप्रवाह

मतदारांच्या उदासीनतेचा धोका

वा. दा. रानडे

देशाच्या तीन चतुर्थांश भागात विधानसभांच्या निवडणुका ६ ते ११ मार्चच्या दरम्यान पार पडणार आहेत. दर चार पाच वर्षांनी किंवा त्यापेक्षाही कमी काळाने येणाऱ्या या निवडणुकांतून आपल्या लोकशाहीचे पाऊल खरोखरच पुढे पडत आहे काय? समाज परिवर्तनाच्या दृष्टीने निवडणुकांचे महत्त्व किती? या वेळच्या निवडणुकीत कोणते महत्त्वाचे प्रश्न आहेत? सत्तारूढ पक्ष, विरोधी पक्ष, राजकीय विचारवत आणि सर्वसामान्य मतदाराची त्याबाबत काय भूमिका आहे? या प्रश्नांच्या अनुरोधाने काही विचार मांडण्याचा हा प्रयत्न.

पहिला प्रश्न सध्याच्या निवडणुकातून लोकशाहीचे पाऊल खरोखरच पुढे पडत आहे काय? जगातील सर्वांत मोठी लोकशाही म्हणून भारताचा गौरव परदेशातील लोक करतात. स्वातंत्र्याच्या पंचवीस वर्षांत चार निवडणुका आपण शांतपणे पार पाडल्या. गेल्या वर्षी लोकसभेची पाचवी मुदतपूर्व निवडणूक झाली आणि आता विधानसभांसाठी पाचव्या निवडणुका होत आहेत. शेजारच्या देशात हुकुमशाही, लष्करी राजवटी आल्या असता आपण लोकशाही टिकवली खरी, पण अधिक खोल विचार केला तर असे दिसते, की आपण केवळ लोकशाहीची बाह्य चौकट टिकविली आहे. आपल्या लोकशाहीचे अंतरंग पाहिले तर जातींच्या, गटांच्या, पैशाच्या व सत्तेच्या दडपणाखाली ती दबली गेलेली आहे. ही दडपणे दूर झाल्याशिवाय निवडणुकांतून खऱ्या अर्थाने लोकमताचा कौल व्यक्त झाला असे म्हणता येणार नाही. आणि ही दडपणे दूर करण्यासाठी निर्धाराने परिणामकारक पावले टाकली जात नाहीत तोपर्यंत लोकशाहीला बळकटी येणार नाही.

दुसरा प्रश्न, समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने या निवडणुकांना कितपत महत्त्व आहे? मताचा हक्क हे लोकांच्या हाती असलेले प्रभावी शस्त्र आहे. मतपेटीने सरकार बदलता येते हे १९६७ सालच्या निवडणुकीत आठ राज्यांतील काँग्रेस सरकारे

पाडून जनतेने दाखवून दिले. जात, गट, पैसा व सत्ता या चार दडपणांचा उल्लेख मी वर केला. ही दडपणे असतानाहीं आठ राज्यातील सरकारे जनतेने खाली ओढली याचा अर्थ काही प्रसंगी दडपणांना न जुमानण्याइतके जनमत प्रभावी होऊ शकते. पण असे फार थोड्या प्रसंगी घडते. किंबहुना ती एक प्रकारची लाट असते असे म्हणणे अधिक बरोबर होईल. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या लाटेने १९५७ साली पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेस अशीच जवळजवळ नामशेष करून टाकली होती. काँग्रेस राजवटीबद्दलच्या सार्वत्रिक असंतोषातून उद्‌भवलेल्या प्रचंड काँग्रेस विरोधी लाटेने १९६७ मध्ये आठ राज्यात काँग्रेस सत्तेचा बळी घेतला.

आठ राज्यात काँग्रेसतर पक्षांच्या आघाड्यांची सरकारे अधिकारावर आली पण ती फार काळ टिकली नाहीत. काँग्रेसपेक्षा अधिक चांगला कारभार ती करून दाखवू शकली नाहीत. आपसातील मतभेद, गटबाजी, सत्तास्पर्धा, संधिसाधु पक्षांतरे यामुळे ही सरकारे फार काळ टिकली नाहीत. जनतेने विरोधी पक्षांना दिलेली संधी त्यांनी गमावली. दरम्यानच्या काळात बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, जमीन सुधारणा इत्यादी कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी धडाडीची पावले इंदिरा गांधी टाकीत आहेत असे दिसू लागले, तेव्हा लोकमताचा लंबक पुन्हा काँग्रेसकडे झुकला. १९७१ मधील लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकीत पंडित नेहरूंच्या काळाएवढे यश इंदिरागांधींनी काँग्रेसला मिळवून दिले. पण इंदिराजींच्या या यशाबरोबरच त्या यशाच्या मर्यादाही लक्षात घेतल्या पाहिजेत. या मर्यादांकडे राजकीय निरीक्षकांनी फारसे लक्ष वेधलेले नाही. लोकसभेच्या दोन तृतीयांश जागा इंदिरा गांधींच्या काँग्रेसने जिंकल्या खऱ्या पण त्या पक्षाला मते मात्र ४३.६४ टक्केच मिळाली. याचा अर्थ बहुसंख्य लोकमताचा पाठिंबा काँग्रेसला नव्हता. इंदिराजीच्या यशाची दुसरी मर्यादा म्हणजे एकूण मतदानच कमी झाले. १९६७ साली ६१.३३ टक्के मत झाले. ते १९७१ मध्ये ५४.८१ टक्क्यांपर्यंत घटले ते म्हणजे ६.५२ टक्के मतदान कमी झाले. मतदान कमी होण्याचा फायदा सत्तारूढ पक्षाला मिळतो तसा तो काँग्रेसला मिळाला. मत न देणारे हे लोक मुख्यतः काँग्रेस विरोधी असून त्यात मध्यमवर्गीयांचा भरणा जास्त होता. निर्णायक बहुमताची खात्री वाटत नसल्याने आपल्या पक्षाचे जास्तीत जास्त मतदान झाले पाहिजे याबद्दल सत्तारूढ काँग्रेसचे कार्यकर्ते जागरूक होते. मत देणारात त्यांचे मतदार फार थोडे होते. मुख्यतः काँग्रेस विरोधी असलेल्या या साडेसहा टक्के मतदारांनी मते दिली असती तर इंदिरा गांधींना एवढा दणदणीत विजय निश्चितच मिळाला नसता. हे मतदार आपल्या मतदान हक्काबद्दल उदासीन राहिले याचे कारण त्याना कोणताच पक्ष पसंत नव्हता. मनाने ते काँग्रेस विरोधी होते. गेल्या निवडणुकीत त्यांनी मोठ्या उत्साहाने विरोधी पक्षांना मते दिली होती व आ ट

पृष्ठ ४८ वर

नलिनी अंबाडे

वंद हो जा सिम सन

अलिबाबा चाळीस चोरांच्या गुहेतील खजिन्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक खजिना असणारा मद्रासचा सत्तावीस कंपन्यांचा सिम्प्सन समूह, बघता बघता थंडगार पडला. कशामुळे ? लेबर ट्रबल्स मुळे ? नव्हे, त्यांच्या नावाखाली खेळल्या जाणाऱ्या राजकारणाच्या धुळवडीमुळे, म्हणजेच पोलिटिकल ट्रबल्समुळे ! पुढे या संपामुळे काय काय झाले, सोळासतरा हजार कुटुंबांची कशी दोन महिने उपासमार झाली तो मजकूर 'खुल जा सिम सन' मध्ये तुम्ही वाचलाच आहे. पुढे बारा जानेवारीस संप मिटला व फॅक्टरी उघडली. अर्थात तशी ती बंद नव्हतीच म्हणा. लोक कामावर जात नव्हते. ज जात त्यांना चोप मिळे. त्यामुळ संप मिटताच लोकांना हायसे वाटले. पण आगी पेक्षा फुफाटा बरा असं काहीतरी मराठीत म्हणतात ना, तसाच काहीसा प्रकार आमच्या मद्रासला झाला. इतके दिवस 'खुल जा ! खुल जा ! !' म्हणणाऱ्यांवरतीच केवळ आठ दिवसात 'बंद हो जा सिम सन ! बंद हो जा सिम्प्सन' म्हणण्याची पाळी आली.

इतके दिवस चाललेल्या संपाला सत्तारूढ द्रमुक प्रणीत युनियची मान्यता नव्हती. किंवहुना बिगर निवडणुकीचे काटूर गोपाळ युनियन अध्यक्ष बनून कामगारांच्या वतीने कसलातरी भयानक करार करून बसले म्हणूनच संप झाला होता. द्रमुक-युनियनवाले रोज कामावर जाऊन हजेरी लावून केवळ पगार खिशात घालू लागले. इतर संपवाल्यांना हे कसे बरं पाहवणार ? मग, त्यांना कामावरून परतताना पिटणे सुरू झाले. पुढे संप मिटल्यावर पारडे फिरले. संपकाळात कामावर आलेल्यांचा समाचार आता कामाच्या आठ तासात घेतला जाऊ लागला. त्याला जशास तसा जवाब दिला जाऊ लागला. ठोसाठोशी आणि हाणामारी अगदी राजरोस–पोलीसांदेखत. काव काव इतकी वाढली, की काटूर गोपाळ महाशयांनी २२ जानेवारीस राजीनामा दिला.

त्याच दिवशी तमीळनाडू सरकारने असेंब्लीत जाहीर केले, की लौकरच एक कायदा करण्यात येईल. त्यानुसार कोणत्याही कामगार संघटनेमध्ये फक्त त्या

कारखान्याच्या कामगारांनाच प्रवेश मिळेल. बाहेरच्यांना सेक्रेटरी वगैरे करता येणार नाही. दुसऱ्या एका कलमानुसार एका कारखान्याची एकच युनियन मान्य होईल. घोषणेचे सर्वत्र स्वागतच झाले. बहुतेक युनियन्सचे सेक्रेटरी वा अध्यक्ष किंवा खजीनदार ही मंडळी, वकील डॉक्टर्स नाहीतर कुणीतरी पैसेवाली माणसे असतात. त्यांना धड कामगारांच्या अडचणींची कल्पना नसते, ना व्यवस्थापनाची माहिती असते. युनियन हे केवळ त्यांचे खेळणे बनते. भडक भाषणे, चिथावण्यांनी ते लोकप्रियता कमवतात अन निवडणुका जिंकतात. अर्थात द्रमुक सरकारने सुद्धा ही घोषणा, काटूर गोपाळच्या राजीनाम्यानंतरच केली, तोवर केली नाही. अर्थात् या दोन्हीही घोषणा भाई भाई मंडळींना कशा आवडणार? जितक्या युनियन्स अधिक तितका विचका अधिक. असेंब्लीतच राममूर्ती यांनी (कम्युनिस्ट मार्क्सवादी) कडाडून विरोध केला. राष्ट्राध्यक्ष गिरी, नेहरू, चित्तरंजनदास हेसुद्धा कामगारांचेच पुढारी म्हणून प्रथम पुढे आले; ही उदाहरणेही त्यांनी दिली.

काटूरं गोपाळच्या राजीनाम्यास विराध म्हणून द्रमुक युनियनवाले केवळ हजेरी लावून बसून राहू लागले. ते पाहून इतरांनीही बैठा सप पुकारला–तो दोन दिवस टिकला. तीन हजार कामगारांनी काम बंद पाडले व मिरवणूक काढली. त्यांचा बदला २४ जानेवारीस दुसऱ्या युनियनवाल्यांनी घेतला. त्या दिवशी समोरासमोर लढाईस तोंड लागले. सायंकाळी ४।। वाजता पहिली पाळी संपते. त्याचवेळी हजारभर लोक गेटाबाहेर उभे होते–अगदी लाठ्याकाठ्या, दंडेसोटे, चाकूसुरे यांनी सुसज्ज. कुणीही बाहेर जाईना. उलट ते पण हातांत रॉडस्, पाने, कानशी, हातोड्या घेऊन तयार झाले. वातावरण इतके प्रक्षुब्ध झाले, की पोलीसही अपुरे पडले. त्यांनी शेवटी कामगारांचा लाडका नेता राममूर्ती यास बंद व्हॅन मधून तेथे आणले–'शस्त्रे खाली ठेवा' हे सागण्यासाठी. पण तेवढ्यातच जी काही थोडीशी लढाई झाली तीमध्ये फक्त ५४ जण जखमी झाले. दोन मृत्यू आहेत म्हणे, पण त्याला अद्याप अधिकृत दुजोरा मिळत नाहीच. अर्थातच कंपनीने तीन दिवसांची सुट्टी जाहीर करून गेटाला टाळे ठोकले. सुट्टीच्या काळात कामगारांच्या चाळीत मारामाऱ्या झाल्या. कामगारांसाठी मोठ्ठी कॉलनी कंपनीने बांधलीय. त्या तिरुविकानगर व आरव्हीनगरात घरांवर दगडफेक, सायकल चेन्सचा वापर झाला. बायाबापड्यांना दम दिला. लोक घरे सोडून निघून गेले.

कामगारांच्या चळवळीस मग इतर कामगारांनी सहानुभूती दाखवावयची असते जणू. आणि त्याचा एकमेव मार्ग म्हणजे संप! सिम्प्सनला सहानुभूतीचे लोण कुठवर पोचले? २० जानेवारीस 'मदुरा बंद'! त्याच दिवशी तिकडे तुतिकोरीन बंदरातील ५००० कामगारांनी संप केला. आता त्याला काहीतरी कारण तर दाखवायला हवे ना? कोलंबोवरून निघालेला एक मचवा सात जानेवारीपासून बेपत्ता आहे. त्यावर म्हणे अकराजण आहेत. अथांग महासागरात 'गाझी'चा पत्ता

लागत नाही तर मचव्याचा काय लागावा...? सरकारने वेळीच विमाने पाठवून शोध घेतला नाही हाच आरोप इथे पुरेसा झाला. जणू काही सत्यनारायणाच्या कथेप्रमाणे संप करताच तो मचवा एकदम पृष्ठभागावर दिसू लागणार होता ! पंचवीस जानेवारीस मद्रासमधील सर्वांत मोठ्या बिन्नी कापडाच्या मिलमधील तीन हजार कामगारांनी अशीच काहीतरी कुरापत काढली. हां हां म्हणता ही साथ आवाडी, अंबतूर, पूंदमल्ली, गिंडी, येथील औद्योगिक परिसरात पसरली. नाहीतरी या भागातील प्रत्येक कारखान्यांसमोर बारमाही लाल झेंडे व उपोषणवाल्यांसाठी एक झोपडे असतेच. आवडो येथील पोलिसांच्या लाठीमारात कुचेलर हा नेता (कम्युनिस्ट) जबर जखमी झाला. शनिवारी २९ रोजी त्याबद्दल कामगारांच्या मोर्चाने मूरमार्केट (मद्रास सेंट्रल रेल्वे स्टेशनजवळ) भागात बसेसना आगी लावल्या. हां हां म्हणता मद्रासमधील औद्योगिक परिसर भयभीत झाला...रोज कुठे ना कुठे लाठीमार अन् अश्रुधूर आहेच...शेकडो जखमी अन् हजारो कामगारांचा रोजंदारीचा तोटा...इच्छा असूनही कामावर जाता येईना. कारण दहशतीचे वातावरण...घरच्या बायका पोरांना भीती...गुंडगिरीस ऊत आला. त्यामध्ये नक्षलवादी अन् वैयक्तिक हेवेदावे आले...युनियन्स अनेक, त्यांचे पुढारी अनेक त्यांमध्ये प्राबल्य मार्क्सवाद्यांचे...आगीत त्यांनी चियावणीच्या भाषणांनी तेल ओतले...त्या आगीत राष्ट्रीय उत्पादनाच्या उद्दिष्टांची होळी होत आहे...त्याच तापल्या तव्यावर प्रत्येक राजकारणी पक्ष आपापली पोळी भाजून घेताहेत...संप मागे घेऊनही सिम्प्सन समुहात फारसा फरक नाहीच. उलट जोडीस तो वणवा पसरला आहे. राजकारण त्यात कालवले जाते आहे.

शुक्रवारी २८ जानेवारीस, केंद्रिय अर्थखात्याचे राज्यमंत्री श्री. गणेशन् 'गुपचुप' हॉस्पिस्टलमध्ये जखमी असणाऱ्या कम्युनिस्ट नेत्यांना भेटून लगोलग दिल्लीस परतले. राज्यसरकारला पत्ताही नव्हता म्हणे. तरीही मग त्यांना हॉस्पिटलचे दारातच हटकले कसे ? इथे राजकारणाचा, येत्या सार्वत्रिक निवडणुकीचा काहीतरी वास येतोय. तें बाकीचे तर्कवितर्क काहीही असोत ! आजच्या नाजुक क्षणी सारा देश पेटून उठलेला असताना प्रत्येकजण एकेक दिवसाचा पगार संरक्षणनिधीस देत असताना, एकीकडे राष्ट्रीय उत्पादन वाढविण्याच्या घोषणा अन् दुसरीकडे हे सारे, ही लक्षणे काही ठीक नव्हेत. सिम्प्सन समूह बद होता तेव्हा तरी परिस्थिती बरी होती असं वाटू लागलंय. मग काय म्हणायचं पुन्हा 'बंद हो जा सिम सन ! बंद हो जा सिम्प्सन" ?

□ □ □

पाकव्याप्त सिंधमधील हिंदू

गौतम व्होरा
युद्धवार्ताहर, टाइम्स वीकली

अनुवाद
म. श्री. दीक्षित

पाकिस्तानच्या कच्छ विभागातील सारो नावाचं एक छोटं गाव. सीमेपासून अवघ्या १७ किलोमीटर्स अंतरावर. भारतीय सैन्याची इथे छावणी पडली आहे. चहा आणि शुद्ध मोकळी हवा यांवरच सैनिकांना गुजराण करावी लागत आहे. आजूबाजूचा सारा प्रदेश रुक्ष नि वाळवंटी. अन्नधान्य वाहून आणायला पुरेसे उंट इथे नाहीत. विंगूरच्या पुढे वाहनांना सोयीस्कर असे रस्ते नाहीत. सारो गावातील बहुसंख्य हिंदुप्रजा भीतीने पळून गेली आहे. काही खेडुतांनी आम्हाला बाजरीची भाकरी नि कढण आणून दिले, ते आम्हास अमृतासमान वाटले.

रात्रभर खंदकाच्या आश्रयाला राहून आम्ही दुसऱ्या दिवशी जेव्हा सारो गावात गलो तेव्हा गाव जवळजवळ निर्मनुष्य दिसलं. एक छोटी लाघवी पोर पडळीबाहेरच्या ओटचावर बसली होती. आम्हाला पाहताच ती भयभीत होऊन आत पळू लागली. आम्ही धीर दिला तेव्हा कुठे ती शांत झाली. गावचे लोक आजूबाजूला लपून बसले आहेत हे तिनेच आम्हाला सांगितलं. एवढ्यात आमच्या काही सैनिकांसमवेत गावचा ठाकर घोडचावर बसून आला. पाक सैन्याने माघार घेताना काही रझाकारांनी व मुजाहिदांनी गावची लूटमार केली होती. या लूटमारीत वाचलेलं काही सामानसुमान मिळेल या आशेने ठाकूरसाहेब आले होते. ते आल्याआल्या आमच्या कमांडंटने त्याला विचारलं–

'काय ठाकूरसाहेब, का आलात परत? या मुलीला तुम्ही ओळखता का ?'

'होय साहेब, ही हरिजन मुलगी आहे व ते तिचंच घर आहे. हे गाव मेमन्स लोकांचं आहे. त्यांची वसती इथे हजारभर तरी असेल. गावात जी हिरवी इमारत दिसते ती मशीद आहे.'

युद्ध सुरू झालं तेव्हा सरहद्दीनजीकच्या अनेक खेड्यांतील लोक आत दूरवर पळून गेले होते. पण भारतीय जवानांच्या आगेकूचची वार्ता ऐकून हिंदू जनता गावोगावी परत येऊन स्थिरावली. कथ्था गावी आम्ही पोचलो तेव्हा गावकऱ्यांनी आमचं हर्षभराने स्वागत केलं. 'जय माताजी की' अशा घोषणा करत आमच्या कमांडरसह आम्हाला त्यांनी एका गोलाकार मातीच्या घरात नेलं.

आता निर्धास्त रहा

मग गप्पाष्टक रंगलं. धोतीकुडता घातलेला एक पांढऱ्या शुभ्र दाढीचा माणूस खूप काही सांगत होता. भोवतीची इतर माणसं अधूनमधून 'हो'ला हो करीत होती. आम्ही जरा भयभीत अवस्थेतच होतो. गप्पा रंगात आल्या असता आमच्यापैकी एकाने शंका काढली– 'आपण इथे सुरक्षित आहोत ना?' त्यावर एक गावकरी म्हणाला, 'मुळीच काळजी करू नका. भारतसेना आता इथे आली आहे. रझाकारांचे किंवा मुजाहिदांचे तुम्हाला मुळीच भय नाही.' ही सर्व मंडळी त्यांच्या बोलीभाषेत बोलत होती व ती आम्ही समजून घेत होतो. उर्दू, सिंधी व कच्छी बोलींचं मिश्रण त्यांच्या भाषेत होतं हे आम्हाला जाणवत होतं.

इकडील हिंदू प्रजेला अजूनही असुरक्षितता वाटत आहे. आमच्याबरोबर असणाऱ्या दुभाषाने त्यांना सांगितलं– 'तुम्ही आता निर्धास्त असा आणि इथे राहायचं की भारतात यायचं याचा नीट विचार करा.' त्यावर त्यांच्यापैकी एकेकजण विचारू लागले– 'आमच्याजवळील पाक चलनांचं काय? आम्ही भारतात आलो तर भारतीय रुपये आम्हाला बदली मिळतील का?' 'आम्ही ते मिळवून देऊ आणि काही अडचण आलीच तर तुम्ही उंट विकत घ्या व सरळ भारतीय हद्दीत या.' कमांडरने त्यांना दिलासा दिला. तो ऐकताच सर्वांनी माना नम्र करून आमचा जयजयकार केला व ते आजूबाजूला पसार झाले.

पाकव्याप्त प्रदेशात अनेक हिंदूंच्या आम्ही गाठीभेटी घेतल्या. कृष्णसिंग नावाच्या एका रजपूत ठाकुराने आम्हाला पुढील माहिती ऐकवली– 'मी जवळजवळ १०० एकर जमीन कसतो. इथे जमिनीला तोटा नाही. या वाळवंटी उजाड प्रदेशात हवी तेवढी जमीन मिळवावी व कसत राहावी अशी स्थिती आहे. इथे सारा उघड मामला आहे. युद्ध सुरू झालं तेव्हा मुसलमान आत लांबलांब पळून गेले. आम्ही इथेच गाडून उभे राहिलो. त्यांच्याबरोबर आणखी आत जाणं धोक्याचं होतं. इथल्या जवळपासच्या १६ खेड्यांतील सर्व ठाकूर लोकांनी भारतीय हद्दीजवळ आश्रय घेतला आहे. मी तीस वर्षांचा नुकताच लग्न झालेला माणूस आहे. आमच्या भागात विवाहाची फार मोठी समस्या आहे. राजपूतवंशाच्या मुली मिळणं कठीण

जातं. इथल्या तीन राजपूत जाती म्हणजे सोधा, राठोड व भाटिया. यांच्यात आपापसात विवाह होतात. आता या भागात राठोड आणि भाटिया लोक फार कमी झाल्याने आमच्यासारख्या सोधामंडळींना मुली मिळणं फार मुष्किल जातं. भारत-पाक हद्दीनजीकच्या प्रदेशात जाऊन आम्हाला स्थळं शोधावी लागतात. माझ्या सर्व बहिणींसाठी भारतातील वर पाहावे लागले.'

एके दिवशी दुसऱ्या एका गावचा ठाकूर हात जोडून आमच्यापुढे उभा राहिला व जेवणाचा आग्रह करू लागला. आम्हा बभुक्षितांना ती पर्वणी वाटली. पण कमांडरने याबाबतीत सावधानतेचा इषारा देऊन ठेवला असल्यामुळे आम्ही गप्प राहिलो. पाकव्याप्त वसतीत कुठेही घर वा दुकान लुटायचे नाही असा सक्त हुकूम आम्हाला होता.

भारतात प्रवेश द्या

× × × नावाचा एक नागरिक सांप्रत भारतीय सैन्याचा हेर म्हणून काम करीत आहे. भारतीय हद्दीपासून ३५ मैलांवर असणाऱ्या अलमसार गावचा तो रहिवासी. त्याने जी आपली हकीकत सांगितली ती अशी–'पाक सरकारी पंचायत कमिटीचा मी एक नोकर. ड्रायव्हर हा माझा पेशा. १९६२ पर्यंत मी ही नोकरी केली व नंतर गतवर्षापर्यंत आरोग्यखात्यात होतो. या सर्व कालावधीत हिंदू प्रजेवर किती अन्याय व जुलुमजबरदस्ती होते हे मी पाहिलं आहे. भोगलं आहे.१९६५च्या युद्धप्रसंगी सोधा करंजीला भारताचा हेर समजून अतोनात छळले. बाँब टाकून त्याचं घर उध्वस्त केलं गेलं आणि त्याला तुरुंगात डांबण्यात आल. त्याची कुटुंबीय मंडळी ठार मारण्यात आली. नया चौ गावच्या सुरतसिंग ठाकुराची अशीच गत झाली. त्या बिचाऱ्याला संशयावरून ठार मारले. असमदास शेठ नावाच्या एका गिरणवाल्याला हैद्राबादजवळ ठार मारण्यात आले व त्याची मोटार जाळून टाकली. हे कृत्य मी डोळ्याने पाहिलं आहे. पाकिस्तान सरकारची ही सर्व कृत्ये पाहून मला ऊबग आला. काही दिवसांनी माझ्याकडे वक्रदृष्टी वळली तेव्हा मला जीविताची शाश्वती वाटेना. मला पकडण्यासाठी पोलीस यत्न करू लागले. एके दिवशी जीपमध्ये बसून मी पोबारा केला. या सारो गावनजीक ज्या झोपड्या दिसतात तिथे पाकसैनिकांचे अड्डे होते. इथून जात असताना त्यांनी मला हटकले. पण त्यांच्या हातावर तुरी देऊन मी निसटलोच. सांप्रत माझं वय २६ आहे. मी लवकरच एका भारतीय वधूशी लग्न करणार आहे.'

मी ज्या ज्या हिंदूंशी, विशेषत: ठाकूरांशी बोललो ते ते सारे भारतात येण्यास उत्सुक दिसले. त्यांची व्यथा त्यांच्याच शब्दात–'साहेब, आम्ही भारताशी एकरूप होऊ इच्छितो. आमच्या अविवाहित मुली मोठ्या झाल्या आहेत. आम्ही रहातो या कच्छच्या भागात मुसलमान बहुसंख्य आहेत. त्यांच्या नजरा आमच्या मुलींवर आहेत. आमची सर्व बाजूंनी त्यांनी नागवणूक चालवली आहे. बनिया काफर असं

हिणवून आम्हाला ते साधं दूधदेखील मिळू देत नाहीत. हिंदू माणसाचं जीवित नि हिंदू स्त्रीचं शील इथे सुरक्षित नाही. कृपा करा आणि आम्हाला भारतात प्रवेश मिळवून द्या.'

जालू नावाच्या ठाकुराला 'मुलांच्या शिक्षणाचे भवितव्य काय?' असा प्रश्न केला तेंव्हा तो जरा उसळूनच म्हणाला 'मुलांना शिकवून उपयोग काय? त्यांना सरकारी नोकऱ्या मिळण्याची सुतराम आशा नाही. मग शिक्षणाला पैसा का खर्चायचा? सारोला येथे एक शाळा आहे तिथ फक्त सिंधी व उर्दू शिकवलं जातं. दिप्लोच्या हायस्कूलमध्ये इतिहास, भूगोल, गणित शिकवतात. पण मुलांना तिथे पाठवून भवितव्य नाही. यापेक्षा मुलांना घरची शेतकामं सांगण्यात आमचा फायदा आहे.' पंचायत कमिटचात तुम्हालाला वाव किती आहे हे विचारताच उत्तर मिळालं. 'हिंदू कधीही अध्यक्ष होऊ शकत नाही. किंबहुना एकाही पंचायतीत हिंदूंना प्रतिनिधित्व नाही. निवडणुका आमच्यासाठी नाहीतच. आमचे उमेदवारी फॉर्मस् नष्ट करण्यात यतात. आमच्या मताला इथे काही किंमत नाही. कर्जे दिली जातात ती फक्त मुस्लिम शेतकऱ्यांना.'

हेलिकॅप्टरमधून नंतर आम्ही नागरपारकर व विरव्हा या गावी उतरलो. पाक राडारचा धोका असल्यामुळे हेलिकॉप्टरचे उड्डाण जमिनीपासून कमीकमी अंतरावरून होत होते. विंगूर आणि सारोच्या मानाने या भागातील जमीन सुपीक होती. दक्षिण भागाचे सेनानी ले. जनरल बेवूर यांचे नागारपारकरच्या लोकांनी उत्साही स्वागत केले. इथल्या लोकांच्या समस्या इतरांप्रमाणेच होत्या. या भागात सुमारे ३० हजार हिंदू राहतात. भारतीय सैन्य मागे घेतले तर सर्वांनी भारताचा आश्रय घेण्याची मनीषा बोलून दाखविली. हा सुपीक भाग भारताने सोडून दिला तर लष्करीदृष्ट्या ती एक मोठी चूक होईल व शिवाय येथल्या हिंदूंचा विश्वासघात होईल तो होईलच. विंगूर व सारो भागात आम्ही पाच दिवस होतो. येथील जनतेकडे पाक सरकारचे पूर्ण दुर्लक्ष आहे. बंदुकीच्या दबावाखाली इथली प्रजा इतकी वर्षे जगली हेच आश्चर्य आहे. युद्धबंदीची घोषणा झाली तेंव्हा या भागातील शूर सैनिकांची फार निराशा झाली. पाकहद्दीत पंचवीसतीस मैल घुसूनही त्यांना शत्रूशी खराखुरा सामना करता आला नव्हता. निराश झालेल्यांना कमांडरने शेवटी सबुरीचे शब्द ऐकवले 'शत्रू लांब पळून गेला आहे. त्याचा पाठलाग करण्याचा हुकूम नाही. सारोपर्यंत आपण धडक दिली हा विजय काही थोडा नाही. थांबू या आता.'

□ □ □

निवडणूक : तर्कवितर्क

एक दिवस अशीही बातमी येईल

पुनर्कथन : जिप्सी मधुकांत

वृत्तपत्रांची माथी निवडणूक यादवीच्या टपोऱ्या शीर्षकांनी रोज झळकत आहेत. फिरत्या रंगमंचावरील दृश्ये फिकी पडतील असे कितीतरी राजकीय प्रयोग पडतझडत आहेत।

तिकिटवाहिनीने दिल्ली दरबारी हेर पेरले आहेत।

निराक्षकांपुढे कैफियती झडत आहेत. याद्या जाहीर होतात. पुन्हा फिरवल्या जातात. बातमीदारांची लगबग. अनेक अंदाज. तर्कवितर्क.

पण भरवशाच्या म्हशीला... अंदाज धडाड कोसळतात.

कुणाकुणाचे किती उमेदवार ?

कोणता गट, कोणाची सरशी, कोण खरा समाजवादी ?

फोरमच्या फिरक्या घुमतात.

पण या सर्व नाट्याचे सूत्रधार कोण ?

श्रेष्ठींपुढे कोण कस बोलतं ? कोण नांगी टाकतं ? बळीचा बकरा कोण होतं ?

एखादे दिवशी बातमी येते :

खासदार प्रकाशचंद्र सेठी मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून सूत्रे स्वीकारतात।

राज्याराज्यात आणखी नवी नांदी.

हे सारे काय आहे ? वाचकांना पुष्कळ माहीत आहे. कंड्याही खूप पिकतात तरी प्रत्यक्ष पडद्याआड काय घडले ?

शीर्षकांच्या लाटातून नेहमीच शबल सत्य फेसाळत असते.

इंदिराबाईंच्या अनेक पडदी रंगमंचातून बाहेर आलेल्या खुषी नाखुषीचे मुखवटे टाकून काही नटांनी प्रक्षेपित केलेले हे नाटच.

त्याची ही थोडीशी झलक. □

आपल्याच पिसांनी विद्ध

एक लिबियन रूपक आहे. कुणाच्या तरी अचूक शरसंधानाने घायाळ गरूड म्हणतो–

Once an Eagal stricken with dart, said, when he saw the fashion of the dart, ' With our own feathers, not by other's hands, are we now smitten. '

या बाणाच्या टोकाला लावलेली पिसं ती माझीच आहेत ! पंख भेदून मी विद्ध झालोय...

आता निवडणुकीच्या नौबती-भेरी झडत आहेत. त्यातली शरसंधाने आणि कुस्त्यांचे जमवलेले जोड...आणि आपल्या कळपाकडून शिकार झालेले भले भले... त्या विद्ध गरुडाच्या उद्‌गारांची आठवण करून देतात.

मुख्यमंत्रीपदाच्या वादाचे पिलू मोकाट सुटले तेव्हापासून या पाळीपाळीच्या राजकारणाने पुन्हा उचल खाल्ली. कोण पात्र, अनुभवी किंवा कुशल चतुर इत्यादी पंचतंत्रातले निकष तेथे लावणे बालिशपणाचे.

ही लोकसत्ता आहे. दारोदार अतिथी शोधत असते.

परिपक्व, मधुर फळांनी आपसातच भांडण पेटवले. मीच अधिक गोड. पण लोकांच्या तोंडात जायला कुणाची तयारी ?

सारे झाडालाच चिकटून राहू म्हणत होते. तेथेच माधुरी, गंध चांगला दरवळतो ! सत्तामस्त फळे,

मुख्यमंत्रीपदाच्या वादाने उत्तरेच्या शिखरांकडे प्रयाण केले.

पण पूर्वेला लाल पाट वाहत होते. तोवर पश्चिमेला सूर्य मावळायला तयार नव्हता. □

आखाड्यांची उभारणी

प्रत्येक मतदारक्षेत्राची चाचपणी होते. कोण कुणाचे म्होरके ? इमले शेले पाहून सलामी झडते ' रिव्हिएरा 'वर. पण अनेक वाद, समाजवादाचे तजेल पाणी, फोरमचे घोष...हर प्रकार होऊनही वरात नवरदेवाला शोधत असते. दिल्लीच्या वाऱ्या झडतात. दिवस नाही, रात्र नाही. भूक नाही, तहान नाही. मिनी-शिवाजीच्या दरबारात म्होरक्यांचीच कुस्ती फसते. मग पाठीराख्या चेल्यांची स्वारी दिल्लीवर

आपले मोर्चे बांधते.

प्रसादाचे ताट डी. पी. मिश्रांच्या हाती. पुजारी उमाशंकर दीक्षित भक्तांची कसोटी पाहतात.

पण इंदिरादेवींचा कौल ऐनवेळी काय पडेल सांगता येत नाही. एकेकाची पाळी येते. The day of selection ची वाट पाहात.

आधी आखाडे सजवले जातात. या वस्तादाचा, त्या वस्तादाचा, असे डावपेच लढवले जातात. आपण बाईंचेच उमेदवार आहोत या आविर्भावात कुणी मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने रेखत असतात.

'आधी आमच्या चेल्यांशी लढा'–प्रत्येक वस्तादाचा आग्रह.

शंकरराव चव्हाणाचे चेले जिंकतात! Referee becomes the victor! इंदिराबाई म्हणतात, शंकररावांचा आखाडा जिंकला. ते दिल्लीलाच तळ ठोकून असतात. त्यांना निश्चित वाटते, विजय आपलाच आहे.

मग मालिश करणारे, आखाडा साफसूफ करणारे, गरजणारे, इत्यादी फलाण्या फलाण्या चेल्यांना आणि रिंगणात न उतरलेल्यांनाही तिकीट वाटप होते!

इंदिराबाईंच्या अंतस्थ गोटात कुजबुज होते – यादवी ही मराठ्यांच्या इतिहासाच्या पाचवीला पुजलेली आहे.

अखेरच्या फेरीच्या तिथ्या आज-उद्या बदलत राहातात!

इंदिराजींचा दरबार. समोर चाचा उमाशंकर दीक्षित. मिनी कौटिल्य डी. पी. मिश्रा...शिवाय हितसंबंधी.

एकेक वस्तादांची मुलाखत. आधी श्री. शेषराव वानखेडे येतात. मूड लाइट आहे. लीलया मॅच जिंकण्याची हातोटी आहे. आपली पोझिशन रिझर्व्हड असल्याच्या सहजतेने वावरतात.

डी. पी. मिश्रा विचारतात: 'अजून तुमचा रियाज चालूच आहे का? मंत्रिपदापर्यंतचे सारेच राग तुम्ही बहारीने आळवलेत. अरे वा, सुंदर गात आहात. मुझे बहोत खुषी हुई। खूप दिवसांनी भेटलो आपण. आनंद झाला.'

उमाशंकर दीक्षित: 'पण तुम्हाला नव्या समाजवादातील 'गरिबी हटाव'चा राग काही नीट आळवता येत नाही! या संसदेतून इंदिराजींच्या मैफलीतून निघालेला हा राग खूप क्लिष्ट आहे, अशी तुम्ही टीकाटिप्पणी, टिंगल चालवली आहे, असे माझ्या कानी आलंय. ते खरं आहे का?'

वानखेडे: चाचरत पण न डगमगता: 'मी बाथरूम कॉमेंट केली. पण समाजवादाची नव्हे, कथित समाजवाद्यांची! I cut socalled socialists, even I cut jokes at you, but I have never made any public utterances against socialism.'

मिश्रा : कड घेत, 'हे रेडिमेड सोशालिस्ट आहेत. काळजी करू नका. आपल्या अर्चनेत फिट होतील.'

ना. वानखडे जातात. पावलात विजयाची चाहूल. □

तुमचाच पाहुणचार घेतला !

मग पाळी येते ना. तिरपुडे यांची.

उमाशंकरजी त्यांची भलावण करतात, 'ये युवा नेता है। मागासलेल्या जमातीचे खंबीर नेतृत्व केले आहे. शिक्षणसंस्था चालवल्यात. मी यांना चांगला ओळखतो. मी मुंबईला यांच्याचकडे उतरत होतो ना !'

ना. तिरपुडे यांचा चेहरा टवटवीत होतो. त्यांच्या मनात आशा तरळून जाते. अरे वा ! सहज जमणार ! आपल्या घरी दीक्षितजी उतरले, याची आठवण त्यांनी दिल्याने तिरपुडे relax होतात.

मिश्राजीसुद्धा मधाचे बोट लावतात. भावनात्मक ऐक्य वगैरे शब्दांची पेरणी होते.

पण इंदिराजी स्वतःच म्हणतात : 'पण तुमचा तर समाजवादावर विश्वास दिसत नाही. सत्तेवर असताना तुम्ही जंगल कामगारांच्या सहकारी चळवळीला नख लावण्याचा प्रयत्न केलात ! सहकाराची गळचेपी केल्याचं पाप केलंय तुम्हीं.'

ना. तिरपुडे : 'मी गरिबीतून वर आलेला मागास वर्गातील कार्यकर्ता आहे. भांडवलशाहीला तर मी पायदळी तुडवले आहे...'

मिश्राजी : 'He is bound to poverty, but attached to capitalism.'

इंदिराजी : 'पण मला आधीच सारी बित्तंबातमी आहे. ठीक आहे. तुम्ही मुरब्बी कार्यकर्ते आहात. संघटनेची मुळं चांगली पक्की करा.'

ना. तिरपुडे : 'मी नम्रपणे आपल्या आदेशाचे पालन करीन' एकेक शब्द उच्चारत प्रयाण...

मदनगोपाल अगरवाल यांचे आगमन होताच मिश्राजींची टकळी सुरू होते : 'हे तर आमच्या सी. पी. अँड बेरारमधले जुने दोस्त. चांगल्या पहचानीचे. राजकारणातल्या वाटा-वळणे माहिती असलेले.'

उमाशंकर : 'हे सारे जुनेच रेकॉर्ड. पण अतिपरिचयात यांनी नागपूरकरांकडून अवज्ञा करवून घेतल्याचा माझा अनुभव आहे.'

मिश्राजी : मध्येच: 'लेकिन मरहडोमें कोई एक हिन्दी साईडर भी होना जरूरी है। मुझे लगता है कि अगरवालजी...'

इंदिराजी : 'जुन्या मध्यप्रदेशात यांनी नागपूरवर राज्य केले. ठीक आहे. नागपूरसारख्या मध्यवर्ती शहरात हिंदी भाषिकांतर्फे प्रतिनिधी असणे निकडीचे

आहे हे मान्य. पण ते प्रतिनिधीत्व यांनीच करावे, हा आग्रह का? आपल्याकडे नवी, जोमदार, शिकलेली तरुण मंडळी आहेतच ना... हे नवचंद टोकसिया–नव्या वातावरणाचे प्रतिनिधी...

अगरवालजींना सारे कळून चुकते. काही क्षण कुणीच बोलत नाही. 'आपल्या हुकुमाने मी संघटनेचे काम नम्रपणे करीन'– अडखळत उच्चारत अगरवालजी घुमजाव करतात. □

विठोबाची मूर्ती झाकून....

'आपल्याला तिकिट मिळते की नाही, कळत नाही. उत्तरेचे वारे उमजत नाही. सीलिंगच्या पळवाटा श्रेष्ठींना कळल्यात तर.' एका अस्वस्थचित्त मनःस्थितीत आबासाहेब पारवेकर प्रवेशतात.

भलावणीदाखल मिश्राजी, उमाशंकर म्हणतात : विठोबाची मूर्ती झाकून यांनी आपला फोटो काढवला आहे. पंढरीचा विठोबा आणि पुसदला यांची चांगली श्रद्धा आहे. तसे हे भाविक, एकनिष्ठ, यांच्यापासून समाजवादाला धोका नाही.

इंदिराजी : 'पण हे जमणार नाही. यांनी सीलिंगच्या पळवाटा...'

पारवेकर : 'पण मग असा विशुद्ध मायेचा पूत आहे तरी कोणत्या मंत्रीमंडळांत? आजच्या कायद्याप्रमाणे ठरलंय तेवढंच आहे आमच्याकडे. तुम्ही उद्या दोन एकराचा कायदा केलात तर दोन एकरच ठेवू! 'जे जे काही आहे ते ते देशाला अर्पण करीन' ही गुरूची शिकवणच आहे.'

उमाशंकर : पण तुम्हाला समाजवादी आखाडा पेलणार नाही. कारण तुमच्याच यवतमाळ जिल्ह्यातील, ज्यांना तुमची समाजवादी कसरत माहीत आहे अशा, कार्य-

कर्त्यांचा–ममदानी, दर्डा, देवराव पाटील आदींचा–तुम्हाला पुरस्कार नाही.'

मिश्राजी मिस्किलपणे म्हणतात : 'हे सारे जरी खरे असले, तरी वसंतरावांना आपण ऑलिम्पिकसाठी निवडले आहे. त्यांना कोणीतरी जोडीचे चेले हवेतच. ही सीट बदलली गेली तर यवतमाळ जिल्हा खिळखिळा होऊन जाईल !'

ना. पारवेकरांच्या नावापुढे प्रश्नचिन्ह पडले !

त्या प्रश्नचिन्हाचेच वेटोळे ना. वैराळचांच्या पायाशी येऊन पडले ! पण आपल्याला अजून आशा आहे, या समजुतीने हवापाण्याच्या गोष्टी करून ते बाहेर पडले.

ना. देवतळे येतात. स्वत: बाईनीच त्यांची सलामी घेतली. 'कितने साल हुये आप मंत्री बने ?'

'दोन वर्षे.'

'कोणती खाती ?'

उपमंत्री देवतळे जंत्री वाचतात. वीज, शिक्षण, पाटबंधारे '

'इतक्या खात्यांचे काम तुम्हाला पुरवते का ?'

उमाशंकर मध्येच विचारतात : 'असेंब्लीत शिक्षणखात्याच्या प्रश्नांना उत्तरे तुम्हीच दिली होती का ?'

देवतळे, 'हो कधी कधी.'

दोनच वर्षे अजून ट्रायल झालीय. Aristocratic Socialist आहे. पाहू या आणखी ट्रायल... चर्चेचा सूर निघतो.

पुन्हा मिश्राजी उद्‌गारतात : 'आणि यांच्या जिल्ह्यातील पॅनेलला जि. काँ. कमेटीने विरोध केला, पण यांच्या यादीला न वसंतरावांनी विरोध केला न शंकररावांनी, असे हे उमेदवार आहेत...'

ना. देवतळे परीक्षेचा अपेक्षित निकाल लागल्याच्या आनंदात गमन करतात. □

ऐसा करे

लगबगीने ना. वसंतराव येतात. रात्रभर झोप नाही. चेहरा विषण्ण. पण तजला कायम.

'दादा, मी यशवंतराव, कितीतरी वेळ ताटकळत होतो. पारवेकरांचे प्रश्नचिन्ह काय ? त्यांना disturb करू नका. नाहीतर मिश्राजींनी म्हटल्याप्रमाणे जिल्हा खिळखिळा होईल.'

इंदिराजी : 'ऐसा करे, मधुकर वैराळे जसे नेक वफादार आदमी tried है। अशा अनुभवी माणसांकडे संघटनेचे काम देऊ या आणि त्यांच्या जोडीला मदतीला माणसे तशीच नेक हवीत. तेव्हा...'

मुलाखतींची आवतंने बऱ्याच वेळाने संपलेली असतात. □

मेजॉरिटी एकाची, खुषी दुसऱ्याची, शह तिसऱ्याचा

इंदिराजी : 'काफी समझदार अकलमंद आदमी है। उलझने मान ली, और समझ चुका है। Satisfatory combination of doom and glory है। बेचारा सीधा है। मुझे रंज है... पण इतरांच्या संघर्षाची कटू फळे आहेत... तरी याला सुगंधित आणि मानाची साजेशी शान द्यायला हवी. याचा सुखाडिया किंवा श्यामाचरण शुक्लाही करता कामाचा नाही. राजभवनातल्या सोनेरी चिमण्यांची शिकार करण्यात या अस्सल शिकाऱ्याला गोडी वाटणार नाही... भारतके बाहर भेजा जाय. शायद इंग्लंड...'

मिश्राजी मिस्किलपणे : 'शिकारी है तो आफ्रिकाही पसंद करेगा !'

उमाशंकर : 'लेकिन बात यह है कि जो लिस्ट अभी सिलेक्ट हुयी है. उनमें मेजॉरिटी तो वसंतरावकी है। शंकरराव तर आपल्याच खुषीत...'

इदिराजी : आणि बाळासाहेबांनाही आपण निमंत्रण दिलंय.'

मिश्राजी : याचाच अर्थ असा, की वसंतरावांना नवी मानाची जागा दिल्यावर या मराठ्यांच्या राज्यात एकमुखाने नेता निवडणे कठीण होईल. शहाला प्रतिशह आहेतच. उद्या पुन्हा ती निवड येथेच घोंगावेल. त्या निवडीसाठी तयारी आतापासूनच हवी.

उमाशंकर : 'राष्ट्रीय एकतेच्या संदर्भात कुणाही विशिष्ट जातीजमातीचा वरचष्मा नको...'

मिश्राजी : 'मुख्यमंत्री कुणालाही नेमा, मात्र तणावे बहुजन समाजाच्या हातातच हवेत. मात्र वर्णश्रेष्ठांची मोनापली तोडली पाहिजे. याला शह हवा. ती कशी तोडता येईल ?'

उमाशंकर : 'आपल्याला intellectual, खंबीर, धडाडीचा, तरुण धडाडीचा सच्चा समाजवादी माणूस हवा. जो बहुजन समाजालाही प्रेरणा तर देईल पण मध्यम बुद्धिजीवी वर्गालाही खेचून घेईल. आणि पुन्हा आपल्या छायेतला... तर मोहन धारियांना, मुंबईच्या परांजप्यांना राहायला सुचवले पाहिजे का ? सेठींची नवी पण स्वतंत्र कॉपी निर्माण करायला ?...'

पण इंदिराजी मध्येच निघून गेलेल्या असतात. उमाशंकर व मिश्राजी आपल्याच चातुर्यावर खूष होत्साते घडचाळे पाहतात...

विरंगुळा

डॉ. अनंतराव पाटील

नागपूरकडून येणारी काळ्या डांबरी सडकेची रिबनपट्टी जीनच्या फाटकाला चाटून जाते. जीनच्या फाटकाशी मुंबईच्या कुणा भाटिया गुजराथी मालकाचे नाव रंगवलेली पाटी पुसट झालीय. फाटकाच्या उजव्या अंगाला छोट्या छोट्या बंगल्या आहेत. या बंगलींच्या सडकेच्या बाजूच्या खिडक्यांना बारीक जाळ्या लावल्या आहेत. त्या बंगलीत राहणाऱ्या भाटिया गुजराथी फॅमिलीज या वऱ्हाडी वातावरणाशी विसंगत वाटतात. गोल पातळ नेसलेल्या, पुरीसारख्या फुगलेल्या गुजराथिणी-भाटणी व त्यांचो तशीच गोल पोरे या बंगलींतून वावरताना दिसतात. त्या बंगलींच्या स्वयंपाकघराच्या खिडकीतून फळीवर ओळीने मांडून ठेवलेली चकचकीत पितळी भांडी सडकेने जाणाऱ्या येणाऱ्यांच्या नजरेत भरतात. गुजराथी बायांना चकचकीत पितळी भांडी रांगेने प्रदर्शनासारखी मांडून ठेवण्याची भारीच हौस दिसते. मागे बडोद्याला शिकत असताना गुजराथी कुटुंबात जायचा प्रसंग आला तर हारीने भांडून ठेवलेली पितळी भांडी प्रथम नजरेत भरायची.

हंगामाखेरीज चार-पाच महिने या जीनचे आवार सुनेच असते. फाटकाजवळच्या लाकडी घरात नेपाळी गुरखा स्टुलावर बसल्या बसल्या डुलक्या देताना जाणाऱ्या येणाऱ्यांना दिसतो. भाटिया फॅमिलीज मुंबईला गेलेल्या असतात. बंगल्यात शुक-

शुकाट असतो. मोकळ्या आवारात एखाददुसरी मोकाट म्हैस नाही तर बकरी चरत असते. जीनची ती उंच काळी धुराडी आकाशाकडे पहात जांभया देत आळशासारखी स्वस्थ पडलेली असतात. आवारातले गुरख्याच्या लाकडी झोपडीच्या पाठीमागे एक किरकोळ पण तरणे गुलमोहराचे झाड माथ्यावर धुळीचा पसारा घेऊन केविलवाणे उभे असते. आवारातील इतर ३–४ आंब्याची झाडे आपलीच सावली निरखीत स्तब्ध उभी असतात. टिनच्या पत्र्यांच्या प्रचंड गुदामांची तोंडे मोठमोठ्या कुलुपांनी जखडून टाकलेली असतात. जीनच्या टीनच्या टपरांवर बोट बोट धुळीचा थर साचलेला असतो. सारे वातावरण मरगळलेले व सुन्न असते.

पावसाळ्यानंतरच्या एका स्वच्छ सकाळी १५–२० मजूर हातांत फावडे-पाटचा घेऊन लोखंडी फाटकातून आत शिरतात. आवारात पावसाळ्यात माजलेले गवत साफ होते. मरगळलेली झाडे पावसाचे पाणी पिऊन तृप्त हिरवी झालेली असतात. आवार दाढी केल्यासारखे तुकतुकीत दिसू लागते. जीनच्या भिंतींना पांढरा सफेता दिला जातो. टिनोपाल दिल्यासारख्या. त्या शेवाळलेल्या भिंती चकाकू लागतात. मरगळलेला, पेंगणारा गुरखा तजेलदार दिसू लागतो. तो ऐटीत स्टुलावर दंडुका सावरीत बसलेला दिसू लागतो.

हंगाम लवकरच सुरू होण्याची ही चिन्हे असतात. साऱ्या आवाराला आगळाच तजेला येतो. बंगलीची आवारे साफ होतात. आवारात फाटकातून कोळशांच्या ट्रक्स गुरगुरत असतात. आकाशाकडे आ वासून असलेली ती प्रचंड धुराडी साफ होतात. त्यांच्यावरची प्रचंड इंग्रजी अक्षरे पुन्हा रंगवली जातात.

अन् मग एके दिवशी त्या लोखंडी फाटकातून दोन-तीन चकचकीत ॲम्बॅसडर गाड्या शिरतात. फाटकाजवळचा गुरखा लगबगीने उठून सलाम ठोकतो. त्या गाड्यांमधून भाटणी उतरतात. त्यांच्या मागून अनोख्या भाषेत चिवचिवणारी त्यांची गुबगुबीत पोरे उतरतात.

आता रस्त्याच्या कडेच्या जाळीच्या खिडक्या उघडतात. जाणाऱ्या येणाऱ्यांना हारीने लावून ठेवलेल्या चकचकीत पितळी भांड्याचे दर्शन होते. फाटकाच्या बाहेरच्या गोणपाटाच्या हॉटेलला तजेला येतो.

कामावरच्या मजुरांनी ते हॉटेल गजबजू लागते. हंगाम आता सुरू झालाय. काळी टोपी घातलेला व चकचकीत गुंडयांचा गुडघ्यापर्यंत येणारा कोट घातलेला गुजराथी मॅनेजर काळे शू घालून आवारात हिंडताना दिसू लागतो. तो अर्धवट गुजराथी-मराठीतून मजुरांना सूचना देतो, शिव्या देतो. सडकेलगतच्या बंगलीच्या खिडक्यातून साजूक तुपातून तळल्याचा मस्त वास येतो. येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या नाकाला सुखावतो.

दसऱ्याला मुहूर्त होतो. झेंडूच्या माळा चढवलेला प्रेस व बॉयलरची पूजा होते. अन मग एके सकाळी आकाशाकडे आ वासून बघणाऱ्या काळ्या नळकांड्यातून

धुराची काळी वेटोळी बाहेर निघू लागतात. फाट्कातून मजुरांची येजा जोरात चालू होते. कधी कधी सिगरेटच्या वर्खासारखी रूपेरी वाफ टिनशेडच्या बाहेरच्या बारक्या धुराड्यातून निघू लागते. फाटकातून रुईच्या गाड्यांची रीघ लागते. जिनच्या प्रचंड आवारात कापसाच्या रुपेरी ढिगांचे डोंगर उभे रहातात.

थंडीच्या दिवसात ६॥ ला पहिला भोंगा होताच थंडीने कुडकुडत मजूर आत शिरतात जीनच्या उभ्या नळकांड्यातला धूर अंगाभोवती गिरक्या घेत आकाशाकडे चढू लागतो. निळचा आभाळाचे नीतळ वातावरण क्षणभर काळवंडून जाते.

रुईची तयार झालेली गाठ वरून घसरगुंडीसारखी लोखंडी रुळांवरून खाली घरंगळत येते. रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या शाळकरी पोरांना या घसरगुंडी खेळणाऱ्या गाठींचा मोठाच विरंगुळा. वरच्या मजल्यावर प्रेसखाली गाठ तयार असते. मजूर ती ढकलीत त्या घसरगुंडीच्या तोंडाशी आणतात. हेऽऽ करून ती गाठ खाली ढकलून देतात. ती गाठ नंतर सुरेकन घसरत खाली जमिनीवर उतरते. शाळेत जाणाऱ्या पोरांना मोठी गंमत वाटते. अशी गाठ खाली आली, की ते आनंदाने टाळ्या पिटू लागतात. रस्त्यावर घोळका करून वरून गाठ खाली केव्हा सरकत येते याची वाट पहात उभे रहातात. त्यांना शाळेचे भान राहात नाही. दर पाच पाच मिनिटांनी गाठीची घसरगुंडी होते. एखादा रेंगाळणारा वाटसरूदेखील क्षणभर थबकून ती गंमत पाहिल्याशिवाय जात नाही.

वरून घरंगळत येणारी गाठ जमिनीवर आदळल्याबरोबर खाली उभे असलेले मजूर तिला ढकलीत एका रांगेत लावतात. शाळेत ड्रिलकरता युनिफॉर्म घातलेल्या पोरांसारख्या त्या गाठी आवारात उभ्या असतात. आवारात खूप गाठी साचल्या म्हणजे ट्रकांचा ताफा गुरगुरत आत शिरतो. गाठी ट्रकात भरभरून नागपूरच्या रस्त्याला लागतात. त्यांची रिकामी जागा वरून घसरत येणाऱ्या तयार गाठी घेतात.

कधीकधी बैलगाडीतून या गाठी स्टेशन रस्त्याने जाऊ लागतात. चारचार पाचपाच गाठी भरलेल्या त्या बैलगाड्या संथपणे डुलतडुलत सडकेच्या बाजूने रेघ मारल्यासारख्या चालू लागतात. मधेच गाडीवान 'बैऽऽहाऽऽ' म्हणून आरोळी ठोकतो.

पहाटे ६॥ लाच भोंऽऽ म्हणून ओरडणाऱ्या त्या पहिल्या भोंग्याने आजूबाजूच्या लोकांची झोप चाळवते. उबदार अंथरुणात पडल्या पडल्या '६॥ वाजले वाटते.' असे कोणीतरी पुटपुटतो. दिवसातून तीन-चारदा वाजणारा भोंगा आजूबाजूला सारखी वेळेची जाणीव करून देतो. पहिली पाळी, दुसरी पाळी, रात्रपाळी असा सारखा घाणा चालू असतो. भर हंगामात जीन २४ तास जागी असते. फाटकावरच्या गुरख्याची ड्यूटी बदलत असते. फाटकाच्या उजवीकडच्या जिन्याच्या ऑफिसात मॅनेजरची सारखी धावपळ चालू असते. फोन घणघणत असतो. मुंबईहून सारखे ट्रक येत असतात. कापसाने भरलेल्या गाड्यांच्या रांगेला खंड नसतो. शेजारच्या हॉटेलातल्या डामरासारख्या काळ्याकुळकुळीत कढईतून ताज्या भज्यांचे घाणे चालू असतात.

धुराच्या नळकांड्यातून निघणारा काळाशार धूर आकाशाच्या निळ्या कॅनव्हासवर ॲबस्ट्रॅक्ट पेंटींग रंगवत असतो. नळकांड्यातून निघणारा धूर वाऱ्याची झळूक आली म्हणजे ब्रशाचे फटकारे मारलेल्या मॉडर्न पेंटिंगसारखा दिसतो. कधी कधी हवा नसली, की नळकांड्यातून निघणारा धूर स्तंभासारखा हळूहळू वर सरकत आकाशाचा वेध घेऊ लागतो. नळकांड्यातून निघणाऱ्या धुराच्या रंगाच्या छटा किती विविध असतात. काळ्या रंगाच्याहीखील विविध छटा असतात. दिवसभर त्या नळकांड्यातून निघणाऱ्या धुराचे विविध मूड पाहिल्याने मनाला आगळाच विरंगुळा मिळतो.

मंगळवारच्या बाजाराच्या दिवशी धुराडी बंद होतात. मंगळवार बाजाराचा दिवस, पगाराचा दिवस. ऑफिसच्या बंगल्याच्या व्हरांड्यात टेबलावर कोऱ्या नोटांची बंडले व नाण्यांची चळत ठेवून कॅशिअर पगार वाटतो. कॅशिअरच्या पाठीशी मोठचा मिशांवाला व भाला घेतलेला, खाकी कपड्यांचा भय्या उभा असतो. मजूर पगार घेतात. घेणेकरी ताटकळत फाटकाबाहेर गर्दी करून उभे असतात. फाटकावरचा गुरखा त्यांच्यावर गर्दी नको म्हणून गुरगुरत असतो. पठाण दंडे सावरीत कर्ज वसूल करायला फाटकाशीच उभे असतात. जोनच्या पलीकडे ताडीच्या दुकानात मजुरांची रीघ लागलेली असते.

एके दिवशी जिनच्या आवारातील हो चहलपहल मंदावते. आकाशाकडे तोंड वासून पडणाऱ्या नळकांड्यातला धूर मंदावतो. फाटकाशी येणाऱ्या कपासाच्या गाडयांची रीघ मंदावते. दारावरचा गुरखा पुन्हा डुलक्या घेत स्टुलावर दिसतो. बॉयलरमधूर सारखे येणारे फिस्स् फिस्स् आवाज मंदावतात. कपास वाहणाऱ्या मजुरांची धावपळ कमी होते. कापसाचे पर्वतप्राय ढीग कमी होतात. वरून घरंगळत येणाऱ्या गाठींची संख्या कमी होते.

अन मग फाटकातून पांच-सहा महिन्यापूर्वी आलेल्या तीन-चार भाटीणी व पोरांनी भरलेल्या ॲम्बॅसिडर गाडया निघून नागपूर रोडने मुंबईच्या दिशेने धावू लागतात. आता जिनच्या आवारात एखाद दुसरे मोकाट जनावर चरतांना पुन्हा दिसू लागत. तरण्या गुलमोहरावर पुन्हा आळसावलेला निस्तेजपणा येतो.

आता सडकेने जागारी शाळकरी पोरे वरून खाली घसरगुंडी करीत येणाऱ्या गाठीची वाट पहात आशाळभूतपणे उभी असतात. पण बराच वेळ झाला तरी गाठ येत नाही म्हणून घसरणाऱ्या गाठींची आठवण काढीत शाळेच्या रस्त्याला लागतात. आवारातली आंब्यांची झाडे हिरमुसल्यासारखी उभी असतात. आळसावलेल्या नजरेने आपलीच सावली निरखीत उभी रहातात. धुराडयावर कावळा काव काव करतो. टीनशेडची मोठमोठी दारे कुलुपांमुळे तोंडे मिटून गप्प असतात.

गेले सहा-सात महिने असलेला हा विरंगुळा. नळकांड्यातल्या धुराची सोबत नाही म्हणून मन उदास होते. अन फाटकाजवळच्या लाकडी घरात डुलक्या घेणारा गुरखा जांभई देत मोकाट जनावरे हाकताना केविलवाणा दिसतो. □ □ □

बाळकृष्ण
प्रभुदेसाई

पुस्तके

प्रतिनिधी

मराठी कादंबरीचे नवे वळण

गेल्या सुमारे दशकात मराठी कादंबरीचा विकास अनेक अंगांनी झाला. ययाति, मृत्युंजय या कादंबऱ्यांनी पुराणाकडे बघण्याची नवी दृष्टी दिली तर 'स्वामी'च्या यशाने वर्षानुवर्षे धूळ खात पडलेले मराठी दप्तरांचे रुमाल झटकले गेले आणि कालाच्या पडद्याआड गेलेल्या ऐतिहासिक पुरुषांची एक प्रभावळच मराठी कादंबरीतून अवतीर्ण झाली.

पेंडसे, माडगूळकर, शंकर पाटील यांच्या प्रादेशिक कादंबरीने मराठी कादंबरीचा प्रवाह अधिक मुक्त आणि जिवंत केला – तर शहरचे दिवे, चक्र, स्वगत, माहीमची खाडी या कादंबऱ्यांतून वि. ग. कानिटकर, दळवी, कर्णिक यांनी मुंबईसारख्या शहरातले मध्यमवर्गीयांचे भकास जीवन आणि झोपडपट्टीतले बकाली, भेसूर जीवन साक्षात आपल्यापुढे उभे केले.

कोसला, बॅ. अनिरुद्ध धोपेश्वरकर या सर्वस्वी नव्या वळणावर नेणाऱ्या मराठी कादंबऱ्या.

सारांश गेल्या दहा-पंधरा वर्षांत, केवळ मध्यमवर्गीयांच्या विश्वात रमलेल्या मराठी कादंबरीने खूपच नवे आकार धारण केले.

वरखेडकर यांची प्रतिनिधी ही या टप्प्यातील एक वेगळीच महत्वपूर्ण कादंबरी.

केवळ आशय आणि अभिव्यक्तीचा वेगळेपणा, किंवा कादंबरीला लाभलेला राजकीय परिसराचा वेगळेपणा हाच हा कादंबरीचा विशेष नाही. तसे राजकारणी, उच्चपदस्थ अधिकारी, मंत्री यांनी गजबजलेल्या राजकीय परिसराचे चित्रण, माडखोलकरांच्या कादंबऱ्यांतून यापूर्वी आले आहे, पण माडखोलकर काय किंवा फडके, खांडेकर काय, त्यांच्या मूलतः नायक-नायिकाप्रधान असणाऱ्या कादंबरीतून आढळणारे राजकीय, सामाजिक परिस्थितीवरचे भाष्य बरेचवेळा कलाहीन, ठिगळवजा होत असे.

प्रतिनिधी या कादंबरीतील राजकीय, सामाजिक परिस्थितीचे चित्रण – वस्तुतः चित्रण हा शब्द निर्हेतुक वाटावा इतक्या सहजपणे ते या कादंबरीत आले आहे– हे एका जगडव्याळ, विराट चक्रात पिळून पिसून निघणाऱ्या आजच्या सामान्य माणसाच्या मनाच्या आशा आकांक्षाचे, त्याच्या सुखदुःखाचे प्रतिबिंब आहे.

समाजपुरुषाची तळमळ

प्रतिनिधी या उण्यापुऱ्या ३५० पृष्ठांच्या कादंबरीत रूढार्थाने तसे कोणतेच बंदिस्त कथानक नाही, विशिष्ट व्यक्तिरेखांच्या जीवनाचे संपूर्ण दर्शनही नाही. ती या कादंबरीची प्रतिज्ञाच नाही. आहे ते केवळ, काही दिवसांच्या अवधीत, एका संवेदनाक्षम कवीच्या अंतःकरणाने टिपलेल्या, व्यक्तींच्या परस्पर संबंधातून निर्माण होणारे मानसिक ताण तणाव्यांच्या काही क्षणांचे चित्रण...त्यातून निर्माण होणारे समाजचिंतन आणि काही अस्वस्थ करणारे प्रश्न.

किंबहुना ही संपूर्ण कादंबरी म्हणजे एक भलंमोठं प्रश्नचिन्ह आहे.

अनंतराव दीक्षित नामक एका प्राध्यापकाच्या दुहेरी मनाची ही कथा. वास्तव जगात वावरणाऱ्या सामान्य माणसाची भूमिका पार पाडताना दुसरे एक व्यक्तित्व अनंतरावांनी जोपासले आहे. व्यास वाल्मिकीशी स्पर्धा करीत सतत वीस वर्षं महाकाव्य लिहिण्याच्या निदिध्यासात व्यग्र असलेल्या कवीचे, अनाद्यनंताचे.

वीस वर्षांपूर्वी, लाटेपन्हाटे नामक खेडचात देवराव नामक एका खेडुताच्या घरी कवी अनाद्यनंत त्याचा तत्त्वज्ञ मित्र विनायक, टीकाकार मित्र बर्वे, सरोजिनी (विनायकची पत्नी) आणि गांधीवादी आचार्यांची शिष्या कल्पना ही स्वतःला आधुनिक म्हणवणारी मंडळी एकत्र आलेली असतात. ही सारी मंडळी देवरावावर आधुनिकतेच्या सामर्थ्याचा ठसा उमटविण्यासाठी खपतात. एक नाटच रंगते. पण आधुनिकत्वाचे पंचप्राण म्हणवणारी ही मंडळी अखेर देवरावापुढे हरतात. कारण देवराव एखाद्या प्रचंड वटवृक्षासारखा आपली मुळे रोवून घट्ट उभा आहे.

कवीला साक्षात्कार होतो, की देवराव सामान्य हा माणूस असला तरी चिरंतन माणूस आहे. हाच माणूस कालाच्या अजस्र ओघात आजतागायत टिकला आहे. पुढे टिकणार आहे. कवी या चिरंतन माणसाची महाकाव्यात स्थापना करतो. किंबहुना महाकाव्याचे बीज इथेच कवीच्या मनात रुजते.

वीस वर्षे उलटतात. देशात प्रचंड संक्रमण घडते आहे. वीस वर्षांपूर्वी भारताची राज्यघटना साकार झाली, व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्याचा पुकारा करीत. पण सामान्य माणूस सामान्यच राहिला. जनतेचा प्रतिनिधी आला पण त्याने जणू सामान्य माणसाच्या पुढ्यातलं ताटच ओढून नेले—माणसाचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा, मूलभूत हक्क सारे या बकासुराने गिळंकृत केले. वीस वर्षांत रुपयाची धूप तीसपैशा पर्यंत झाली.

कवीला वाटते पुन्हा एकदा साऱ्याचे मोजमाप घेतले पाहिजे. स्वतःचे, बर्वेचे, विनायकाचे. सामान्य माणसाचे हे आक्रंदन समरसून ऐकले पाहिजे. महाकाव्यात त्याचे साद-पडसाद उमटले पाहिजेत. आणि कवी अनाद्यनंताचा प्रवास सुरू होतो—तो नागपूराहून निघतो. मुंबईला जातो. दिल्लीला जातो. त्याला काय दिसते ? पूर्वीची सारी मंडळी बदलली आहेत. खुद्द देवरावाचा मुलगा आता मंत्री झालाय्. आर्. डी. जनतेचा कैवारी. आसन टिकवणे ही त्याची महत्त्वाकांक्षा आहे. परदेशच्या वाऱ्या हे त्याचे पुण्यकृत्य आहे. कल्पना मोठी समाजकार्यकर्ती झालीय् — लक्षावधी

रुपयांची परकीय मदत तिच्या पाठीशी आहे. सेवेला 'इम्पाला'. विनायक दिल्लीतला उच्चपदस्थ अधिकारी आहे. परदेशच्या वाऱ्या करणं आणि हाय सोसायटीत सन्मानानं वावरणं एवढंच तो जाणतो. बर्वेतला टीकाकार मात्र अद्याप आग पाखडतो आहे, सरकारवर, लाचखाऊ सरकारी अधिकाऱ्यांवर. आणि हताश होतो आहे. कारण वरिष्ठाच्या गैरमर्जीमुळे त्याचा सी. आर. खराब झाला आहे.

कवीला आणखी खूप मंडळी भेटतात. बड्या सरकारी अधिकाऱ्यांना, धनिकांना, मंत्र्यांना, काळाच्या पडद्याआड गेलेल्या राजकीय पुढाऱ्यांना मुक्तीचा मार्ग दाखविणारे स्वामी विमुक्तानंद. पॅरीसचे नागरिकत्व स्वीकारून चैनीत विलासात रहाणारा पण पारदर्शक मनाचा मोहन राव आणि भारतीय निष्ठा जोपासणारा लेखक सनातनन.

कवी टिपत जातोय्. एकेक मानवी तत्व आपल्या महाकाव्यात ग्रथित करण्यासाठी. जातायेता कवीमन देवाशी संवाद करते. आणि नरकाधिपतीचा दूत मेफिस्टोफिलीसशी हुज्जत घालते. अंतीम सत्याच्या शोधात निघालेल्या अनंतरावांच्या कविमनाचा हा दुसरा प्रवास. महाकवीचा.

'प्रतिनिधी' कादंबरी एकाच वेळी दोन पातळ्यांवर वावरते

व्यक्तिमनाचा गजर

कवीचा व्यक्तिमनांशी चाललेला अखंड संवाद, हे या कादंबरीचं वैशिष्ट्य. स्थळ, काळ, व्यक्ती, परिसर, या साऱ्यांचे सतत भान राखून हा संवाद चालला आहे. एकेक व्यक्तिरेखा जिवंत होऊन साक्षात उभी रहाते. आपले अंतःकरण उघडे करते. हा व्यक्तिमनांचा अखंड गजर सदैव निनादत रहातो. वाचकांच्या मनावर आघात प्रत्याघात करतो. त्याला अस्वस्थ करतो. अंतर्मुख करतो.

मात्र इतका विशाल आवाका असलेली ही कादंबरी बऱ्याच वेळा रुक्ष तत्त्वचर्चेत शिरते. भावगर्भता हरवून जाते.

काही व्यक्तिरेखा खरोखरच विलक्षण सजीव उतरल्या आहेत. उदा. बर्वे, गजभिये.

महाकाव्याचा ध्यास घेतलेला कवी अनाद्यनंत मात्र कादंबरीत पूर्णांशाने प्रकट होत नाही. त्याच्या मनाची तडफड या अखंड निनादात कुठे जाणवत नाही. परमेश्वर, मेफिस्टोफिलीस यांच्याशी चाललेले संवादही कित्येकदा सपाट जातात.

खरे तर केवढे भव्य काव्यात्म रूप या कादंबरीने घ्यायला हवे होते!

हे आव्हान वसंत वरखेडकर यांनी याहूनही समर्थपणे पेलले असते तर मराठीला एका महाकाव्य सदृश भव्य काव्यात्म कादंबरीचा लाभ झाला असता. आता आहे त्या स्वरूपात अशा प्रकारच्या कादंबरीचा सूक्ष्म असा आराखडाच काय तो सूचित केला जातो– अर्थात हे यशही थोडे नाही. □

प्रतिनिधी : वसंत वरखेडकर : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३० : कि. १० रु.

झुंजार सेनानी रोमेल
याच्या वाळवंटी युद्धाची
ज्यूल्स आर्चर
यांनी सांगितलेली कथा...

उत्तरार्ध

निवेदन
अनंत भावे

रोमेलच्या पराभवामुळे दोस्त राष्ट्रांत आनंदीआनंद झाला. उत्तर आफ्रिकेमध्ये जर्मन नामशेष झाले, असेच साऱ्यांना वाटले. दोस्त सेनाधिकाऱ्यांकडून ऑचिनलेकना कितीतरी अभिनंदनपर संदेश आले.

असे दहा दिवस गेले आणि मग अशक्य वाटणारी गोष्ट घडली ! अनेक दिवसांच्या अविरत लढाईने शिणलेला असूनही रोमेल एकदम उलटा वळला आणि ब्रिटिश सैन्यावर घसरला. थोडीशी कुमक त्याला मिळाली होती. त्यामुळे त्याच्यापाशी शंभर रणगाडे सज्ज होते. तीन दिवसांचे अन्नपाणी बरोबर घेऊन आपल्यामागे येण्याचा आदेश रोमेलने आपल्या रणगाडा-वीरांना दिला.

असे काही होईल याची सर्वथा निश्चित ब्रिटिशांना कल्पनाच नव्हती. त्यामुळे परिस्थितीवरची त्यांची पकड एकदम ढिली झाली. रोमेलचे रणगाडे ब्रिटिश विरोधाला न जुमानता हां हां म्हणता पुढे घुसले. विस्कळित झालेले आठ

क्रमांकाचे ब्रिटिश सेनादळ वाहने, रणगाडे, तोफा, अन्नधान्य आणि कैदी मागे सोडून जिवाच्या आकांताने पळत सुटले. सोडलेली बहुतेक ठाणी रोमेलने परत मिळविली.

भयानक ऊष्मा, थंडी, थकवा, भूक, वाळूची वादळे यांना न जुमानता रोमेलची विजयी दौड चालूच राहिली. रणगाडचात किंवा ट्रकमध्ये बसल्या बसल्या किंवा तंबूमध्ये टेबलावर डोके टेकून शक्य ती झोप मिळविण्याचा प्रयत्न रोमेल करत असे. तरुण वयात त्याने बर्फघसरण आणि गिर्यारोहण भरपूर केले होते; त्यामुळे वाळवंटी युद्धातील बिकट नैसर्गिक संकटांना तोंड देताना त्याचे शरीर डगमगले नाही.

रोमेलचे खाजगी आयुष्य नेमस्त आणि कठोर शिस्तीचे होते. मद्यपान आणि धूम्रपान तो थोडेसेच करी. त्याचे जेवण मोजकेच असे. मांस वा इतर जड पदार्थ त्याला आवडत नसत. अंडी मात्र त्याला फार प्रिय होती; त्यामुळे त्याच्या कार्यालयाभोवती कोंबड्यांचा कलकलाट हमखास ऐकू येत असे. कनक आणि कांता यांचे त्याला फारसे आकर्षण नव्हते. त्यामुळे त्याच्या सगळ्या शारीरिक आणि मानसिक शक्ती धाडसी मोहिमांच्या कारणी लागत असत.

टोब्रुक पडले

वास्तविक रोमेल एका हुकुमशहाचे प्रतिनिधित्व करत होता. परंतु दैनंदिन जीवनात लोकशाही तंत्राचा अवलंब ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांपेक्षा रोमेलच अधिक करीत होता. त्याच्या हाताखालच्या मोठ्या अधिकाऱ्यांना तो निष्ठुरपणे वागवत असे. त्यांना करडचा जरबेत ठेवत असे. इटालियन अधिकाऱ्यांबद्दल वाटणारी तुच्छता तो कधीच लपवत नसे. परंतु सर्वसामान्य सैनिकाबद्दल मात्र त्याला अत्यंत आपुलकी होती. त्यांच्याशी तो स्वाभाविक खेळीमेळीने वागत असे. जर्मन उच्चाधिकारी रोमेलबद्दल उदासीनता दाखवत. परंतु सामान्य सैनिकांचे मात्र रोमेलवर अलोट प्रेम होते. कित्येकांना तो नावाने ओळखत असे. त्यांच्या बायकामुलांची तो प्रेमाने विचारपूस करत असे. आफ्रिका कोअरमधील सामान्य सैनिकाला रोमेलबद्दल भक्तियुक्त आदर वाटत असल्यामुळेच रोमेल त्यांच्याकडून अशक्य ते शक्य करण्याची किमया करू शकत होता.

रोमेल व्यक्तिशः मोठा सुदैवी होता. या सुमारास ओढवलेल्या एका आपत्तीबद्दल त्याने आपल्या पत्नीला लिहिले होते, 'तोफगोळ्यांचा एक तुकडा खिडकीतून सरळ आत आला आणि कोट आणि जाकीट जाळून माझ्या पोटावर येऊन धडकला. सुदैवाने बशीएवढा डाग पडण्यापलीकडे जास्त इजा मला झाली नाही.'

युद्धाच्या भाऊगर्दीतही, थकल्याभागल्या, तांबारलेल्या डोळ्यांच्या रोमेलची विनोदबुद्धी क्षीण झाली नाही. रोमेलच्या पराक्रमावर लुब्ध होऊन हजारो तरुणी त्याला प्रेमपत्रे पाठवत असत. ती पाहून एकदा तो हसत हसत उद्‌गारला, 'मला वाटतं, हा लढाईचा उद्योग सोडून देऊन मी चित्रपटात जावं हे बरं.'

एका सोडलेल्या ब्रिटिश ठाण्याच्या दरवाज्यावर पुढील सूचना लावली होती. 'प्रिय अर्विन रोमेल, ठिकठिकाणी स्वच्छता राखा; आम्ही लवकरच परत येऊ.' या सूचनेने रोमेलला मनापासून हसू आले होते.

२६ मे, १९४२ रोजी आपली आगेकूच तशीच चालू ठेवण्याचा निर्णय रोमेलने घेतला. वास्तविक ब्रिटिशांच्या तुलनेने रोमेलची ताकद कमी झाली होती. किनाऱ्यावरील गाझालापासून दक्षिणेला बिर हाशीमपर्यंत ब्रिटिशांनी पाय रोवले होते. रोमेलने गाझालावर खोटा हल्ला चढविला. या हुलकावणीला फसून ब्रिटिशांनी ज्यावेळी गाझालाकडे मदत पाठविली त्यावेळी रोमेलने त्यांना चकवून सरळ टोब्रुकवर चाल केली.

रोमेलचे खरे उद्दिष्ट ध्यानी येताच झालेली चूक निस्तरण्याचा प्रयत्न रिचीने केला. परंतु रोमेलने त्याला तशी संधीच दिली नाही. रणांगणात प्रथमच उतरलेला ग्रँट नावाचा अमेरिकन रणगाडादेखील रोमेलच्या रणगाड्यांना थांबविण्यास असमर्थ ठरला. आठव्या ब्रिटिश सेनादलाचा पुन्हा पराभव झाला होता.

रोमेलविरुद्ध लढताना आपल्या चुकांपासून ब्रिटिशांनी कसलेही धडे घेतले नाहीत असे दिसते. गाझालाच्या लढाईबद्दल रोमेलचे अवलोकन पुढीलप्रमाणे होतें, 'एकाच वेळी आपले सगळे रणगाडे कार्यान्वित करणे हे ब्रिटिशांचे मुख्य ध्येय असायला हवे होते. आमच्या हुलकावणीला बळी पडून त्यांनी आपल्या सेनादलाचे विभाग पाडल्यामुळे त्यांचा पराभव झाला.'

तरीही ब्रिटिशांच्या प्रतिकारामुळे रोमेलची आगेकूच मंदावली. त्याचे पुष्कळच सैन्य लढाईत कामी आले. १ मेपर्यंत जर्मन व इटालियन संयुक्त सेनेची स्थिती शोचनीय झाली होती. अन्न, पाणी, ज्वलन, दारुगोळा साऱ्याचाच तुटवडा होता. शिवाय पुढे पेरलेल्या सुरुंगांमुळे त्यांची गती थांबली होती. वरून विमानहल्ले होतच होते. लढाईचा इरादा सोडून पाठ फिरविण्याचा विचार रोमेलचे अधिकारी पुन्हा पुन्हा बोलून दाखवत होते. नाहीतर पुढील चोवीस तासांत आपण शरणागती पत्करू अशीही धमकी त्यांनी दिली होती.

रोमेलने त्यांच्याकडे साफ दुर्लक्ष केले. एका ब्रिटिश ब्रिगेडच्या ठिकाणावर सतत हल्ला करून, सुरुंगांच्या फळीमधून रोमेलने वाट काढली. वाटेत शत्रूची साधनसामग्री काबीज करत, तिचा उपयोग करत रोमेलने बिर हाशीम जिंकून घेतले आणि नंतर सरळ टोब्रुकवर धडक मारली. याबद्दल पुढे रोमेलने लिहिले, 'आमच्यापैकी प्रत्येकाला टोब्रुक हे ब्रिटिश प्रतिकाराचे मूर्तिमंत प्रतीक वाटत असे आणि ते प्रतीकच आता आम्ही नष्ट करणार होतो.'

टोब्रुकसाठी रोमेलने घनघोर युद्ध केले. टोब्रुकच्या तटबंदीमधून आत शिरण्यासाठी मार्ग लाभावा म्हणून जर्मन विमानांनी सातत्याने बाँबफेक केली. अखेर टोब्रुकचा नाईलाज झाला. उध्वस्त टोब्रुकमध्ये रोमेलचे विजयी रणगाडे दिमाखात

शिरले. सैनिकांच्या आनंदाला सीमा राहिली नव्हती. त्यादिवशी सैनिकांना उद्देशून रोमेलने एक खास फतवा काढला: 'सैनिकहो! दीर्घकाळ चाललेल्या संग्रामातील सर्वांत दैदिप्यमान विजय तुम्ही मिळवला आहे. ४५,००० ब्रिटिश सैनिक कैद झाले आहेत. शत्रूच्या नष्ट झालेल्या वा आपल्या हाती पडलेल्या चिलखती वाहनांची संख्या हजारावर असून तोफांची संख्या चारशेवर आहे. आता शत्रूचा संपूर्ण नायनाट आपल्याला करायचा आहे. आठव्या ब्रिटिश सेनादळाच्या उर्वरित अवशेषांचे निर्दालन केल्याखेरीज आपण विश्रांती घेणार नाही. हे अंतिम उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पुढील काळात धडाडीच्या एका जोरकस प्रयत्नाकरता मी तुम्हाला आवाहन करणार आहे."

शत्रूकडून गुणगान

दुसऱ्या दिवशी, हिटलरने रोमेलला 'फील्डमार्शल' केल्याची बातमी आली. रोमेलने बातमी ऐकून खांदे उडविले आणि तो कोरड्या शब्दांत म्हणला, 'याऐवजी हिटलरने एखादी रणगाड्यांची तुकडी दिली असती तर मला ते अधिक आवडले असते.'

रोमेलची कीर्ती आता इतकी वाढली होती, की खुद्द शत्रूदेखील मुक्तकंठाने त्याचे गुणगान करू लागला होता. एखादी गोष्ट विशेष कौशल्याने साध्य केल्यास त्याबद्दल 'रोमेलसारख्या कौशल्याने' असा वाक्प्रयोग सहज वापरला जात होता. रोमेलच्या नावात इतकी जादू होती, की ऑचिनलेकने मुद्दाम फतवा काढून रोमेलची इतकी व्यक्तिपूजा ब्रिटिश सैनिकांनी ताबडतोब बंद करावी असा सख्त आदेश दिला होता.

त्याचे स्पष्टीकरण करताना ऑचिनलेकने म्हटले होते, 'आपल्या सैनिकांना रोमेल एखाद्या अद्भुत जादुगाराप्रमाणे वाटतो, हे खरोखरच फार धोक्याचे आहे. रोमेलबद्दल आपले सैनिक नको तेवढे बोलत आहेत. तो अत्यंत शक्तिमान आणि चपळ असला तरी अतिमानुष खचित नव्हे. आणि अतिमानुषही असता तरी त्याच्यापाशी काही दैवी सामर्थ्य आहे असे आपल्या सैनिकांनी मानणे अत्यंत अयोग्य होणार आहे. सर्वसामान्य जर्मन सेनाधिकाऱ्यांपेक्षा रोमेल वेगळा नाही, असेच सैनिकांनी मानावे असे मला वाटते. महत्त्वाची गोष्ट अशी, की लिबियातील शत्रूबद्दल बोलताना खरोखर नेहमी रोमेलबद्दलच बोलले पाहिजे असे नाही. शत्रूचा उल्लेख 'जर्मन', 'संयुक्त सेना' किंवा साधा 'शत्रू' असा आपण करू शकतो; त्यासाठी सारखे रोमेलचेच नाव घेण्याची गरज नाही. माझी ही सूचना विनाविलंब अंमलात आणा. आपल्या सैनिकांच्या मनोधैर्याच्या दृष्टीने ती सर्वाधिक महत्त्वाची आहे.'

परंतु खुद्द चर्चिल यांनी रोमेलबद्दल लोकसभेत पुढील उद्धार काढले. 'युद्धाची भीषण परिस्थिती लक्षात घेऊनही आपला विरोधक रोमेल हा एक अत्यंत धाडसी चतुर आणि श्रेष्ठ सेनापती आहे, हे मान्य केले पाहिजे.'

रोमेलच्या या गौरवाने प्रचारप्रमुख गोबेल्सला संतोष होणे स्वाभाविकच होते. या गौरवाला उद्देशून तो म्हणाला, 'ब्रिटिशांनी रोमेलचा चालविलेला उदो उदो, त्यांच्या दृष्टीने अत्यंत अदूर दृष्टीचा आहे. या गौरवामुळे रोमेलला ते साऱ्या जगातील सर्वाधिक लोकप्रिय सेनापती ठरवत आहेत. हे अर्थात आम्हाला सोयीचेच आहे.'

मित्रांनी आणि अमित्रांनी सारख्याच उत्साहाने चालविलेल्या कौतुकाने रोमेल सुखावला नसता, त्याचा गर्व गोंजारला गेला नसता तरच नवल. अखेर तोही मनुष्यच होता. स्वतःच्या लौकिकावर इतका सर्वस्वी आषक झालेला दुसरा माणूस माझ्या पाहण्यात नाही, असे रोमेलचा सहकारी फॉन लांज याचे मत होते. या लौकिकाला जराही झळ लागणार नाही याची मुद्दाम काळजी रोमेल घेत असे. त्याच्याबद्दल वर्तमानपत्रात येणाऱ्या उल्लेखांची कात्रणे रोमेल भल्या मोठ्या चिकटवहीत जपून ठेवत असे. त्याचप्रमाणे वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या आपल्य लेखांच्या जपणुकीबद्दल तो जागरूक असे.

एकदा आख्यायिका-विषय झाल्यावर, लोकमानसात असलेल्या आपल्या भडक चित्राचे रंग थोडेदेखील विटणार नाहीत याची दक्षता रोमेल घेऊ लागला. त्यामुळे उत्तरोत्तर आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांशी तो जास्तच कठोर झाला; सर्वसामान्य सैनिकांशी ज्यादा मोकळेपणाने वाग लागला; युद्धात अधिक बेदरकार बनला; विजयाची तर त्याला चटकच लागली. त्यावर फॉन लांज म्हणतो : 'थोडक्यात सांगायचे तर केवळ स्वतःच्या लौकिकासाठी रोमेल हे करत होता.'

हिटलरबद्दलचा भ्रमनिरास

टोब्रुकच्या सनसनाटी विजयानंतर, प्रकृति अस्वास्थ्यामुळे रोमेलला दीर्घमुदतीच्या रजेवर जावे लागले. त्यावेळी तो हिटलरला भेटला. तेव्हा दोघांची थोडी चकमक झडली. रोमेलने केलेली ब्रिटिश सैन्य आणि सामग्री यांची स्तुती हिटलरला रुचली नाही. शिवाय इटालियनांपेक्षा ब्रिटिश कितीतरी वरचढ आहेत हे आपले मत रोमेलने काहीशा हेक्याने हिटलरला ऐकवले. आफ्रिका कोअरला ज्वलनपुरवठा करणे मुसोलिनीला जमले नाही; म्हणून तर आपल्याला कैरोवर धडक मारता आली नाही, या रोमेलच्या तक्रारीचा हिटलरला अत्यंत राग आला.

'माझ्या सेनापतीपेक्षा मुसोलिनीवर माझा अधिक विश्वास आहे' असे उद्गार हिटलरने काढले. हिटलरच्या या निरर्गल उद्गारांचे रोमेलला आश्चर्य वाटले. जर्मनीच्या या नेत्याबद्दल पुढे जो त्याचा भ्रमनिरास झाला त्याची सुरुवात येथे झाली होती. खरे तर लष्करी अज्ञाधारकपणाने आपल्या निष्ठा त्याने हिटलरला वाहिल्या होत्या. या वेळेपर्यंत, अमानुष अत्याचारांबाबत हिटलरवर होणारी टीका रोमेल कानाआड टाकत असे.

खुद्द रोमेलची शत्रूच्या संबंधातील वागणूक निष्कलंक होती. त्याने हाती सापडलेल्या

शत्रुसैनिकांची अवहेलना कधी केली नाही, तसेच त्यांना कधी सूडबुद्धीनेही वागविले नाही. त्याच्या सैनिकांना जे अन्नपाणी मिळत असे तेच अन्नपाणी आफ्रिकेतील ब्रिटिश कैद्यांना मिळत होते. रोमेलचे सैनिक आणि ब्रिटिश कैदी यांना सारखीच वैद्यकीय मदत सारख्याच तत्परतेने मिळत असे. पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या ब्रिटिश कैद्यांचे त्याला कौतुक वाटे. पकडलेल्या ब्रिटिश हल्लेखोर कमांडो तुकड्यांची निरपवाद कत्तल करावी, हा हिटलरने पाठविलेला हुकूम रोमेलने तत्परतेने जाळून टाकला आणि त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले.

२३ जून १९४२ रोजी, इजिप्तमध्ये माघार घेणाऱ्या आठव्या ब्रिटिश सेनादलाला गाठण्याचा प्रयत्न रोमेलने केला. त्वरा करून त्यांचा निःपात करण्याचा त्याचा इरादा होता. कारण त्यामुळे ॲलेक्झांड्रिया आणि सुवेझ कालवा या टप्प्यापर्यंत तो निर्वेध जाऊ शकला असता. पण त्याचा आशावाद याहूनही भव्य होता. या नवीन चढाईचे उद्दिष्ट काय असावे असे त्याने आपल्या हाताखालील एका सेनाधिकाऱ्याला विचारले.

'नाईल नदीचा त्रिभुज प्रदेश हे उद्दिष्ट असणार' सेनाधिकाऱ्याने उत्तर दिले.

'मूर्खच आहेस.' रोमेल उद्‌गारला, 'या मोहिमेचे उद्दिष्ट हिंदुस्थान हे आहे!'

रोमेलच्या या चढाईत, काबीज केलेले इतके ब्रिटिश रणगाडे त्याने आपल्या बाजूने वापरले होते, की आफ्रिकन कोअर आणि ब्रिटिश सेनादल सारखेच दिसत होते. या चढाईने इजिप्तमधील ब्रिटिशांच्या अंतःकरणात धडकी भरली. आरमार ॲलेक्झांड्रिया बंदर सोडून गेले. कैरोमधील अधिकाऱ्यांनी महत्त्वाचे कागदपत्र जाळायला सुरुवात केली. जरूरच पडली तर पॅलेस्टाईनमध्ये, इतकेच नव्हेतर इराकमध्येही माघार घेण्याच्या योजना ठरविण्यात आल्या.

रोमेलला थोपवण्यासाठी शक्य ते सारे करण्याचा प्रयत्न ऑचिनलेकने केला. परंतु मेरसा मातृ जर्मनांच्या हाती पडले. रोमेल आता एल् अलामीनच्या उंबरठ्याशी खडा होता. ॲलेक्झांड्रिया व सुवेझ कालवा आणि रोमेल यांच्यात अवघे साठ मैलांचे अंतर होते. जुलै महिनाभर एल् अलामीनसमोर अनेक लहानमोठ्या चकमकी घडल्या. एल् अलामीन त्वरेने पादाक्रांत करण्यासाठी रोमेलने शर्थ केली. ब्रिटन आणि अमेरिकेकडून येणारी कुमक पोचायच्या आत या संग्रामाचा निर्णय रोमेलला लावायचा होता. परंतु शाही विमानदळाने अविरत आणि अचूक केलेल्या अग्निवर्षावामुळे रोमेलला आपले ईप्सित साध्य करता आले नाही. याबद्दल त्याने पुढे लिहिले 'अलामीनच्या फळीतील कित्येक मजबूत ठाणी आम्ही जिंकली इतकेच नव्हे तर त्यांना ओलांडून पूर्वेला काही मैल आगेकूच केली. परंतु तेथे मात्र आम्हाला थांबावेच लागले. आमचे बळ अपुरे पडले. येथे आमची गाठ सर्वच दृष्टींनी वरचढ अशा ब्रिटिश तुकड्यांशी पडली; त्यामुळे उरलेले आठवे सेनादल नष्ट करून पूर्व-इजिप्त पादाक्रांत करणे आम्हाला जमले नाही.'

घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

विचार करा

प्रथम पहिल्या मुलाची
सर्व तरतूद
नीट करायला
बको का?

त्याला शिक्षणाचे पहिले वहिले धडे गिरवायला मदत. त्याच्यासाठी योजलेल्या इतर अनेक गोष्टींची निश्चित तरतूद. पण अशातच इतक्या लवकर आणखी एक मूल म्हणजे मग हे सर्व कदाचित अवघड होईल. तेव्हा असा प्रसंग टाळणेच श्रेयस्कर नाही का?

लक्षावधि जोडपी जगात आज हेच करीत आहेत. ती परिस्थिती नीट अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. निरोध वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे पुरुषांनी वापरायचे रानी संतति–प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा, पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे निरोध अनेक पिढ्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत?

कुठेहि मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).

लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा जाणा

निरोध

लक्षावधींच्या पसंतीचे साधे बिनधोक संतति प्रतिबंधक

केमिस्ट, दाणी, जनरल स्टोअर्स, पानाची वाडी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

आफ्रिकेतील मोहिमेच्या अंताचा हा आरंभ होता. ऑगस्टमध्ये रिचीच्या जागी आठव्या सेनादलाचा सेनापती म्हणून मॉंटगोमेरीची नेमणूक झाली. ब्रिटिश डावपेचात तावडतोब बदल झाला. लढाई जिंकण्याची खात्री असल्याशिवाय मॉंटगोमेरी मुळी लढायला उभाच राहात नसे. रोमेलच्या रसद आणि दळणवळण व्यवस्थेवर, मॉंटगोमेरीच्या आदेशानुसार, अधिक निकराचे बॉंबहल्ले करण्यात आले. हे बॉंबहल्ले इतके प्रखर होते, की दोन वेळा खुद्द रोमेलच्याच जिवावर बेतले होते.

रोमेलने प्रत्येक उपलब्ध रणगाडा लढाईत लोटला. तुफान वेगाने ब्रिटिशांच्या फळीवर तुटून पडून ती फळी फोडण्याचा प्रयत्न रोमेलने केला. परंतु प्रचंड तोफमारा करून मॉंटगोमेरीने रणक्षेत्रच इतके उध्वस्त करून टाकले, की रोमेलच्या रणगाड्यांची धाव आपोआप थबकली; त्यानंतर जर्मन सैन्य फोडण्यासाठी मॉंटगोमेरीने पायदळाचा उपयोग केला; आणि मग रणगाड्यांनी प्रतिहल्ला चढवला.

मॉंटगोमेरीने आणखी एक गोष्ट केली. जेथे जर्मनांचा बदोबस्त पक्का होता त्या जागा हेरून त्यांच्यावरच हल्ला चढवला. त्यामुळे रोमेलचा अपेक्षाभंग होऊन त्याची फळी विस्कळीत झाली. मॉंटगोमेरीने 'आपल्या सैन्याच्या हालचाली इतक्या कौशल्याने केल्या, की हल्ल्याचा खरा जोर कोठून होणार आहे याची रोमेलला कल्पना येऊ शकली नाही. आता आफ्रिका कोअर खचू लागले. इटालियन फौजा आधीच नामोहरम झाल्या होत्या.

पुरवठ्याची परिस्थिती अत्यंत बिकट झाली. तेव्हा रोमेलने तातडीचा खलिता पाठवून माघार घेण्याची परवानगी हिटलरजवळ मागितली. माघार घेतली तरच पराभूत आफ्रिका कोअरचा सर्वनाश वा कैद टळेल, असे रोमेलने म्हटले होते. हा खलिता पाहून हिटलर संतापला. माघार घेण्याची परवानगी तर त्याने दिली नाहीच, पण वर कैरोवर चाल करण्याचा बेताल हुकूम रोमेलला केला. त्याने थिजलेल्या शब्दात रोमेलला कळवले, 'विजय वा विनाश याहून अन्य मार्ग तुझ्या सेनेला उपलब्ध नाही.' आपली गाठ एका निष्ठुर मार्थेफिरूशी पडली आहे हे रोमेलला कळून चुकले. त्याने हिटलरची आचरट आज्ञा टरकावून टाकली.

देशद्रोहाचा आरोप

४ नोव्हेंबर १९४२ रोजी आफ्रिका कोअरच्या संपूर्ण माघारीला सुरुवात झाली. ज्या रोमेलने विजयी आक्रमणाचे नेतृत्व केले होते. त्याच्यावरच हताश माघारीचे संयोजन करण्याची पाळी आली होती. यावेळी तुफान पाऊस पडत होता. परंतु या पावसानेच आफ्रिका कोअरला संपूर्ण विनाशापासून वाचविले. आफ्रिकेतील आपल्या कारकीर्दीत दुसऱ्या वेळी रोमेल इजिप्त व लिबियाच्या वाळवंटातून माघार घेत होता.

माघार घेणे हे एक भयंकर दिव्य होते. सर्वत्र अंदाधुंदी माजली होती. वाहनांचा प्रवाह रस्त्यावर पुन्हा पुन्हा तुंबत होता. आकाशातून बॉंब्स पडतच होते. दृष्टी

हिरावून घेणाऱ्या वाळूच्या वादळांनी पळणाऱ्यांची आणि पाठलाग करणाऱ्यांचीही गती अवघडली होती. सहा इटालियन तुकड्यांनी सामुदायिक शरणागती पत्करली. ज्वलन संपल्यामुळे कितीतरी रणगाडे रोमेलला वाटेतच सोडावे लागले. आपल्या मोठ्या कल्पक संयोजनामुळेच तीस टक्के तरी सैन्य शाबूत ठेवून रोमेल एल्. अलामीनपर्यंत मागे येऊ शकला.

या ठिकाणी ब्रिटिशांना थोपविण्यासाठी रोमेलने एक लहानशी झुंज दिली. ब्रिटिशांनाही आपल्या दळाची पुनर्रचना करण्याची गरज होती. २८ नोव्हेंबरला हिटलरला भेटण्यासाठी रोमेलने जर्मनीला प्रयाण केले. या भेटीत माघार घ्यायला परवानगी देण्याची गळ त्याने हिटलरला घातली. माघार घेतली नाही तर हजारो जर्मन सैनिकांचे प्राण धोक्यात येतील असे बजावून सांगितले. हिटलर रागाने बेभान झाला. रोमेलची विनंती त्याने नाकारली. उलट रोमेलवरच त्याने आग पाखडली. हिटलरबद्दल रोमेलच्या मनात असलेला उरलासुरला आदर नष्ट झाला.

दुखावलेला रोमेल पुन्हा आफ्रिकेत आला. आता त्याला थेट ट्रिपोलीपर्यंत माघार घ्यावी लागली. एल् अलामीनपासून ट्रिपोलीपर्यंतच्या चौदाशे मैल प्रदेशावर माँटगोमरीच्या नावाने उदक सोडावे लागले. रोमेलच्या प्रतिकाराला न जुमानता आठव्या सेनादलाने २३ जानेवारी १९४३ रोजी ट्रिपोलीमध्ये प्रवेश केला

रोमेलच्या फौजा मारेथपर्यंत मागे गेल्या. येथे मात्र त्याला कुमक आणि रसद मिळाली. पण या नवप्राप्त सामर्थ्याचा आता फारसा उपयोग नव्हता. कारण एकट्या माँटगोमेरीला तोंड देऊन आता भागण्यासारखे नव्हते. कारण ब्रिटिश आणि अमेरिकन फौजा फ्रेंच उत्तर आफ्रिकेत उतरल्या होत्या. दक्षिण ट्युनिशिया-मधून आठवे सेनादल रोमेलवर घसरत असताना या फौजा पश्चिमेकडून पुढे सरसावत होत्या. या सुमारास रोमेलने खेदाने लिहिले, 'यापुढे आफ्रिका कोअरने अधिक काळ आफ्रिकेत राहणे म्हणजे आत्मघात करून घेण्यासारखे आहे.'

रोमेलची प्रकृती ढासळली. पुन्हा एकदा हिटलरचे मन वळवण्याचा प्रयत्न करावा म्हणून सात मार्च रोजी रोमेल विमानाने जर्मनीला गेला. याही वेळी हिटलरने रोमेलचे म्हणणे मानले नाही.; इतकेच नव्हे तर उपचारासाठी लष्करी इस्पितळात दाखल झालेल्या रोमेलचा आफ्रिकेतील नेमणूक हिटलरने गुप्तपणे रद्द केली. ७ मे १९४३ रोजी दोस्तांनी ट्युनिश व बिझेर्त काबीज केली. आफ्रिका कोअरचे उरलेले सैनिक ट्युनिशियाच्या उत्तरं टोकापर्यंत दडपले गेले. पुरेसे नाविक साहाय्य देण्यात येऊन आपली यशस्वी सुटका केली जाईल अशी खुळी आशा त्या सैनिकांना होती. रोमेलची कामगिरी फसली होती.

या मोहिमेत दोन लक्षसदुसष्ट हजार इटालियन आणि जर्मन सैनिक ब्रिटिशांच्या हाती पडले. त्यातील बहुतेक मोहिमेच्या अखेरच्या दिवसात कैद झाले होते. सारा संघटित प्रतिकार कोसळला तेव्हा दोस्तांनी त्वरेने सिसिली आणि इटलीवर

आक्रमण केले. यथाकाल मुसोलिनीचे पतन झाले.

रोमेलची माघार घेण्याची सूचना लष्करीदृष्ट्या कशी अपरिहार्य आणि उपयुक्त होती हे भावी घटनापट सहज सांगू शकेल. पण हिटलरला तिचे सोयरसुतक नव्हते. "रोमेल हा निराशावादी, पाठीचा कणा नसलेला सेनापती आहे" असा कुत्सित शेरा हिटलरने मारला होता. दरम्यान, मानवी जीविताविषयी हिटलरला वाटणाऱ्या तुच्छतेची व्याप्ती आणि तीव्रता रोमेलच्या लक्षात येऊ लागली होती. हिटलरच्या व्यक्तिमत्वाची खरी ओळख त्याला पटू लागली होती. नाझींच्या असंस्कृत वर्तनाने व्यथित झालेला रोमेल खाजगीत, "मी सदैव उमदेपणाने युद्ध केले; माझ्या गणवेषाला नाझींनी कलंक लावला" असे उद्धार वारंवार काढत असे.

हिटलरविरुद्ध दुसरी आघाडी लवकरच उभारली जाण्याची भीती होती. तिला तोंड देण्यासाठी आखण्यात येणाऱ्या संरक्षण योजनेचे नेतृत्व करण्यासाठी हिटलरला रोमेलची अजून गरज होती. रोमेलच्या नावाला उभ्या जर्मनीत वेगळीच किंमत होती. रोमेल लष्कराचा स्फूर्तिदाता होता आणि नागरिकांचे आशास्थान होता.

अपेक्षेप्रमाणे १९४४ सालच्या जूनमध्ये दोस्तांनी फ्रान्सवर आक्रमण केले. त्यानंतर महिना उलटून गेल्यावर, खालून उडणाऱ्या एका दोस्त विमानातून होणाऱ्या गोळीबारात रोमेल जबरदस्त जखमी झाला. उपचारासाठी जर्मनीतील इस्पितळात त्याला ठेवण्यात आले. जर्मन लष्करातील कित्येक वरिष्ठ सेनाधिकाऱ्यांनी रोमेलची भेट घेतली. त्यांच्या दृष्टीने हिटलरच्या नेतृत्वाला रोमेल हाच पर्याय होता. हिटलरला उलथून टाकण्याच्या कटात भाग घेण्याची आणि पुढे दोस्तांशी तह करण्याची विनंती या सेनाधिकाऱ्यांनी रोमेलला केली.

हिटलरला प्रतिबंध केला नाही तर उभ्या जर्मन राष्ट्राची आहुती या युद्धात दिली जाईल, हे रोमेलला दिसत होते. त्यामुळे या हिटलरविरोधी कटाचे नेतृत्व करण्याचे रोमेलने स्वयंस्फूर्तीने ठरविले. परंतु थोडयाच दिवसात या कटात सामील झालेले सर्व वरिष्ठ सेनाधिकारी गेस्टॅपोने पकडले आणि त्यांना देहातांच्या शिक्षा झाल्या.

आपले भाग्य अखेर संपुष्टात आले हे रोमेलने ओळखले.

१४ ऑक्टोबर १९४४ रोजी दोन नाझी सेनापती रोमेलच्या निवासस्थानी आले. एका 'खास कामगिरी'वर ते रोमेलची सोबत करणार होते. त्यांच्याबरोबर जाण्यापूर्वी रोमेल आपल्या पत्नीला आणि मुलाला म्हणाला, "आपले घर पोलिसांनी वेढले आहे. हिटलरने माझ्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवला आहे. परंतु आफ्रिकेतील माझ्या कामगिरीची कदर करून, विषप्राशनाने मरण्याचा एक पर्याय मला देण्यात आला आहे. या दोन सेनापतींनी ते विष बरोबर आणलेलेच आहे. ते घेतलं की तीन सेकंदात सारं संपेल. ते घेतल्यास देशद्रोह्याच्या कुटुंबियांच्या बाबतीत

पृष्ठ ६० वर

राज्यात त्यांची सरकारे अधिकारावर आणली होती. पण काँग्रेसने विरोधी पक्षांनी त्यांची निराशा केली. स्वतःशी प्रामाणिक रहायचे तर कोणालाही मत न देणे हाच योग्य मार्ग होता. तोच त्यांनी अवलंबला, पण त्याचा फायदा काँग्रेसला मिळाला. काँग्रेस निवडून आली काय किंवा विरोधी पक्ष निवडून आले काय प्रत्यक्ष परिस्थितीत त्यामुळे विशेष फरक पडत नाही या अनुभवातून ही उदासीनता निर्माण झालेली आहे.

केवळ सरकार बदलून समाजपरिवर्तन होत नाही. हा जनतेला आलेला अनुभव मोलाचा आहे, पण त्यातून मतदानाच्या हक्काबद्दल उदासीनता निर्माण होणे लोकशाहीच्या वाढीला पोषक नाही. समाजपरिवर्तनाचे सत्ता हे एक साधन आहे. पण समाज परिवर्तनाचा कार्यक्रम आणि तो अंमलात आणण्यासाठी झटणारी निष्ठावंत कार्यकर्त्यांची संघटना पाठीशी नसेल तर परिस्थितीत फरक पडणार नाही. सारेच पक्ष सत्तेच्या मागे लागलेले आहेत तोपर्यंत ही परिस्थिती बदलणार नाही व मतदानाबद्दलची उदासीनताही जाणार नाही. विधानसभेच्या एका मतदारसंघात साधारणपणे पाऊण लाख ते एक लाख मतदार असतात. लोकसभा निवडणुकीप्रमाणेच या वर्षीही साडेसहा टक्के मतदान कमी झाले तर साधारणपणे प्रत्येक मतदारसंघात ५००० ते ६५०० मते कमी पडतील. चुरशीच्या मतदारसंघात एवढी मतसंख्या निकाल निश्चित फिरवू शकेल.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीची फारकत यावेळी प्रथमच करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय पातळीवरील प्रश्नांवर आणि विधानसभा निवडणुकीत प्रादेशिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले जावे असा त्यामागे उद्देश आहे. मतदार मत देताना विधानसभेचे मत एका पक्षाला व लोकसभेचे मत दुसऱ्या पक्षाला असा भेदभाव कितपत करतो ? पुण्याचेच उदाहरण घ्यावयाचे तर १९६७ च्या निवडणुकीत लोकसभेवर विरोधी पक्षाचे एस्. एम्. जोशी निवडून आले होते व त्या क्षेत्राखाली येणाऱ्या सहा विधानसभा जागांपैकी चार काँग्रेसने व दोन विरोधी पक्षांनी जिंकल्या होत्या. विधानसभेच्या दोन तृतीयांश जागा जिंकूनही लोकसभेची जागा त्यावेळी काँग्रेसने गमावली होती. म्हणजे लोकसभा व विधानसभेसाठी मतदार सारख्याच प्रकारे मतदान करीत नाहीत. सबंध देशाच्या दृष्टीने विचार केला तर १९६७ साली लोकसभा निवडणुकीत ६१·३३ टक्के व विधानसभा निवडणुकीत ६१·१७ टक्के म्हणजे जवळजवळ सारखेच मतदान झाले. राज्यवार विचार केला तर फक्त आसाम, काश्मीर आणि पश्चिम बंगालमध्ये अनुक्रमे ३·३१, ३·१० व १·५८ टक्के मते लोकसभेपेक्षा विधानसभा निवडणुकीत जास्त पडली, बाकी राज्यात ही तफावत अर्धा ते एक टक्क्यापेक्षा जास्त नव्हती. राजकीय पक्षांच्या दृष्टीने विचार केला तर काँग्रेसला लोकसभेत ४०·७३ टक्के व विधानसभा निवडणुकांत ४०·१० टक्के म्हणजे जवळजवळ सारखीच मते

मिळाली. स्वतंत्र पक्षाला लोकसभा निवडणुकीत १·७७ टक्के मते अधिक मिळाली. बाकी पक्षांच्या दोन्ही निवडणुकांतील मतदानात एक टक्क्यापेक्षा कमीच तफावत होती. ज्या राज्यात विधानसभेत काँग्रेसने हुकमी बहुमत गमावले तेथे लोकसभेतही काँग्रेस बहुमत गमावील अशी अपेक्षा होती पण तसे घडले नाही. विधानसभेत बहुमत गमावलेल्या आठ राज्यांपैकी उत्तरप्रदेश, बिहार आणि पंजाब या तीन राज्यांत काँग्रेसने लोकसभेच्या बहुसंख्य जागा जिंकल्या. लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या मतदानात याप्रमाणे तफावत १९६७ साली दिसून आली.

विधानसभा निवडणुकांत वास्तविक राज्यांच्या प्रश्नांवर भर द्यावयास हवा. पण काँग्रेसचे नेते तसे करताना दिसत नाहीत. हिंद-पाक युद्धातील विजय आणि इंदिरा गांधींच्या प्रभावी व्यक्तिमत्वाचे वलय यांचा जास्तीत जास्त फायदा उठवून सर्वच राज्यात आपल्या हाती सत्ता आणावयाची असा काँग्रेस नेत्यांचा उद्देश आहे. गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांच्या बड्या आघाडीचा धुव्वा उडाला त्याची हाय घेऊन अशी आघाडी यावेळी त्यांनी स्थापलेली नाही. डावे गट विस्कळीत आहेत. उजवे गटही विस्कळीत आहेत, या शिवाय अपक्ष उमेदवार प्रत्येक ठिकाणी उभे आहेतच यामुळे सरळ चुरशीच्या लढती यावेळी फार थोड्या होतील व बहुरंगी लढतीत विरोधी उमेदवारांची मते विभागली जाऊन त्याचा फायदा काँग्रेसला मिळेल. सर्वसाधारणपणे सर्व राज्यांत चांगले यश मिळविण्यास काँग्रेसला अनुकूल परिस्थिती आहे.

काँग्रेसच्या निवडणूक धोरणाच्या दृष्टीने दोन महत्वाच्या घडामोडी यावेळी झालेल्या आहेत. सर्व राज्यात सत्ता तर मिळवायचीच पण सर्व राज्यातील मुख्यमंत्रीसुद्धा आपली धोरणे अंमलात आणणारे असतील अशी दक्षता यावेळी इंदिरा गांधींनी घेतली आहे. हे धोरण त्यांनी स्वीकारण्याचे कारण गेल्या वर्षी मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत काही मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या जमीन सुधारणा कार्यक्रमाला केलेला विरोध. या मुख्यमंत्र्यांना अधिकारपदावरून दूर करण्याचे त्यांनी त्याचवेळी ठरविले. प्रथम राजस्थानचे मुख्यमंत्री सुखाडियांची उचलबांगडी झाली. त्यानंतर काही महिन्यांनी आंध्रचे ब्रह्मानंद रेड्डी मुख्यमंत्रिपदावरून दूर झाले. या नंतर मध्यप्रदेश व आसाम येथील मुख्यमंत्री इंदिरा गांधींनी निवडणुकीपूर्वीच बदलले. नवे मुख्यमंत्री माजी मुख्यमंत्र्यांपेक्षा अधिक कडवे समाजवादी आहेत असे मानण्याचे कारण नाही. काँग्रेसच्या राजकारणात सध्या समाजवादावरील निष्ठेपेक्षाही इंदिरा निष्ठेला अधिक मोल आलेले आहे आणि आपणच अधिक इंदिरानिष्ठ असे दाखविण्यासाठी काँग्रेस नेत्यात केविलवाणी स्पर्धा चालू असल्याचे दृश्य दिसत आहे. निरनिराळ्या राज्यातील काँग्रेसच्या राजकारणात एवढ्या मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप पंडित नेहरू व लालबहादुर शास्त्रींनीही केला नव्हता. सर्व राज्यांवर आपल्या नेतृत्वाची पकड बसविण्यासाठी आपली माणसे इंदिरा गांधी राज्यावर लादीत आहेत आणि राज्यपातळीवरील नेते ते अगतिकपणे मान्य करीत आहेत. या सर्व घटनांत निकोप

लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीने खेदाची गोष्ट म्हणजे पक्षांतर्गत लोकशाही कार्यपद्धतीच्या प्रथा डावलल्या जात आहेत. त्याला विरोध करण्याचे धैर्य तर कोणी दाखवले नाहीच पण त्याबद्दल कोणाला खंतही वाटत असल्याचे दिसत नाही.

राज्याचा मुख्यमंत्री विधीमंडळातील बहुमतवाल्या पक्षाने निवडावयाचा ही खरी लोकशाही प्रथा. पण आंध्रप्रदेश व आसाममध्ये केंद्रीय नेत्यांनीच मुख्यमंत्री निवडला व तो विधिमंडळ पक्षावर लादला. वास्तविक तेथे आतापर्यंत जे मुख्यमंत्री होते त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडण्यात येऊन नेता बदलण्याची मागणी बहुसंख्य आमदारांनी केलेली होती असे नाही. पक्षांतर्गत लोकशाही पद्धतीने नव्हे तर हुकूमशाही पद्धतीने इंदिरा गांधींनी हे बदल घडवून आणले. इंदिरानिष्ठेच्या नावाखाली अशा गोष्टी विरोधाचा किंवा नापसंतीचा एक शब्दही न उच्चारता चालू राहिल्या तर लोकशाहीच्या नावाखाली त्यातून प्रत्यक्षात एका व्यक्तीची हुकूमशाही निर्माण होण्याचा धोका आहे.

काँग्रेसच्या दृष्टीने दुसरी महत्वाची घडामोड म्हणजे काँग्रेसने यावेळी अनेक राज्यांत कम्युनिस्टांशी मोठ्या प्रमाणात केलेली युती किंवा समझोता. पश्चिम बंगालमध्ये तर काँग्रेसने कम्युनिस्टांशी आघाडीच केलेली असून त्यांना ४१ जागा दिल्या आहेत. बिहारमध्ये त्याच्यासाठी ५० जागा सोडल्या आहेत. एवढ्या जागा सोडण्याइतके कम्युनिस्टांचे बळ या दोन्ही राज्यात नसताना काँग्रेस नेत्यांनी त्यांच्याशी हा समझोता केला याचे कारण काँग्रेसला या दोन राज्यात स्वतःच्या बळावर आपण निर्णायक बहुमत मिळवू अशी खात्री वाटत नाही. या समझोत्याची किंमत म्हणून मध्यप्रदेशात ६, त्रिपुरामध्ये ५, राजस्थानात ५, म्हैसूरमध्ये ४, पंजाबमध्ये ४ व काश्मीरमध्ये १ जागा कम्युनिस्टांनी मागून घेतली व काँग्रेसला ती देणे भाग पडले असे दिसते.

महाराष्ट्र हा काँग्रेसचा बालेकिल्ला पण तो केवळ काँग्रेसचा बालेकिल्ला न राहता तेथील राजकारणाची सूत्रे आपल्या पकडीखाली आणण्याचा इंदिरा गांधींचा प्रयत्न होता. यावेळी त्यांना तशी संधी मिळाली व त्यांनी ती साधली. महाराष्ट्राचे काँग्रेस राजकारण म्हणजे आतापर्यंत यशवंतराव चव्हाणांची मक्तेदारी होती. ही मक्तेदारी मोडण्याचे यावेळी इंदिरा गांधींनी ठरविले. त्यासाठी शंकरराव चव्हाण, तुळशीदास जाधव या मंडळींना त्यांनी जवळ केले. प्रदेश काँग्रेसच्या पार्लमेंटरी बोर्डावर दोन जागा रिकाम्या होत्या. शंकरराव चव्हाणांनी सुचविलेल्या व्यक्ती तेथे घेतल्या जाव्यात असा आग्रह इंदिरा गांधींनी धरला व तो प्रदेशनेत्यांनी मान्य केला. त्यानंतरचा प्रश्न भावी मुख्यमंत्र्याच्या वादाचा. मुख्यमंत्रीपद मराठवाड्यास मिळाले पाहिजे अशी मागणी शंकरराव चव्हाणांनी केली होती व नाईकच नेतेपदी चालू रहावेत असे मत यशवंतराव चव्हाणांनी जाहीरपणे व्यक्त केले होते. हा वादही अखेर इंदिरा गांधींकडे सोपविण्याचे प्रदेश पार्लमेंटरी बोर्डाने ठरविले. पंतप्रधान याबाबत निवडणुकीनंतर निर्णय देणार आहेत. यानंतर प्रश्न आला मंत्र्यांना तिकिटे

देण्याचा. याबाबतही प्रदेश पार्लमेंटरी बोर्डाने काही निर्णय न घेता तो पंतप्रधानावर सोपविला. अखेर सात मंत्री गाळण्यात आले. तिरपुडे यांना गाळण्यात आल्यानंतरही त्यांच्याबद्दलचा निर्णय अगदी शेवटच्या क्षणी बदलून त्यांना पुनः तिकीट देण्यात आले. मंत्री गाळताना, उमेदवार निवडताना काही निश्चित कसोट्या लावल्या गेल्या असेही नाही. निवडलेले सर्व उमेदवार समाजवादी निष्ठेचे आहेत असेही नाही. तिकिटे मिळालेल्यात सहकारी साखर कारखानदार आहेत, संस्थांचे नातलग आहेत. लक्षमोजने शंकरराव मोहिते यांच्यावर एवढी टीका झाली, की ते स्वतःच निवडणुकीतून निवृत्त झाले पण त्यांच्या मतदार संघात त्यांच्याच गटाच्या माणसाला तिकीट मिळाले आहे. उमेदवार निवडीतील यावेळचा एकच फरक म्हणजे अल्पसंख्य जमाती व स्त्रिया यांना थोड्या अधिक प्रमाणात जागा मिळाल्या आहेत. काँग्रेस यादीत बहुसंख्य उमेदवार मुख्यमंत्री वसंतराव नाईक यानाच अनुकूल आहेत तेव्हा मुख्यमंत्रीपदावर त्यांचीच पुनः निवड होण्याची शक्यता आहे. पण सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणाची सूत्रे आता इंदिरा गांधींनी हाती घेतली. यशवंतराव चव्हाणांची मक्तेदारी संपवण्यात त्यांना यश आले. यादीबद्दल काही ठिकाणी काँग्रेस कार्यकर्त्यांत असंतोष असून काही मतदारसंघात तिकीट नाकारलेले काँग्रेस नेते अधिकृत उमेदवाराविरुद्ध उभे आहेत पण त्यांना यश मिळण्याची शक्यता फारशी नाही.

काँग्रेसच्या दृष्टीने महाराष्ट्रातील आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे रिपब्लिकन पक्षाशी (गायकवाड गट) यावेळी काँग्रेसचा समझोता नाही पण त्यामुळे काँग्रेसच्या यशावर फारसा परिणाम होईल असे वाटत नाही. रिपब्लिकन पक्षाच्या दोन गटांत एकजूट असती आणि त्यांनी इतर डाव्या पक्षांशी समझोता केला असता तर काँग्रेसवर काही प्रमाणात परिणाम झाला असता पण तसे घडलेले नाही. रिपब्लिकन पक्षाच्या दोन गटांत फक्त मुंबई शहरातील काही जागांपुरता समझोता झालेला आहे.

डाव्या पक्षांमध्ये समाजवादी व शे का. पक्ष यांनी निवडणूक समझोता केला आहे. पण कम्युनिस्ट त्यात सामील नाहीत. कम्युनिस्ट आणि मार्क्सवादी यांच्यातही समझोता नाही. डावे गट ज्याप्रमाणे विस्कळीत आहेत त्याचप्रमाणे जनसंघ, स्वतंत्र पक्ष, संघटना काँग्रेस हे उजवे गटही विस्कळीत आहेत. त्याचा परिणाम म्हणजे बहुरंगी सामने होऊन विरोधी पक्षांची मते विभागली जाणार व त्याचा फायदा नेहमीप्रमाणे काँग्रेसला मिळणार ही सर्व परिस्थिती लक्षात घेता काँग्रेसला महाराष्ट्रात नेहमीप्रमाणे यावेळीही मोठे यश मिळण्याची शक्यता आहे असे असले तरी १९६७ व १९७१ च्या निवडणुकांचा तुलनात्मक विचार करता काँग्रेसचे व विरोधकांचे बळ कोठे कमी झाले, कोणत्या जागांवर लक्ष केंद्रित केल्यास विरोधी पक्षांना त्या मिळण्याची शक्यता आहे, याचा अधिक तपशीलावर विचार पुढील अंकात.

□ □ □

तरुण रक्ताला वाव हवा

मुंबईत मात्र एकाच तरुणाला जागा !

प्रतिनिधी

बी. पी. सी. सी. त (मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटी) सध्या धमाल चालू आहे. उमेदवारांची यादी पक्की होऊन अर्जही भरले गेले आहेत. तरीही सर्वत्र भरपूर नाराजी आहे. याचा परिणाम काही प्रमाणात का होईना पण निवडणूकीवर होणार आहे. गेल्या जानेवारी, पाच तारखेला युवक काँग्रेसच्या सुमारे ३०० कार्यकर्त्यांनी काँग्रेस सदन येथे उग्र निदर्शने केली. त्याआधी तिकिटे देताना युवक काँग्रेसला योग्य प्रतिनिधीला न दिल्याबद्दल तेथेच ४० तासांचे धरणे व उपोषणे केली होती. मध्यस्थी होऊन बी. पी. सी. सी. चे नवे अध्यक्ष श्री. रजनी पटेल यांच्या हातून लिंबाचा रस घेऊन उपोषणे सुटलीही होती. शनिवारीच काँग्रेस कार्यकारिणीची बैठक होऊन पक्ष निर्णयाविरुद्ध निषेध व्यक्त करणाऱ्यांवर पक्षद्रोहाचा आरोप ठेवून कडक उपाययोजना करण्याचे ठरले आणि मग युवक काँग्रेसचे कार्यकर्ते संतप्त झाले. युवक काँग्रेसला योग्य प्रमाणात तिकिटे का दिली नाहीत याचे रजनी पटेल यांनी स्पष्टीकरण करावे अशी मागणी तेथे केली गेली. बी. पी. सी. सी.च्या पदाधिकाऱ्यांवर निदर्शकांनी तोंडसुखही घेतले.

निदर्शने करणाऱ्यात अनेकजण 'भाडोत्री' होते. तिकिटे न मिळालेले उमेदवार त्यामागचे 'बोलविते धनी' होते, वगैरे आरोप निदर्शन-विरोधी गोटातर्फे सर्रास चालू आहेत.

त्या निदर्शनांना विरोध दर्शविण्यासाठी आणि प्रदेश काँग्रेसच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करण्यासाठी युवक काँग्रेसच्या काही युवकांनी एक मोर्चा आयोजित केला होता. शनिवारची निदर्शने करणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करा. त्यांना पक्षातून हाकलून लावा अशी त्यांची मागणी होती.

काँग्रेस पक्षात सध्या सर्वत्र बंडाळी चालू आहे. काही नगरपित्यांनी बंड उभारले आहे. तर मालाड मतदार संघातून काँग्रेसतर्फे उभे असलेले श्री. माधवराव परांजपे यांच्या निवडणूक प्रचार केंद्राच्या उद्‌गाटनप्रसंगीही निदर्शने झाली.

तिकीटवाटप म्हटले म्हणजे नाराजीचा प्रश्न आलाच. साऱ्यांनाच खूष ठेवता येत नाही. पक्षशिस्तही महत्त्वाची असते हे सारं खरं आहे, पण मोठ्या प्रमाणात नाराजी निर्माण होण्यासाठी तशीच काही कारणेही असतातच. बी. पी. सी. सी. त्याच कात्रीत सापडली आहे.

आज अनेक वर्षे बी. पी. सी. सी. विरुद्ध काहीना काही नाराजी आहेच. काँग्रेसच्या दुफळीपूर्वी बी. पी. सी. सी. श्री. स. का. पाटील यांची बटीक होती. दुफळीनंतर श्री. अनंत नामजोशी अध्यक्ष झाले पण त्यांचीही कारकीर्द काही खास अशी झाली नाही. गेल्या महिन्यात रजनी पटेल, मेंगदे आदी मंडळींनी बी. पी. सी. सी. ची सूत्रे हाती घेतली पण नवे राज्य सुरू होण्याच्या सुमारासच निवडणुकीची तिकिटे देण्याची अवघड कामगिरी त्यांच्याकडे आली. शिवाय त्यांच्या 'राजकीय लाल रंगा'बाबतही अनेकांना अविश्वास वाटत आला आहे. त्यांच्या कामाच्या पद्धतीबद्दलही बहुसंख्य काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मनात नाराजीचाच सूर आहे. या बद्दलच्या अद्याप प्रसिद्ध न झालेल्या पण खात्रीलायक अशा काही बातम्याही माझ्या कानावर आल्या आहेत.

युवक काँग्रेसची तिकीट वाटपाबाबतची नाराजी समजण्यासारखी आहे. काँग्रेसच्या दुफळीपासून ते काल परवा पर्यंतच्या घटनांची माहिती असणाऱ्यांना हे अधिक चांगल्या प्रकारे समजेल.

१९ जुलै ६९ रोजी बँकांचे राष्ट्रीयकरण झाले. आणि ताबडतोब २० जुलै या दिवशी एच्. वॉर्ड जिल्हा युवक काँग्रसचे अध्यक्ष श्री. भाऊराव पाटील यांनी यांनी पुढाकार घेऊन सहकार मंत्री श्री. यशवंतराव मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली परळला एक युवक मेळावा भरवला. या मेळाव्यात श्रीमती इंदिरा गांधी यांना पाठिंबा दर्शविणारा व पाठींबा देण्यासंबंधी मुंबईच्या तरुणांना आव्हान करणारा ठराव सम्मत करण्यात आला. याबद्दल स. का. पाटील गटातील कंपूने श्री. भाऊराव पाटील व इतर कार्यकर्त्यांवर दोन महिने बारीक लक्ष ठेवले होते. त्यानंतर ५ ऑक्टोबर रोजी श्री. भाऊराव पाटील प्रभृतींनी एक गुप्त बैठक घेतली व त्याच बैठकीत श्री. गजानन लोके यांच्या अध्यक्षतेखाली बी. पी. सी. सी. रिव्हायरलायझेशन कमिटी स्थापन करण्यात आली. इंदिरा गांधींच्या धोरणासंबंधी बी. पी. सी. सी. ची काय भूमिका आहे याचा मागोवा घेण्याचाही प्रयत्न सुरू झाला.

६९ च्या नोव्हेंबरात श्री. भानुशंकर याज्ञिक यांच्या मध्यस्थीने तीन दिवसांचे शिबीर घेण्यात आले. त्यात श्री. स. का. पाटील यांनी युवक काँग्रेसवर पक्षनिष्ठ नसल्याचा व इतर अनेक आरोप केले. त्यानंतर लवकरच काँग्रेसमध्ये दुफळी पडली.

७० च्या जानवारीत बी. पी. सी. सी. च्या अस्थायी समितीबरोबरच युवक काँग्रेसचीही अस्थायी समिती स्थापन करण्यात येऊन श्री. भाऊराव पाटील यांची युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली. त्यानंतर ८ महिन्यांत त्यांनी युवक-काँग्रेस सदस्य-नोंदीम पूर्ण केली व युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका घेतल्या. ते स्वत: युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. याच सुमारास श्री. नामजोशीही काँग्रसचे अध्यक्ष झाले. ४० हजार सदस्य संख्या असलेल्या युवक काँग्रेसने लोकसभेच्या निवडणुकीच्यावेळी चांगली कामगिरी बजावली होती.

ही सारी ताकद पाहून युवक काँग्रेसने २५ टक्के म्हणजे मुंबईतील २८ पैकी सात जागांची मागणी केली. पण त्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या. नाही म्हणायला नायगाव मतदार संघाची जागा श्री. विलास सावंत यांना देण्यात आली. पण असे म्हणतात, की तेथे उभे रहायला कोणीच तयार नसल्याने ती त्यांना देण्यात आली. ॲड. रामराव आदिक यांच्यासारखी मातब्बर आसामीही तेथे उभी रहायला राजी नव्हती. याचे कारण सध्याचे समाजवादी पक्षाचे आमदार श्री. राम महाडिक यांचे त्या भागात चांगलेच वजन आहे व ते पुन्हा तेथूनच निवडणूक लढवीत आहेत. युव . काँग्रसला डावलले असे व्हायला नको म्हणून श्री. सावंत यांची तेथे वर्णी लागली.

इतरत्र चित्र वेगळे आहे. बंगालातील २४० जागांपैकी ९८ जागा युवक काँग्रेसला मिळाल्या आहेत. मणिपूर युवक काँग्रसने एकूण १४ जागा मागितल्या होत्या तर त्यांना २० जागा दिल्या गेल्या. मध्य प्रदेशात युवक काँग्रेसने ३५ जागा मागितल्या, ३४ देण्यात आल्या. राजस्थानने २५ टक्के जागा युवक काँग्रेसच्या उमेदवारांना दिल्या. महाराष्ट्रात युवक काँग्रेसने २५ जागा मागितल्या त्यांपैकी १७ त्यांना मिळाल्या. ३५ वर्षे ही वयोमर्यादा विचारात घेतली तर महाराष्ट्रात ४७ जागा तरुणांना देण्यात आल्या आहेत. पण तरुण रक्ताला वाव दिला पाहिजेचा घोशा करणाऱ्यांनी मुंबईत एकाच तरुणाला जागा दिली. मुंबईतील काँग्रेस उमेदवारांचे सरासरी वय ५२ आहे.

कायदेमंत्री श्री. हरिभाऊ गोखले यांनी कमीत कमी १५ टक्के जागा युवक काँग्रेसला मिळतील असे आश्वासन दिले होते, पण त्याला निवड समितीने हरताळ फासला.

श्री. रजनी पटेल व बी. पी. सी. सी. च्या पदाधिकाऱ्यांना युवक काँग्रेसच्या लोकांना भेटायला वेळ नव्हता. त्यांनी युवक काँग्रेसच्या लोकांचे म्हणणे ऐकून घेतले असते तर निश्चितच युवक काँग्रेसला अधिक जागा देणे कसे योग्य आहे ते त्यांच्या ध्यानात आले असते. निवड करताना चुका झाल्याचे श्री. रजनी पटेल यांनी मान्य केले आहे. पक्षांतरितांना त्याचप्रमाणे नगरपिते व कार्यकारिणीचे सदस्य यांना तिकिटे मिळणार नाहीत तसेच निवड करताना शैक्षणिक पात्रता ध्यानात

घेतली जाईल असे ठरले होते पण निवडसमिती अगदी या विरुद्ध वागली. डॉ. दत्ता सामंत, डॉ. वामनराव मठकर, ॲड. शरद दिघे या पक्षांतर केलेल्यांना तिकिटे देण्यात आली. यावर आता अशी मल्लिनाथी केली जाते, की डाव्या विचारसरणीच्या पक्षांतरितांना तिकिटे द्यायची हे निवड समितीचे धोरण होते.

निवड समितीची एक गमतीदार गोष्ट येथे द्यायला हरकत नाही. मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे पार्लमेंटरी बोर्ड बसण्याआधी ४८ तास काँग्रेस उमेदवाराची तयार असलेली सपूर्ण यादी साम्यवादीपक्षाच्या काही जेष्ठ कार्यकर्त्यांना माहित होती अशी माहिती मला एका खात्रीलायक गोटातून मिळाली. दुसरी एक गंमत म्हणजे २४ जानेवारीला मुख्यमंत्र्याच्या 'वर्षा' निवासस्थानावर पार्लमेंटरी बोर्डाची बैठक भरली होती. त्या बैठकीत बोर्डाच्या सदस्यांनी उमेदवारांच्या निवडीबाबत चर्चा करायची नाही किंवा काही कॉमेंटस् करायच्या नाहीत असा अध्यक्षांनी सक्त आदेश दिला. दुसरे म्हणजे यादीबाबत मोठे वादळ निर्माण होण्याची शक्यता गृहीत धरून मुंबईतून लोकसभ निवडून गेलेले एक सदस्य उद्गारले. 'आता कुठे तरी लपून बसायला पाहिजे.'

काँग्रेस कार्यकर्त्यांत एक असा विचार सध्या मूळ धरून आहे, की मुंबईत अनेक ठिकाणी साम्यवादी उमेदवार निवडून येण्याच्या दृष्टीनेच काँग्रेस उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.

श्री. पटेल मुंबईची यादी घेऊन दिल्लीला गेले. तेथे. त्यांनी सेन्ट्रल इलेक्शन कमिटीत युवक काँग्रेसला तिकिटे देण्याबाबत ठाठर भूमिका घेतली. युवक काँग्रेसला योग्य प्रतिनिधित्व मिळावे म्हणून श्री. सिद्धार्थ शंकर राय, श्री. चंद्रशेखर व शंकर दयाळसिग यांनी खूप प्रयत्न केले. पण श्री. रजनी पटेल यांनी त्याला कडाडून विरोध केला. 'संघटनेसाठी मला युवक काँग्रेसचे लोक पाहिजे आहेत' यासबबीखाली त्यांनी यादी बदलण्याचे टाळले.

या साऱ्या पार्श्वभूमीवर युवक काँग्रेसचे कार्यकर्ते संतप्त होत होते. गेल्या गुरुवारी (फेब्रुवारी) युवक काँग्रसच्या कार्यकारिणोची तातडीची बैठक होऊन त्यात शनिवारच्या मोर्चाचा एकमुखी निर्णय घेण्यात आला. कारण बो. पी. सी. सी. चे पदाधिकारी त्यांची भेटच घेत नव्हते. त्याला वाचा फोडण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. निदर्शने आटोपल्यावर जेव्हा शिस्तभंगाचो कारवाई आदी भाषा सुरू झाल्यावर मात्र, श्री. निळकंठ जाधव व अनिल गांधी हे युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष बाजू बदलू लागले. आज युवक काँग्रेसचे ३२ पदाधिकारी दुसऱ्या गोटात आहेत. शिस्तभंगाच्या कारवाईचा विचार अजूनही चालू आहे. नगरपालिका निवडणुकीत असंतुष्टांना संतुष्ट करण्याचा हुकमी एक्काही तयार असल्याची अनधिकृत बातमी आहे. पण दिलजमाई झाली तरी नाराज कार्यकर्ते निवडणुकीचे काम करताना उसना उत्साह आणून आणून किती आणणार?

□ □□

जाहिराती गोळा करून वर्तमानपत्रात त्यांचं सुरेख वितरण करीत. नव्या नव्या कल्पना राबवीत. गिऱ्हाइके खूष होत. तिथे त्यांचा बरा जम बसला होता. नुसत्या जाहिरातींना पोष्टाच्या स्टँपासारखे जर ते चिकटून राहाते तर ते मारे मिजाशीत आयुष्य भोगते. पण त्यांना उबळ आली आणि त्यांनी स्त्रियांसाठी 'संजीवनी' नावाचं साप्ताहिक सुरू केलं. यात प्रच्छन्न हेतू दोन होते. एक म्हणजे स्वतःला मनमोकळेपणाने लिहायला हक्काची जागा मिळवणं आणि दुसरा-खास स्त्रियांसाठी म्हणून ढकललेल्या या नावेत जलक्रीडेसाठी म्हणून कोणी सहचारिणी मिळाली तर पहावं. बापूंनी 'वायुपुत्र' या टोपण नावाने खरोखरीच फार सुंदर विनोदी स्तंभ-लेखन 'संजीवनी'तून केलेलं आहे. तीर्थरूपांचा विनोदाचा बाज या चिरंजीवांच्या लेखणीत जरूर उतरलेला होता. किंबहुना, प्रभाकरबापूंचं विनोदी लेखन इतक्या वरच्या दर्जाचं आहे, की मराठीतलं विद्यमान विनोदी लेखन म्हटल्यावर वि. वि. जोशी, आचार्य अत्रे आणि पु. ल., ही संध्येतली इनमिन तीन नावं घेऊन आळी-मिळी गूप चिळी करण्याची जी पाळी आज वाचकांवर येते, ती प्रभाकरपंतांचा विनोदी हात राबता राहिला असता तर येती ना! पु. ल. देशपांडे एकदा खाजगीत मला म्हणाले होते, की श्रीपाद कृष्णांचा विनोदातला खरा चेला हा प्रभाकरबापूच आहे! पण आपली प्राणशक्ती धड न ओळखण्याची चूक प्रभाकरबापूंनी केली. आपल्या हातातल्या विद्येची ज्याला ओळख पटत नाही त्याच्या भाळी नियती अधः पातच लिहिते. आपल्या धमणीतल्या रक्ताची ऊब ज्याला कळत नाही त्याच्या कर्तृत्वाला करंटेपणाचा शाप चिरकाल भोगावा लागतो. विनोदी लेखकाकडे जी नजर असावी लागते तिची उपज बापूंपाशी सुरुवातीला होती. पुढे ती लुप्त झाली आणि शाब्दिक फिरवाफिरवीचं कळाहीन रूप त्यांच्या विद्येने धारण केल. तिथून गाडं जे घरंगळलं ते घरंगळलंच. निःसत्व शाब्दिक कोटचा करून प्रभाकर-बापू आपलं हसं करून घेऊ लागले. त्यांनी जन्मभर विनोदी अंगाने टीकाटिप्पणी केली. 'विविध वृत्त', 'आलमगीर', 'नवयुग' 'सोलापूर समाचार' अशा अनेक थरांवरत्या नियतकालिकांतून त्यांनी रगड लिहिलं. 'वाऱ्यावरची वरात' हा स्तंभ ते 'आलमगीर'मध्ये वर्षोनु वर्षं लिहीत होते. पण त्या साऱ्या लेखनाला कागाळीचं स्वरूप प्राप्त झालं. साहजिकच धड ना चव की चोथा या यत्तेपर्यंत त्यांच्या लेखन-गुणांची उतरती भाजणी झाली. विनोदसम्राट श्रीपाद कृष्णांच्या लेकाचं दैव असं तिरपगडं निघावं हा नियतीने केवढा बरं क्रूर विनोद करून दाखवला!

प्रभाकरबापूंच्या विद्येचं हे अवमूल्यन का झालं?...सांगतो.

गरजूपणाने त्यांना फार पांगळं केलं. तसा पैसा त्यांच्या हातात त्यांच्यापुरता जरूर होता, कारण जाहिरातींचं उत्पन्न होतं. खाण्यापिण्यातही त्यांचे चोचले

असत. ते स्वत:च्या हाताने जेवणखाण रांधून मित्रांनाही खिलवत. मित्रही ते सुग्रास अन्न यथेच्छ चापीत. पण मित्र त्यांच्या ब्रह्मचर्याची रेवडी उडवीत आणि त्यांना दटावणं बापूंना जमलं नाही. का जमलं नाही ? कारण ह्याच मित्रांकडून मिळणाऱ्या साहित्यातील मान्यतेवर आपलं आसन स्थिर होणार आहे असा त्यांचा चुकीचा ग्रह होता. म्हणजे साहित्यप्रांतात आणि प्रेमाच्या प्रांतात, अशा दोन्ही निसरड्या क्षेत्रात ते गरजू होते. असे जोड गरजू अनेक असतात. पण हे अवघड गरजूपण नियतीने मुंडावळ्यांसारखं बापूरावांच्या डोक्यावर बांधून ठेवलं होतं. लेखिकांना आणि कवियत्रींना प्रसिद्धीच्या उजेडात लोटता लोटता स्वत: बापू कुचेष्टेच्या सज्ज्यात येऊन थडकले. बरं, इतकं करून एक कवयित्री या राजसाला हृदयदान करील तर हराम ! बापूंनी त्यांना पत्रं पाठवली, भेटी पाठवल्या, फळफळावळ पाठवली, आणि बदल्यात त्यांच्या मेजावर जमल्या कूचकामी कवितांच्या पत्रावळी, आणि ज्या कवयित्रींचे अन्यत्र विवाह जुळले त्यांच्या लग्नाच्या अक्षता ! बरं, बापू हाडाचे भीरू आणि भाबडे. त्यामुळे थट विषयाला हात घालणंही त्यांना जमत नसे. ते ज्यावेळी बायकांशी बोलत असत त्यावेळी दुसऱ्या कुणाही पुरुषाने जवळपास फिरकलेलं त्यांना खपत नसे. त्याचप्रमाणे एखादा पुरुष एखाद्या बाईशी बोलत असलेला त्यांना नुसता दिसला तरी त्यांचा जीव कासावीस होई; त्या बाईचा परिचय करून देण्याची ते त्या पुरुषाला फारच गळ घालीत. बस्स ! यापुढे बापूंची मजल कधीच गेली नाही. He was too much of a gentleman. आणि त्यांनी गोळा केलेलं मित्रमंडळ तेवढंसं सांभाळून घेणारं नव्हतं. थोडंसं थट्टेखोर आणि वात्रट होतं. एकदा त्यांच्या एका मित्राने आवाज चोरून त्यांना फोन केला, 'मी अमुक अमुक लेखिका गावी निघत आहे. तुमचा निरोप घ्यायची उत्कंठा होती पण वेळ नव्हता. तेव्हा फोनवरूनच निरोप घेत्ये हं.' बापू गंडले. त्यांनी तडक मडई गाठली. सफरचंदांचा करंडा भरला आणि तो घेऊन ते बोरीबंदराचे प्लॅटफॉर्म धुंडाळू लागले ! असं अनेकदा झालं. भल्या मित्रांनी त्यांच्या डोक्यावर अक्षता पडाव्यात म्हणून खूप लटपटी केल्या. मुली पाहिल्या. बापूंनीही प्रत्येक वेळी उत्साह दाखवला. झकासपैकी ड्रेस घालून बापू शिऱ्यासाठी जात, पण तिथे गेल्यावर त्यांचं सारं अवसान, आभाळ दाटून यावं तसं गळून पडे. सर्वांचाच नाइलाज होई. ब्रह्मचर्याचा गारठा जाणवू लागे. यावर कुणाचाच इलाज नसे अर्पणोत्सुक स्त्री ही काय चीज आहे ते बापूंना कधी कळलंच नाही. ते फक्त भलाई जोडीत राहिले. ती त्यांना मिळालीही असेल. पण स्त्री मात्र लाभली नाही ती नाहीच ! स्त्री, विशेषत: परस्त्री, ही सेवेला नव्हे तर सत्तेला वश आहे; गोड गोड स्वभावाला नव्हे, तर दिलखुलास वृत्तीला आणि विनोदी वाचेला वश आहे; भेटींची ओझी वाहून आणणाऱ्या हेल्याला नव्हे, तर कलेत कृतार्थता अनुभवणाऱ्या कलंदराला वश आहे; दामाजीपंतांना नव्हे, तर दानत शुद्ध असलेल्याला जीवन-

वीराला वश आहे; नुसत्या साहित्यिकाला नव्हे, तर शहाण्या साहित्यिकाला वश आहे, हे मर्मांचं सत्य बापूंना कळलं नाही. तसं ते अनेक पंडितांनाही कळत नाही. पण पंडीत लोक लग्नाच्या मांडवाखालून जाण्याइतके तरी धूर्त असतात. बापू धूर्त नव्हते हाच घोटाळा झाला. आचार्य अत्रे, डॉ. देवभक्त, शामराव ओक, वसंत शांताराम देसाई, माधव मनोहर, बाळ सामंत वगैरे त्यांच्या इष्टमित्रांनी बापूंसाठी दूरवर जाळं फेकून पाहिलं. जाळ्यात फक्त फेस तेवढा आला. एच. जी. वेल्सचं अनुभवसिद्ध सांगणं असे, की ज्याच्यापाशी दिडक्या आहेत आणि सोईस्कर जागा आहे त्याला स्त्री सहजप्राप्य आहे बापू इंग्लंडमध्ये आठ महिने राहूनही वेल्समहाशयांना उपदेशामृतासाठी भेटले नाहीत हे एकापरीने बरं झालं. कारण या दोन्ही सिद्धता उपलब्ध असूनही प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर नामक सत्प्रवृत्त माणसाच्या आयुष्यात स्त्रीसुख तेवढे नाही, असं विधिलिखित नियतीने केव्हाच कोरून ठेवलेलं होतं.

हो, बापू विलायतेत आठ महिने होते. जाहिराती ध्वनिमुद्रिकांवर मुद्रित करून त्या बांगडया फोनोच्या मशीनवर वाजवून दाखवाव्यात अशी शक्कल बापूंना सुचली. कल्पना अगदी नवी कोरी होती. जमवाजमव करून ते जाहिरात वितरणाची विद्या शिकायला गेले. लंडन त्यांना मानवलं. ते शिकलेसुद्धा. पण ती विद्या धंद्याच्या रोखाने राबवणं त्यांना जमेना. म्हणजे पाश्चात्य विद्येचं पाणी उपडया घागरीवर पडल्यागतच झालं. खर्चापरी खर्च झाला. नंतर ते पुण्याला गेले. तिथे रमले. बसगाडयांवर जाहीराती लटकावतात त्याचं त्यांनी कंत्राट मिळवलं. तेही त्यांनी यथामती चांगलं राबवलं. सोलापूरलाही त्यांनी बसगाडयांच्या जाहिरातींचं कंत्राट मिळवलं. तिथेही जम बसला. तथापी हाडाच्या साहित्यिकाला धंद्यातल्या यशाचं काय हो ?

बापूंना तलवार मारायची होती बापसे बेटा सवाई या नात्याने साहित्यात आणि रंगभूमीवर. साहित्यात त्यांनी 'संजीवनी'च्या जोडीला स्वतःची प्रकाशन संस्थाही जोमात सुरू केली. काणेकरांचं 'चांदरात' हे रेशमी गीतांचं पुस्तक तीन रंगी कव्हरासह अवघ्या बारा आण्यात काढून दे धमाल खपवलं. पण त्यांची खरी कमाल म्हणजे त्यांनी लक्ष्मीबाईंची स्मृतिचित्रे प्रकाशनला मिळवली त्याचा नाशकाचे प्रा. भा. ल. पाटणकर हे श्रीपाद कृष्णांचे जावई. कोल्हटकर जावयांकडे नाशकाला सुट्टीत यायचे. त्यावेळी लक्ष्मीबाईंनी माधव मनोहर, सोपानदेव चौधरी वगैरेंच्या आग्रहास्तव आपल्या आठवणी लिहून काढल्या होत्या. पण लक्ष्मीबाईंना प्रसिद्धीचं वावडं होतं. अहो कितीही झालं तरी ती रेवरंड टिळकांसारख्या साधुपुरुषाची बायको होती. तिने प्रकाशकांना व्यवस्थित टाळलं होतं. पण श्रीपाद कृष्ण म्हणजे महाप्रस्थ. तिथे लक्ष्मीबाईंची मात्रा चालेना. तेव्हां स्मृतिचित्रांचं पाटणकरांच्या दहीपुलावरल्या घरात वाचन झालं. मजकूर वाचून श्रीपाद कृष्ण थक्क झाले.

म्हणाले, 'मराठी साहित्याचं हे भूषण आहे. हे छापा.' त्या सभेला प्रभाकरबापू होते. ते म्हणाले, 'मी माझ्या संजीवनीत छापतो.' लक्ष्मीबाईंनी होकार भरला. अशा रीतीने स्मृतिचित्रे 'संजीवनी'न अ पासून ज्ञ पर्यंत प्रकाशित झाली. लेखिकेबरोबर प्रकाशकाचाही उदोउदो झाला. अशी एकदोन पुस्तकं झाली. मग सरभेसळ सुरू झाली. प्रकाशन थंड पडलं.

उरता उरली रंगभूमी! 'सेवा', 'बातमीदार' आणि 'वृद्धाश्रम' अशी तीन नाटकं त्यांनी लिहिली. त्यांची उमेद वाढली. पण त्या चोपडचांना कोणी हात लावेना. म्हणजे पुन्हा पुन्हा अपयश बापूंच्या मागून चोर पावलांनी फिरत होतं. बापूंनी प्रायः सर्व साहित्यिकांना आणाशपथा घालून सांगितलं, की माझी नाटकं रंगमंचावर आलेली मला या जन्मी दिसू देत. पण नाही म्हणजे नाहीच. साहित्य संघाने बापूंचं एखादं नाटक रंगभूमीवर आणायचं असा ठरावही संमत केला! पण कुठलाही दिग्दर्शक त्या चोपडचांना स्पर्श करेना. बापूंनी मित्रांना कळवलं, की मी कफल्लक झालो आहे; तरीसुद्धा उसनवारी करून हजार रुपये मदत म्हणून देतो, पण माझं नाटक रंगभूमीवर येऊ दे. मित्रांनी सर्वत्र तोंडं वेंगाडली सरकारात वजन खर्च केलं. श्रीपाद कृष्णांच्या शताब्दीनिमित्ताने पुन्हा रापाराप केली. पण जावं तिथं नन्नाचाच पाढा! तरीही बापूंनी धीर सोडला नाही. त्यांनी सद्यपरिस्थितीनुसार नाटकात बदल केले. संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्नही घुसडला. 'गरीबी हटाव' योजनाही नाटकात कोंबली. अव्वल दर्जाची मंडळी करीत नसली तर खालच्या प्रतीतल्या हौशी माणसांकरवी निदान एक तरी प्रयोग करा म्हणून गयावया केली. पण रामा शिवा गोविंदा!

बापू भेदरले. म्हतारपणही आलं. साधसुधं, मुलाबाळांच्या संगतीतलं, संसारी तृप्तीचं सोनेरी म्हातारपण नव्हे. एकाकी, निर्धन, क्रूर म्हातारपण. धंदा बसला. प्रकाशन थंडावलं. ब्रह्मचर्याचा फटका म्हणजे काय ते नको तितकं कळलं. एक डोळा निकामी झाला. बापूंना वाटलं, आपल्या समाजात असे असंख्य गरजू म्हातारे एकाकी, निर्धन स्थितीत आहेत त्यांच्यासाठी समाजात 'वृद्धाश्रम' असावेत. म्हाताऱ्यांनी अशा सेवाबुद्धीने चालविलेल्या वृद्धाश्रमात अखेरच्या आसऱ्यासाठी यावं. दोन घास समाधानाने खावेत. कल्पना ठीक होती. पण द्रव्याचं काय? त्यांनी सरकारला गळ घातली. म्हणाले, 'तुम्ही वृद्धाश्रम काढा. मी त्याचा विनावेतन 'मॅनेजर' होतो. पुन्हा, रामा शिवा गोविंदा! सर्वांनी कानांवर हात ठेवले. एकदा त्यांच्या मनात आलं की गाठीशी काय असेल ते फुंकून टाकावं नि अहमदनगरच्या आयुर्वेदी रसशाळेत शेवटचे दिवस शांतपणे घालवावेत. तेही जमलं नाही. मग पुतण्यांनी प्रेम दिलं. म्हणून त्यांच्याकडे खामगावला गेले. तिथे त्यांना मित्र मिळेनात. पुस्तकं मिळेनात. साहित्यिकांची संगत मिळेना. त्यांचा जीव त्या कंटाळवाण्या खामगावात रडकुंडीला आला. त्यांनी बावडेकरांना कळवलं, 'काय आहे हे माझ्या

आयुष्यात ? मी भेकड आहे. केवळ आत्महत्त्या करण्याचं माझ्याजवळ धैर्य नाही म्हणून मी जगतो आहे.'

तुम्ही कुठल्याही कारणासाठी जगा, निसर्ग कुणाच्या 'बा'लाही सुटलेला नाही ! पाऊणशे वर्षांच्या बापूंच्या पायावर सूज आली. डॉक्टरांनी मूत्राशयाच्या विकाराचं निदान केलं. रक्तदाबाचं दुखणं तर होतंच. तशात डॉक्टरांनी हृदय यंत्रही कमकुवत होत असल्याचं सांगितलं. मग मात्र बापू ढेपाळले. ह्यांना आर्थिक मदत पोचवा, म्हणून सरकारकडे लोकांचे तगादे लागले. बापूंनी जाहीर पत्रक काढून सांगितलं, 'लोकहो, मला पैशाची तशी गरज नाही. पण तुम्ही उरलेल्या म्हाताऱ्यांसाठी वृद्धाश्रम सुरू करा. निर्धन, एकाकी म्हातारपण हे जालीम दुखणं आहे ! लोकहो, म्हाताऱ्यांवर दया करा !' माणुसकीने गहिवरलेली ही हांकसुद्धा ओसाड मनांच्या माळरानावरून वाहून गेली आणि पत्रकातल्या मजकुराची शाई वाळते न वाळते तोंच बापूरावांना बोलावणं आलं. ज्याच्यासाठी पाऊल क्षणभर मागे रेंगाळावं असं, त्या तीन नाटकांच्या शापित चोपड्यांचा भीषण आक्रोश सोडल्यास, साहित्यसम्राट श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या भाबड्या आणि शीळ घालणाऱ्या मुलाच्या आयुष्यात काय बरं उरलं होतं ?

□ □ □

रोमेल... पृष्ठ ४७ वरून

केली जाणारी कारवाई माझ्या कुटुंबियांच्या म्हणजे तुमच्या बाबतीत केली जाणार नाही."

वीस मिनिटांनी रोमेलच्या घरच्या टेलिफोनची घंटा खणखणली. एका बैठकीत भाग घेण्यासाठी जाताना वाटेतच मेंदूत आकस्मित बिघाड होऊन फील्डमार्शल रोमेल कालवश झाले अशी अधिकृत बातमी एका डॉक्टरने सांगितली.

दफनविधीच्या वेळी हिटलरने सर्वांत मोठे पुष्पचक्र पाठविले होते. याच हिटलरची महत्त्वाकांक्षा सफल करण्यासाठी रोमेलने आफ्रिकेतील अदभुत मोहिमेत जिवाचे रान केले. हिटलरचा अमंगल संदर्भ विसरूनही रोमेलच्या लष्करी कर्तबगारीचे स्मरण पुन्हा पुन्हा केले जाते. युद्धाच्या इतिहासात रोमेलला चिरंजीव स्थान आहे.

समाप्त

हिमालयाची सावली

डॉक्टर लागू आणि शांता जोग यांनी पेललेले आव्हान

शस्त्रांचे कठोर प्रहार ज्याला जखमी करू शकणार नाहीत, अग्नी ज्याचे भक्षण करू शकणार नाही, अशा कर्मयोगी माणसाच्या कार्यकर्तृत्वाचे, त्याच्या कौटुंबिक जीवनाचे चित्रण वसंत कानेटकर यांच्या हिमालयाची सावली या नवीन नाटकामध्ये पहावयास मिळते.

अव्वल ब्रिटिश अमदानीच्या काळात, हिंदूंच्या धार्मिक रुढीपायी बाल विधवांचे होत असलेले हाल आणि शिक्षणाअभावी संपूर्ण स्त्री-समाजाला आलेले परावलंबित्व, व त्यामुळे आलेली लाचारी, याविरुद्ध बंडाचा झेंडा घेऊन नानासाहेब उभे आहेत. प्रवाहाविरुद्ध पोहणारांना द्याव्या लागणाऱ्या सर्व संकटांना नानासाहेबांना तोंड द्यावे लागत आहे. नानासाहेब हिंमतीने एकेका संकटावर मात करत वाटचाल करत आहेत. स्त्री समाजाच्या उन्नत्तीच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या नानासाहेबांनी कळत नकळत आपल्या घरावर केव्हाच निखारे ठेवले आहेत. पण त्याची झळ लागली आहे ती छोटी छोटी स्वप्ने पाहणाऱ्या त्यांच्या मुलांना आणि त्यांचा संसार चालवणाऱ्या त्यांच्या पत्नीला. संस्थेच्या हितासाठी नानासाहेबांनी घेतलेले निर्णय, त्यामुळे झालेली कुटुंबियांची होरपळ, यातील संघर्ष कानेटकरांनी बांधेसूदपणे टिपला आहे. वडिलांकडून सर्वसाधारण मुलांनी ठेवाव्यात अशा अपेक्षा ठेवलेल्या मुलांना, वडिलांनी वेळोवेळी केलेली निराशा सतत दिसत आली, डाचत आली. आणि या निराशेचे पटल इतके गडद, की वडिलांचे मोठेपण त्यांना जाणवले नाही, दिसले नाही आणि अखेरीस आयुष्यभर नानासाहेबांना साथ देणाऱ्या त्यांच्या पत्नीला–बयोला–आपल्या मुलांना वडिलांची महती समजावून द्यावी लागली. त्यांना ती समजली किती आणि पटली किती हा दुय्यम भाग झाला. बयोला नवऱ्याचे मोठेपण अचूक उमगले. आणि म्हणूनच अर्धांगाने विकलांग झालेल्या अवस्थेतही कर्मयोगी आश्रमाची स्वप्ने पहाणाऱ्या नानासाहेबांबरोबर अखेरपर्यन्त साथ करून देण्यासाठी ती निघून जाते.

कानेटकरांनी नाटकासाठी निवडलेला विषय अवघड असला तरी नाट्यतंत्रावर आणि हाती घेतलेल्या विषयावरही त्यांची पकड असल्याचे प्रकर्षाने जाणवते. संवाद साधे सोपे, चटकन भिडणारे आहेत. अगदी पहिल्या अंकातही त्यांनी नानासाहेबांची व्यक्तिरेखा मोठ्या खुबीने रंगवली आहे. नाटकास प्रारंभ होतो त्यावेळी

नानासाहेबांनी आपली ध्येये निश्चित केली असून त्या दृष्टीने वाटचालही सुरू केली आहे. मुलगा पुरषोत्तम बी. एस्.सी. ला आहे. परीक्षेच्या निकालानंतर वडील आपल्याला काय सांगणार याची त्याला पूर्ण कल्पना आहे. आपल्या भवितव्याबद्दल वडील बेफीकीर असल्याने तो स्वाभाविकपणे नाराज आहे. याच अंकात नानासाहेबांच्या प्रवेशापूर्वीच पुरषोत्तम कृष्णाबाईच्या संवादातून, तसेच विम्याच्या रकमेसंबधीच्या चर्चेतून त्यांची व्यक्तिरेखा अत्यंत सुस्पष्टपणे प्रस्थापित केली आहे.

नाटकाच्या दुसऱ्या अंकामध्ये संस्थेचा पसारा बऱ्यापैकी पसरल्याचे जाणवते. पुरषोत्तम, आईच्या खटपटीने विदेश दौरा करून आला आहे. त्याला मोठ्या पगाराची नोकरी आहे. नानासाहेब त्याच्याकडे राहात असले तरी आपला आर्थिक भार ते त्याच्यावर पडू देत नाहीत. पहिल्या पत्नीचा मुलगा जगन्नाथ याला नानासाहेबांच्या दुसऱ्या पत्नीनेच लहानाचे मोठे केले असल्याने तोही या कुटुंबियांबद्दल सख्खी माया बाळगून आहे.

बदलत्या काळाबरोबर, बदलत्या विचाराबरोबर नानासाहेब तडजोड करायला तयार नसले, तरी संस्थेचे कार्यकारी मडळ व्यवहारिक फायदे बघून खुद्द नानासाहेबांना कार्यकारणीवरून दूर करते. हा असह्य धक्का. केशवसारख्या विश्वासू साहाय्यकाने केलेल्या वचनभंगाचा ताण पडतो.

अखेरच्या अंकात आपल्याला नानासाहेब दिसतात ते अर्धांगाने विकलांग झालेल्या अवस्थेत. शरीर विकलांग झाले, तरी मनाची उभारी कायम असते आणि म्हणूनच अखेरीस ते घर सोडून तशाही अवस्थेत कर्मयोगी मठाच्या उभारणीसाठी बाहेर पडतात. सोबत अर्थातच बयो असतेच.

स्थलकालाच्या मर्यादा ओलाडल्या तर कानेटकरांच्या रायगडाला जेव्हा जाग येते ! या नाटकाशी प्रस्तुत नाटकाच्या कल्पनाबीजाचे विलक्षण साम्य असल्याचे जाणवले. हिमालया एवढी उत्तंग कामगिरी करणाऱ्या नानासाहेबांसारख्या समर्थ व्यक्तिमत्त्वाचे चित्रण करताना त्यांच्या कौटुंबिक जीवनातील लहान मोठ्या प्रसंगांतून नाट्य फुलवण्याचे कानेटकरांचे कौशल्य वादातीत आहे. अर्थात कर्तृत्ववान व्यक्तित्वाचा हा हिमालय उभा करताना, हिमालयाची सावली ही अखेर हिमालयाचीच सावली आहे याचाही कानेटकरांना विसर पडलेला नाही याची जाणीव त्यांनी बयोची व्यक्तिरेखा ज्या पद्धतीने साकार केली आहे त्यावरून वाटते.

उत्तम प्रयोग

कला वैभव या संस्थेने या नाटकाच्या प्रयोगाची जबाबदारी डॉ. श्रीराम लागू यांच्यासारख्या समर्थ कलावंतावर सोपवली. आणि डॉक्टरांनी ती अतिशय यशस्वीपणे पेलली. नानासाहेबांची भूमिका त्यांनी चांगलीच केली, असे दोन ओळींचे सर्टिफिकिट देण्याची आवश्यकता मुळीच नाही. तसेच या भूमिकेत नटसम्राट मधील गणपतराव डोकावतो अशी तक्रार करण्यातही हशील नाही. आज तरी या



डॉ. श्रीराम लागू (नानासाहेब) । शांता जोग (बयो)

भूमिकेला डॉक्टर लागू यांच्याखेरीज अन्य कोणी कलावंत न्याय देऊ शकेल असे वाटत नाही. भल्याभल्यांना पुणेकरांनी टाळी दिली नाही. परंतु समर्थ अभिव्यक्तीच्या सामर्थ्यावर केवळ अर्धांगाच्या 'बेअरिंग'ला डॉक्टर टाळी घेऊन गेले.

नटसम्राटमध्ये गणपतरावांबरोबर 'सावली' सारखी वावरणारी त्यांची जोडीदारीण–शांता जोग–बयोची अवघड भूमिका सर्व बारीक सारीक जागा घेत साकार करतात. आणि नाटक हिमालयाइतकेच हिमालयाच्या सावलीचेही असल्याची प्रचिती देतात.

डॉक्टर लागू यांनी दिग्दर्शनाची जबाबदारी उत्तमप्रकारे सांभाळली आहे. नाटकात नानासाहेब आणि बयो यांच्याखेरीज फारसा वाव कुणाला नाही. परंतु कोणतेही दुय्यम पात्र अवाजवी, कमी पडणार नाही याची दक्षता त्यांनी घेतली आहे. पुरषोत्तम (शशिकांत शिरसेकर). तातोबा (अशोक सराफ), कृष्णाबाई (सरला येवलेकर) व अरुंधती (लता जुकर) हे कलावंत आपला वाटा समर्थपणे उचलतात. व त्यामुळे प्रयोगाची रंगत वाढते.

नाटकाचा काल, सातत्याने संभाळला गेल्याचे प्रकर्षाने जाणवते. पहिल्या अंकातील त्रासदायक झोंगाळचाचा अपवाद वगळता नेपथ्याची बाजू उत्तम सांभाळली होती. शांताराम विचारे यांच्या उत्तम रंगभूषेचाही आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

हे नाटक म्हणजे मराठी रसिकाला एक आव्हान आहे. तडजोड न स्वीकारता लेखकाने एक उदात्त कर्मयोगी व्यक्तित्त्व रंगभूपीवर आणले आहे. आणि निर्मिती-मध्ये व कलावंताच्या निवडीमध्ये कोणतीही कसूर न ठेवता वैभवने ते रंगभूमीवर आकारास आणले आहे. चांगल्याची ओरड करणारा रसिक या अनोख्या कलाकृतीला "कसा' सामोरा जातो ते पहायचे.

□ □ □

'ॲक्सिडेंटल डेथ ड्यू टू हार्ट फेल्युअर'
सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगांनी आपलं हे मत
सरकारी कागदावर नोंदवलं.
त्यांच्यापुरती ती केस संपली.

आणि तिकडे
हॉस्पिटलच्या आवारात घुटमळणाऱ्या
मोहिंदरसिंगाच्या आत्म्याचा तळतळाट झाला.
कोणाला ऐकू जाणार नाही अशा आवाजात
तो ओरडला, "सब इन्स्पेक्टर जसवंतसिंग !
ही चूक तुम्हाला महागात पडेल."

पंजाबमधील
एक
गाजलेला
खून खटला

माणूस
पुढील अंकी

इन्साऽफ
जज्जसाऽब इन्साफ!

अनुवाद
ॲडव्होकेट माधव कानिटकर

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुण ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649